नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट,नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



* वर्ष ५५ * अंक १७४ * | * नागपूर * | बुधवार, दिनांक २४ सप्टेंबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्रलेख

## खरीखरी..

## राजा उदार झाला !

यंदाच्या महाभयंकर पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडचे अक्षरशः पाणी पळवलेले आहे. पावसाने पाणी पळवण्याचा हा प्रकार अभूतपूर्व असा आहे कारण देशातील अनेक भागात यापूर्वीही मोठ्या पावसाच्या नोंदी होत असत. महाराष्ट्रात मात्र यावर्षीच्या पावसाचा कहर अनपेक्षित, असहनीय आणि काळजाला पाझर फोडून टाकणारा असा अत्यंत हृदयद्रावक आहे. अनेक शेतकऱ्यांची जमीन मातीसकट वाहून जाणे, अनेकांच्या शेतीमध्ये तलावासारखे पाणी साचणे, अनेक ठिकाणी पिकांची वाढ भरपूर पण कपाशीला बोंडे कमी, तर कुठे उंच सोयाबीनला शेंगा कमी आणि इतर पिकांवरही विपरीत परिणाम दिसून आलेला आहे. आता तर आकाशच फाटलेले आहे त्याला कोण शिवणार हा प्रश्न तुमच्या आमच्या डोळ्यासमोर सतत उभा असतो. ज्या जनतेच्या आशीर्वादाने सरकार स्थानापन्न झालेले होते त्या सरकारला हे अस्मानी संकट दूर करणे आपले कर्तव्य वाटले तर ते साहजिकच आहे. आपल्या महाराष्ट्र सरकारनेही हे कर्तव्य पार पाडायचे ठरवलेले दिसत आहे, त्यामुळेच शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सरकारने आत्तापर्यंत २२१५ कोटी रुपयांची मदत मंजूर करण्याचे आदेश दिलेले आहेत. ही रक्कम पर्जन्यग्रस्त आणि आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये लवकरात लवकर जमा होईल असे आज माननीय मुख्यमंत्री म्हणाले. फारसा गाजावाजा न करता सरकारने मूकपणे सर्व शेतकऱ्यांच्या मदतीची तयारी केलेली आहे हे बघून सर्वांनाच आनंद होणे स्वाभाविक आहे. एकूणच परिस्थितीच अशी आहे की आता जी काही पिके शेतीमध्ये उभे आहेत त्याला दृष्ट लागलेली आहे. उत्पन्न आणि पुढचा खर्च याचा ताळमेळ बसत नाही. अनेक शेतकऱ्यांनी शेतातले पीक रोटावेटर लावून संपवलेले आपण पाहिलेले आहे कारण हे पीक जिवंत ठेवणे म्हणजे आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखे आहे. आता तर सरकारने शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करावयाचे ठरवलेले आहे शेतकऱ्यांना आता सरकार कडून एवढीच एक आशा आहे. खरे पाहिले तर शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि मदत करणे हे केंद्र सरकारचे काम आहे पण आत्ताच्या जमान्यात केंद्र सरकारने तात्पुरती मदत देऊन, हे काम राज्य सरकारकडे सोपवलेले दिसून येत आहे. मुख्यमंत्र्यांनी आज जाहीर केलेल्या आकड्यातील प्रत्यक्षात किती रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल याचे आकडे आणि विश्लेषण केलेले नाही. प्रत्येक विभागामध्ये शेतकऱ्यांच्या नुकसानीचे आकडे वेगवेगळ्या प्रकारचे आहेत. काही भाग असे आहेत की, त्या ठिकाणी हेक्टरी १५००० रुपयांची मदत झाली तर शेतकरी निदान उभा तरी राहू शकतो. पण अनेक भागातील शेतीचा खर्च बघता ही रक्कम अगदीच कमी ठरू शकते कारण त्यांचा खर्चही मोठा असतो उत्पन्नही मोठे असते आणि नुकसानीचा आकडाही मोठा असतो. आता शेतकऱ्यांच्या खात्यावर ही रक्कम लवकरच जमा होणार असल्याने असल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेले आहे. सरकारने आपल्या परीने शक्य होईल तेवढी मदत दिलेली आहे. यापुढे प्रत्यक्षात जेव्हा ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल तेव्हा शेतकऱ्यांना जिवंत राहण्याइतके पैसे मिळतील अशी आशा आपण सर्वजण करूया. मात्र, 'राजा उदार झाला आणि सगळा बाजार झाला' असे काही होणार नाही, कारण तेवढी काळजी घेण्याइतपत आपले मुख्यमंत्री सक्षम आहेत. आपल्या माननीय मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या अपेक्षेवर शोधलेले सकारात्मक दृष्टिकोनाचे समाधान थोडे तरी दिलासादायक आहे, यात शंका नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## राज्यातील पीक नुकसानीच्या भरपाईसाठी
# २२१५ कोटींची मदत मंजूर

### राज्य सरकारचा मोठा निर्णय : राज्यातील ३२ लाख शेतकऱ्यांना दिलासा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ : मराठवाडा आणि विदर्भात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. या नुकसानीच्या पाहणीनंतर आता राज्य सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे.

राज्य सरकारने आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत शेतकऱ्यांसाठी पीक नुकसानभरपाई जाहीर केली आहे. खरीप २०२५ मधील पिकांच्या नुकसानीसाठी २२१५ कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. मदत आणि पुनर्वसन विभागाने याबाबतचा शासन निर्णय आजच जाहीर केला असून, ही रक्कम आजपासूनच वितरीत केली जाणार आहे.

गेल्या काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टीने राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यामध्ये मराठवाड्यासह विदर्भातील शेतकरी सर्वाधिक बाधित झाले होते. सरकारने केलेल्या पंचनाम्यानुसार, एकूण ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचे समोर आले आहे. या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी सरकारने तातडीने पाऊल उचलले आहे.

**जून ते ऑगस्टमधील नुकसानीसाठी मदत**

पिकांच्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. अशा परिस्थितीत त्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. जाहीर झालेली मदत आजच वितरित केली जाणार असून, शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसानीची भरपाई मिळण्यास मदत होईल.

मराठवाड्यासह राज्यातील ज्या-ज्या भागात अतिवृष्टी झाली आहे, त्या सर्व भागांतील शेतकऱ्यांचा या मदतीमध्ये समावेश करण्यात आला आहे. जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे झाले होते. त्याकरिता ही मदत असणार आहे.



**कोणत्या विभागात किती मदत?**

दरम्यान, जुलै महिन्यापासून छत्रपती संभाजीनगरमध्ये ७२१ कोटी, नाशिकमध्ये १३.७७ कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. ऑगस्टमध्ये पुणे विभागासाठी १४.२९, नागपूर विभागाला २३.८५ कोटी आणि अमरावती विभागाला ५६५.६० कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. तर कोकणाला १०.५३ कोटी रुपये देण्याचे निर्देश देण्यात आले होते. ही सगळी मिळून राज्य सरकारने खरीप हंगामासाठी आतापर्यंत २२०० कोटी रुपये देण्याचे निर्देश दिले असल्याचे मंत्री मकरंद पाटील यांनी सांगितले होते.



राज्य सरकारच्या वतीने शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी २२१५ कोटींची मदत आतापर्यंत रिलीज करण्यात आली आहे. मात्र हे सर्व पैसे एकाच जीआरने नाही तर वेगवेगळ्या प्रकारच्या जीआरच्या माध्यमातून देण्यात येत आहे. तसेच ही प्रक्रिया अद्याप थांबलेली नाही. आत्तापर्यंत २२१५ कोटी रुपयांची मदत आम्ही केली आहे. त्यातले १८२९ कोटी रुपये पोहोचले आहेत. वाटप झाल्यानंतर देखील शेतकऱ्यांना पूर्ण पैसे मिळण्यासाठी दहा ते बारा दिवसांचा कालावधी लागेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सर्वच पालकमंत्री आपापल्या जिल्ह्यामध्ये जाऊन आलेले आहेत. इतकेच नाही तर ते उद्या देखील जाणार आहेत. मी स्वतः देखील काही जिल्ह्यामध्ये जाणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. मात्र, मला याचे राजकरण करायचे नाही. पूरग्रस्त भागाची पाहणी करण्याची मागणी उद्धव ठाकरे यांनी करणे हेच हास्यास्पद असल्याचे फडणवीसांनी म्हटले आहे.

राज्यातील पूर परिस्थितीवर फडणवीस म्हणाले की, यामध्ये जी काही मदत करता येईल ती मदत आपण करू, मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये महाराष्ट्रातील पूर परिस्थितीवर विस्ताराने चर्चा झाली आहे. आतापर्यंत ९७५ मिलिमीटर पाऊस झाला आहे आणि हा सरासरीपेक्षाही १०२ टक्के जास्त आहे. एनडीआरएफ अंतर्गत केंद्र सरकारच्या वतीने आपल्याला ॲडव्हान्स मध्ये पैसे दिलेले असतात. ते पैसे आपण सध्या खर्च करतोय. राज्य सरकारच्याही काही पैशांची गरज पडली, तर ती मदत देखील तात्काळ केली जाईल.

## नागपूर-नागभीड रेल्वे ब्रॉडगेजच्या कामाला गती

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि.२३ : नागपूर-नागभीड रेल्वे ब्रॉडगेजच्या कामाला गती मिळणार असून, या १९६.१५ कि.मी. नॅरोगेज मार्गाचे ब्रॉडगेज मधील रुपांतरणाच्या कामासाठी ४९१ कोटी ५ लाख रुपये खर्चाच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली . मंगळवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

मुंबईमधील घाटकोपर येथे १३ मे रोजी २५० टन वजनाचे होर्डिंग कोसळले होते. या दुर्घटनेच्या उच्चस्तरीय चौकशीसाठी स्थापन न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल, शिफारशींसह राज्य मंत्रिमंडळाने स्वीकारला आहे. तसेच अहवालातील निष्कर्ष, समितीने सुचविलेल्या उपाय योजनांवरील कार्यवाहीचा कृती अहवाल स्वीकारला आहे.

### ४९१ कोटी ५ लाख रुपये खर्चाच्या तरतुदीस मान्यता

**आरोग्य विभाग** : शासकीय रुग्णालयांच्या सक्षमीकरणासाठी, तसेच राज्य आरोग्य हमी सोसायटीला राखीव निधी मिळणार. विस्तारित महात्मा फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत झ जन आरोग्य योजनेतून रुग्णाच्या उपचाराच्या दाव्यातून मिळणाऱ्या निधीचा विनियोग करण्यास मंजुरी.

**महसूल विभाग** : अकोल्यात शहर बस स्थानक, भाजी बाजार आणि वाणिज्य संकुलाला जागा. मौजे अकोला येथील २४ हजार ५७९.८२ चौ.मी. जागा महापालिकेला हस्तांतरित करण्यास मंजुरी.

**महसूल विभाग** : सोलापूर जिल्ह्यातील मौजे कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथील कॉ. मिनाक्षीताई साने महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेने विकासकाच्या माध्यमातून बांधलेल्या घरांसाठी मुद्रांक व नोंदणी शुल्कात सवलत.

वसई विरार शहर महानगरपालिकेस मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्या इमारतीसाठी आचोळे ( ता. वसई, जि. पालघर) येथील जमीन देण्यास मंजुरी.

**गृह विभाग** : मुंबईमधील घाटकोपर येथे बेकायदेशीर फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेच्या उच्च स्तरीय चौकशीसाठी स्थापन न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल शिफारशींसह स्वीकारला. अहवालातील निष्कर्ष, समितीने सुचविलेल्या उपाय योजनांवरील कार्यवाहीचा कृती अहवाल स्वीकारला. यावर संबंधित विभागांना एक महिन्याच्या मुदतीत कार्यवाही करण्याचे निर्देश.

## कर्जमाफीच्या मुद्यावर सरकार गंभीर



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २३ : अतिवृष्टीमुळे मराठवाड्यासह महाराष्ट्रात हाहाकार उडाल्याच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य सरकार कर्जमाफीच्या मुद्यावर गंभीर असल्याचा पुनरुच्चार केला आहे.

सरकार कर्जमाफीच्या मुद्यावर अत्यंत गंभीर आहे. योग्यवेळी निर्णय घेतला जाईल. सरकार या प्रकरणी कोणत्याही शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही, असे ते म्हणालेत.

राज्यात गत काही दिवसांपासून मुसळधार पावसाने थैमान घातले आहे. त्यात शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. परिणामी, शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याची मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरकार कोणत्याही शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नसल्याची ग्वाही दिली आहे. ते म्हणाले, सद्यस्थितीत शेतकरी संकटात आहे. त्यामुळे त्यांना तत्काळ मदत देण्यास आमचे प्राधान्य आहे. या प्रकरणी युद्धपातळीवर पंचनामे करून दिवाळीपूर्वी त्यांना मदत पोहोचती होईल याची काळजी घेतली जाईल.

राज्य सरकार शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या मुद्यावर अत्यंत गंभीर आहे. त्याचा निर्णय योग्यवेळी घेतला जाईल. शेतकऱ्याला दिलासा देण्याची ही वेळ आहे. त्यामुळे आम्ही सर्वजण शेतकऱ्यांच्या पाठिशी आहे.

आमचे सर्व मंत्रीही आपापल्या जिल्ह्यांत जाऊन परिस्थितीचा आढावा घेतील. ज्या ठिकाणी मदतीची आवश्यकता आहे, तिथे मदत केली जाईल. अतिवृष्टीग्रस्तांना जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्याचाही प्रयत्न केला जात आहे, असे शिंदे म्हणाले.

## झेडपी व पं. स. च्या निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ : राज्यातील ३२ जिल्हा परिषदा व ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार प्रारुप मतदार यादीवर ८ ते १४ ऑक्टोबर या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील.

राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला आहे. त्या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहे. जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केली जाईल. त्यावर १४ ऑक्टोबर पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील.


अंतिम मतदार यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी २७ ऑक्टोबर रोजी जाहीर केली जाईल.

**नवीन नावांचा समावेश नाही**

निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय मतदार याद्या तयार करताना विधानसभा मतदारसंघाच्या यादीप्रमाणेच मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे व पत्ते कायम ठेवले जातात. या याद्यांमध्ये नवीन नावांचा समावेश करणे, नावे वगळणे अथवा नावे किंवा पत्त्यांमध्ये दुरूस्ती करणे इत्यादी स्वरूपाची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही.

हरकती व सूचनांच्या अनुषंगाने केवळ मतदार याद्यांचे विभाजन करताना लेखनिकांकडून होणा?या चुका, मतदाराचा चुकून निवडणूक विभाग किंवा निर्वाचक गण बदलणे, विधानसभेच्या यादीत नाव असूनही प्रभागाच्या यादीत नाव नसणे आदींसंदर्भातील दुरूस्त्या हरकीत व सूचनांच्या अनुषंगाने करण्यात येतात.

## जाहिरातीवर पैसा उधळण्यापेक्षा
# शेतकऱ्यांना मदत करा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ : उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ओल्या दुष्काळाचे निकष बाजूला ठेवून अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले आहे.

सरकारने स्वतःच्या जाहिरातबाजीवर पैसा उधळण्यापेक्षा आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदतीचा हात द्या, असे ते यासंबंधी फडणवीसांना टोला हाणताना म्हणालेत. नैसर्गिक आपत्ती येऊनही महायुती सरकारचे मंत्री आणि अधिकारी तिकडे मंत्रालयात बसून ऑनलाइन सल्ले देत आहेत. हे योग्य नसून शेतकरी वर्गाला भरपूर देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

## शस्त्र सोडण्याची भाषा विश्वासघातकी

### वरिष्ठ नक्षल नेता भूपतीवर केंद्रीय समितीचे गंभीर आरोप

■ महासागर प्रतिनिधी गडचिरोली, दि. २३ : नक्षल चळवळीत मागील काही दिवसांपासून सुरू असलेला अंतर्गत वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला. केंद्रीय समितीने शस्त्र सोडण्याची भाषा विश्वासघातकी, असल्याचे म्हटले आहे.

याविषयी काढलेल्या पत्रकात नक्षलवाद्यांनी वरिष्ठ नक्षल नेता तसेच केंद्रीय समिती सदस्य सोनू उर्फ भूपतीवर गंभीर आरोप केले. त्यामुळे शस्त्रसंधी आणि शांतीवार्ता प्रस्तावावरून संघटनेत फूट पडल्याचे स्पष्ट झाले.

नक्षलनेता भूपती याने एक पत्रक जाहीर करून अल्पकाळासाठी शस्त्रसंधी करण्याची तयारी दर्शवली होती. त्याने यासंदर्भात सरकारकडे चर्चेचे आव्हान केले होते. मात्र, भूपतीची भूमिका केंद्रीय समितीतील इतर सदस्यांना पटलेली नाही. त्यामुळे अशाप्रकारचे वक्तव्य हे विश्वासघात व चळवळीतील सदस्यांची फसवणूक करणारे असल्याचा आरोप केंद्रीय समितीने केला.

नक्षलवाद्यांची केंद्रीय समिती व दंडकारण्य विशेष झोनल समितीने संयुक्तपणे जारी केलेल्या पत्रकात म्हटले की, बदलत्या सामाजिक व आंतरराष्ट्रीय परिस्थितीत सशस्त्र संघर्ष सोडण्याचे कोणतेही कारण नाही. उलट, साम्राज्यवादी वसाहतवाद, मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांची लूट, शेतकरीझमजुरांचे शोषण आणि हिंदुत्ववादी फॅसिझम यामुळे क्रांतीची गरज अधिक तीव्र झाली आहे. हत्यार सोडणे म्हणजे शत्रूसमोर आत्मसमर्पण आणि जनतेशी विश्वासघात आहे.



भूपतीने संघटनेचे नेते गणपती यांच्या ७ मे रोजीच्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावला. गणपती यांनी शांतता प्रस्तावावर चर्चा करण्याची तयारी दाखवली होती, मात्र शस्त्र खाली ठेवण्याबाबत कोणतेही वक्तव्य केले नव्हते.

तरीसुद्धा भूपतीने चुकीच्या पद्धतीने वक्तव्य करून संघटना आणि जनतेमध्ये गोंधळ निर्माण केला. धोरणात बदल हवा असल्यास पक्षाच्या आतच चर्चा होऊ शकते. पण थेट माध्यमांतून असे विधान करणे जनतेची दिशाभूल करणारे आहे, असे केंद्रीय समितीने स्पष्ट केले.

शस्त्र सोडणे म्हणजे शत्रूसमोर शरणागती पत्करणे आहे. अशा कृतीमुळे चळवळ क्रांतिकारी न राहता सुधारक बनते. त्यामुळे भूपती व त्याच्या समर्थकांनी शस्त्रे सोडली तर ती पक्षाकडे परत देणे बंधनकारक आहे. अन्यथा पीएलजीएला ती परत घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

नक्षलवाद्यांच्या मते, देशातील बेरोजगारी, शेतकरी संकट, आर्थिक असमानता आणि धार्मिक ध्रुवीकरण या सर्व समस्यांवर उपाय म्हणजे सशस्त्र संघर्ष व जनयुद्ध. क्रांतिकारी आंदोलन कधीही अपयशी झालेले नाही.

## मुंबई महापालिकेच्या श्रीमंतीला उतरती कळा

### मुदत ठेवींत ८ महिन्यांत २ हजार कोटींची घट : गत ३ वर्षात तब्बल १२ हजार कोटींची घसरण

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ : मुंबई महापालिका ही देशातील सर्वात श्रीमंत महापालिका म्हणून ओळखली जाते. पण आता गत काही वर्षांत बीएमसीच्या मुदत ठेवींमध्ये मोठी घट झाल्याची बाब माहिती अधिकारात उजेडात आली आहे. बीएमसीच्या सातत्याने घटणाऱ्या या निधीवर संशय व्यक्त केला जात आहे.

सामाजिक कार्यकर्ते गॉडफ्रे पिमेंटा यांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत मुंबई महापालिकेच्या गत काही वर्षांतील मुदत ठेवींचा तपशील मागितला होता. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई महापालिकेच्या २०२१-२२ मध्ये ०१ हजार ६९०.८४ कोटी रुपयांच्या मुदत ठेवी होत्या. त्यात आता १२ हजार १९२ कोटींची घट झाली. त्यामुळे हा आकडा ७९ हजार ४९८.५९ कोटींवर घसरला आहे.

यंदाचा अर्थसंकल्प जाहीर झाला तेव्हा या ठेवी ९१ हजार कोटींवर होत्या. पण आता ताज्या आकडेवारीमुळे अवघ्या ८ महिन्यांतच त्यात तब्बल २ हजार कोटींची घट झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

महापालिकेच्या विविध विभागांच्या अधिशेष रकमेच्या मुदत ठेवी विविध बँकांमध्ये ठेवलेल्या असतात. विविध बँकांचे व्याजदर मागवन सर्वाधिक व्याजदर असणा?या बँकांमध्ये या ठेवी ठेवण्यास प्राधान्य दिले जाते. ७९ हजार कोटींच्या मुदत ठेवींपैकी 39 हजार ५४३ कोटींची रक्कम पीएफ, निवृत्ती वेतन, उपदान, विशेष निधी आदींसाठी वापरली जाते. तसे करणे बंधनकारकही असते.

गत काही वर्षांत पालिका प्रशासनाने पायाभूत सुविधांचे मोठे प्रकल्प हाती घेतले आहेत. या प्रकल्पांचे नियोजन व अंमलबजावणी यामुळे मुदतठेवी झपाट्याने कमी होत असल्याचा युक्तिवाद केला जात आहे.

बीएमसीएचे आयुक्त भूषण गगराणी यांनी अर्थसंकल्प मांडताना मुदत ठेवींची रक्कम मुंबईच्या पायाभूत सुविधांसाठीच वापरली जात असल्याचे स्पष्ट केले होते हे विशेष.

सध्या मुंबईत सागरी किनारा प्रकल्प, गोरेगाव - मुलुंड जोडरस्ता, मलनिस्सारण प्रकल्प आदी मोठ्या खर्चाचे व दीर्घकाळ चालणारे प्रकल्प मुदत ठेवींमधील राखीव निधीशी संलग्न करण्यात आलेत.

त्यामुळे या प्रकल्पांची देणी देताना मुदत ठेवींची रक्कम कमी होत जाते. पालिकाने गेल्या काही वर्षांपासून राखीव निधी वापरण्यास सुरुवात केली आहे.



# अतिवृष्टीमुळे ७० लाख एकर शेतीचे नुकसान

## दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई : कृषीमंत्री भरणे



**मुंबई :** अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसान भरपाई देणार आहोत. ज्या शेतकऱ्यांचे पशुधन वाहून गेले आहे त्यांनाही मदत केली जाणार आहे. जवळपास 70 लाख एकर शेतीचे नुकसान झाले आहे. मुख्यमंत्र्यांनी पंचनामे करण्याचे आदेश दिल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. दत्तात्रय भरणे म्हणाले की, अतिवृष्टीमुळे सर्वाधिक नांदेड जिल्ह्यात नुकसान झाले आहे. त्यानंतर सोलापूर, यवतमाळ, धाराशिव, बीड, अहिल्या नगर, वाशीम, बुलडाणा, हिंगोली, अकोल्यासह 30 जिल्ह्यामध्ये मोठे नुकसान झाले आहे. सप्टेंबर महिन्यामध्ये जवळपास 31 लाख एकर शेती पिकाचे नुकसान झाले आहे,अशी माहिती भरणे यांनी दिली आहे. दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली आहे, पहिल्या अतिवृष्टीमुळे विदर्भात मोठा फटका बसला त्यानंतर मराठवाडा आणि आता संपूर्ण राज्यात अतिवृष्टीचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठे नुकसान यामुळे झाले आहे. राज्याचा विचार केला तर जवळपास 70 लाख एकर शेतीचे नुकसान झाले आहे. नदी-ओढ्याच्या काठाला असलेल्या जमिनीवरची माती वाहून गेली आहे, अशी माहिती भरणे यांनी दिली आहे.

# दिवाळीपर्यंत मदत अपुरी

## विजय वडेट्टीवारांचा संताप



**मुंबई :** गेल्या काही दिवसांत राज्यात मुसळधार पावसाने हाहाकार माजवला आहे. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागांमध्ये शेतजमिनी पाण्याखाली गेल्याने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. परिणामी शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून, नुकसानभरपाईसाठी सरकारकडे मागणी होत आहे. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत मिळेल, असे आश्वासन दिले आहे. मात्र या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. वडेट्टीवार म्हणाले की, राज्यातील जवळपास 34 लाख हेक्टर शेती उद्ध्वस्त झाली आहे. सरकार निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनानुसार मदत करणार की, नवा जीआर काढून शेतकऱ्यांची फसवणूक करणार? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. पिक विमा योजनेवर टीका करताना ते म्हणाले की, शेतकऱ्यांकडून पैसे घेऊन सरकारने विम्याचे सोंग केले, मात्र अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान या योजनेत बसतच नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्षात काही मिळणारच नाही.

## मराठवाडा पाण्याखाली, मुख्यमंत्री ठाण्यात भाषणात व्यस्त : संजय राऊत



**मुंबई :** संपूर्ण मराठवाडा मुसळधार पावसाने जवळजवळ पाण्याखाली गेला आहे. मराठवाड्यासह सोलापूर आणि राज्यातील अनेक भागात पावसाने कहर माजवला आहे. ओला दुष्काळ जाहीर करावा अशी परिस्थिती आहे. राज्याचे मुख्यमंत्री ठाण्यात रेल्वेचे उद्घाटन, राजकीय भाषण, राजकीय आखणी करत आहेत, इतर मंत्री देखील यातच अडकले आहेत. पण यातून बाहेर पडून मुख्यमंत्री आणि सरकारने पुढील काही काळ फक्त मराठवाड्याकडे लक्ष देणं गरजेचे आहे. जिथे जिथे अतिवृष्टीमुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, तिथे तिथे विशेष लक्ष देण्याची गरज आहे, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. उबाठाचे खासदार संजय राऊत म्हणाले की,मनसे-उबाठाच्या जागा वाटपाची चर्चा होत असेल किंवा झाली असेल तर ती सांगण्यासाठी हे व्यासपीठ नाही.

## आज हिंदू नाही तर बळीराजा खतरे में है

### ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी



**मुंबई :** आज हिंदू नाही तर बळीराजा खतरे में है..! अशा परिस्थितीत आता पंचनाम्याचा हट्ट न धरता आजच्या कॅबिनेट बैठकीत ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे. तसेच शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी 50 हजार रुपये मदतीची घोषणा करा, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. या संदर्भात आमदार रोहित पवार यांनी सोशल मिडियावरील पोस्टच्या माध्यमातून शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी रोहित पवार यांनी केली आहे. जाती-धर्मात वाद करण्यापेक्षा हिंदु, मुस्लिम, ओबीसी, एससी, एसटी या सर्वच समाजाचे शेतकरी अडचणीत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, 'अतिवृष्टीने राज्यात भयावह परिस्थिती निर्माण झाल्याने मायबाप सरकारला सांगायचंय, आज जाती-धर्मात वाद करण्यापेक्षा हिंदु, मुस्लिम, ओबीसी, एससी, एसटी या सर्वच समाजाचे शेतकरी अडचणीत आहेत.

## शेअर मार्केटच्या नावाखाली फसवणूक

**रत्नागिरी :** शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून जास्तीचा परतावा देण्याचे आमिष दाखवत अनेकांच्या फसवणुकीच्या घटना समोर येत आहेत. अशातच ळहख अर्थात ट्रेड विथ जॅझ नामक कंपनीकडून गुंतवणूकदारांची कोट्यवधींची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी यवतमाळ नंतर आता चिपळूणमध्ये या कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कंपनीचे संचालक समीर नार्वेकर यांच्यासह त्यांची पत्नी नेहा नार्वेकर तसेच शाखा व्यवस्थापक संकेश घाग यांच्यावर चिपळूण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चिपळूण येथील गुंतवणूकदार पंकज माटे यांच्या तक्रारीनंतर चिपळूण येथे ट्रेड विथ जॅझ कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कंपनीत सुमारे 11 हजार गुंतवणूकदार असल्याचे समजते. राज्यभरात या कंपनीच्या 20 शाखा असल्याची माहिती समोर आली आहे.

# ॲमेझॉनच्या निधीतून राज्याच्या प्रगतीला हातभार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २३ :

महाराष्ट्र हे गुंतवणुकदारांसाठी देशाचे आकर्षण आहे. स्वित्झर्लंड मधील दावोस येथे झालेल्या जागतिक अर्थ परिषदेतही महाराष्ट्राने सर्वाधिक गुंतवणूक आणली. या परिषदेतच ॲमेझॉनने राज्यात 'क्लाऊड इन्फ्रास्ट्रक्टर' क्षेत्रात मोठी गुंतवणूक करण्याचा सामंजस्य करार केला होता. त्यानुसार ॲमेझॉन गुंतवणूक करीत आहे. यापुढेही राज्याच्या प्रगतीमध्ये ॲमेझॉन कंपनीची गुंतवणूक महत्त्वाची ठरणार असून कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून राज्याच्या प्रगतीला हातभार लागेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.




वर्षा निवासस्थानी अमेझॉन वेब सर्व्हिसेस कंपनीच्या मुंबईतील डेटा सेंटरचे दूरदृश्य प्रणालीद्वारे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. ॲमेझॉन वेब सर्व्हिसेस कंपनीने राज्यात पहिल्या टप्प्यातील ८.३ बिलियन डॉलर गुंतवणुकीचा या उपक्रमाद्वारे शुभारंभ केला आहे. यावेळी मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, ॲमेझॉन वेब सर्व्हिसेस (पब्लिक पॉलिसी) शाखेचे जागतिक उपाध्यक्ष मायकल पुंके, दक्षिण आशिया व भारताचे अध्यक्ष संदीप दत्ता, आशिया पॅसिफिक क्षेत्राचे संचालक विक्रम श्रीधरन, कंपनीच्या भारतातील पायाभूत सोयी सुविधा क्षेत्राचे संचालक आदित्य चौधरी, तसेच गायत्री प्रभू, शुभंकर दास, रीना मरांडा आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्य शासन उद्योजकांना राज्यात उद्योग स्थापन करणे सहज व सोपे होण्यासाठी विविध योजनांवर काम करीत आहे. उद्योगांना लागणाऱ्या परवान्यांचा कालावधी कमी करणे, प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी इज ऑफ डूईंग बिजनेस वॉर रूम च्या माध्यमातून जलद गतीने कार्यवाही होत आहे.

उद्योजकांना परवानगीसाठी दिलेल्या प्रस्तावांची रिअल टाइम इन्फॉर्मेशन देण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. यावेळी ॲमेझॉनच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अमेरिकेतील सिएटल येथील कंपनीच्या मुख्यालयाला भेट देण्याचे निमंत्रणही देण्यात आले. राज्यात बीज, पाणी पुरवठा, शिक्षण, कौशल्य विकास या क्षेत्रात सामाजिक उत्तरदायित्व निधीतून राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची सादरीकरणाद्वारे माहिती यावेळी देण्यात आली.

तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते ॲमेझॉन मोबाईल स्टेम लॅब उपक्रम अंतर्गत भारतातील पहिल्या ' थिंक बिग मोबाईल व्हॅन' चे हिरवा झेंडा दाखवून उद्घाटन करण्यात आले. ही व्हॅन मुंबई शहरात विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने विविध संशोधन, नव विचारांनी शिक्षित करणार आहे.

# वेळेत उपचार न मिळाल्याने चिमुकल्याचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
जालना, दि. २३ :

महाराष्ट्रात पावसाने चांगलाच धुमाकूळ घातला असून सर्वत्र पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. सध्या सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे तसेच जनजीवनही विस्कळीत झाले आहे. या पावसाने अनेकांचे जीवही घेतले आहेत. तसेच अनेक गावांमध्ये पूरामुळे वैद्यकीय मदतही वेळेत मिळू शकत नसल्याचे समोर आले आहे. जालना जिल्ह्यातही अशीच एक हृदयद्रावक घटना घडली आहे. वैद्यकीय मदत वेळेत न मिळाल्याने 3 वर्षीय चिमूकल्याचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.



जालना जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे. सातत्याने पडणाऱ्या या पावसामुळे अंबड तालुक्यातील भद्रायणी नदीला पूर आला आहे. या पूरामुळे गावाबाहेर जाणारा रस्ता आणि पूल पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. यामुळे गावातून दवाखान्यात जाण्याचा मार्गच बंद झाला आहे. गावातील 3 वर्षांचा प्रथमेश आजारी पडला. त्याला तातडीने दवाखान्यात नेण्याची गरज होती. मात्र, पूरामुळे कुठेच जाता आले नाही आणि अखेर प्रथमेशने आजीच्या खांद्यावरच प्राण सोडले. या घटनेने गावात शोककळा पसरली आहे.

मृत पथमेशच्या वडिलांनी हृदय पिळवटून टाकणाऱ्या शब्दांत आपली आपबीती सांगितली आहे. गेल्या आठ दिवसांपासून लागातार पाऊस सुरू आहे. घराच्या बाहेरही पडता येणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती. पोराला खूप दुखत होते. कसे बसे बाहेर काढले. रस्ताही दिसत नव्हता. अखेर तीन वर्षाच्या मुलाने उपचाराअभावी प्राण सोडले. पुरस्थितीमुळे गावाचा संपर्क तुटल्याने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेने ग्रामीण भागातील मूलभूत आरोग्य सुविधा आणि पायाभूत सुविधांचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. स्थानिकांनी प्रशासनाकडे तात्काळ तात्पुरता पूल किंवा पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे, जेणेकरून अशा दुर्दैवी घटना टाळता येतील. पावसाने निर्माण झालेल्या या पूरस्थितीमुळे एका कुटुंबाचा आनंद हिरावला गेला असून, छोट्या प्रथमेशच्या मृत्यूने केवळ त्याच्या घरातच नव्हे, तर संपूर्ण रुई तांड्यावर शोककळा पसरली आहे.

## महाराष्ट्र गणपती भव्यतम सोडतीचा निकाल जाहीर

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २३ :

महाराष्ट्र राज्य लॉटरी, महाराष्ट्र शासनाच्या वतीने "महाराष्ट्र गणपती भव्यतम सोडत" १० सप्टेंबर २०२५ रोजी उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी यांच्या कार्यालयात सोडत सभागृह, टी ब्लॉक, पहिला मजला, दाणा बाजार, एपीएमसी मार्केट, सेक्टर १९-बी, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी काढण्यात आली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य लॉटरी, वाशी कार्यालयाचे उपसंचालक (वित्त व लेखा) यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळविली आहे.

या सोडतीमधून जनतेच्या "सर्वांगीण आर्थिक विकासासाठी" या ब्रीद वाक्याचा अवलंब करण्यात आला. या सोडतीचे वैशिष्ट्य म्हणजे पहिले (सामायिक) बक्षिस तिकीट क्रमांक 03 12446 रुपए १,००,००,०००/- चे एक बारड लॉटरी सेंटर, सोलापूर येथील खरेदीदारास लागले आहे. रू. १,००,०००/- ची चार बक्षिसे व रू. १०,०००/- च्या आतील रकमेची ३,८५१ बक्षिसे लागली आहेत.

## तळेगाव-चाकण-शिक्रापूर राष्ट्रीय महामार्ग दुरुस्तीसाठी

# ५९ .७५ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २३ :



तळेगाव- चाकण- शिक्रापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डी (माजी राज्य महामार्ग ५५) कि.मी. ०/०० ते कि.मी. ५४/०० या मार्गाच्या दुरुस्ती व रुंदीकरणासाठी एकूण ५९.७५ कोटी निधीस मान्यता देण्यात आल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली आहे. तसेच या निर्णयामुळे तळेगाव- चाकण-शिक्रापूर मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होईल, अपघातांचा धोका टळेल तसेच औद्योगिक वाहतुकीला मोठा दिलासा मिळेल, असे सार्वजनिक बांधकाम मंत्री भोसले यांनी सांगितले. तळेगांव-चाकण-शिक्रापूर या मार्गात तळेगांव ते चाकण दरम्यान चार पदरी उन्नत मार्ग व जमिनीस समांतर चार पदरी रस्ता व चाकण ते शिक्रापूर दरम्यान सहा पदरी रस्ता या कामाचा समावेश आहे. हे संपूर्ण काम बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा (बी.ओ.टी.) तत्वावर बांधण्यात येणार आहे.

या मागार्चा समावेश पूर्वी राज्य रस्ते विकास आराखडा २००१-२०२१ अंतर्गत करण्यात आला होता. त्यानंतर भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने या रस्त्याला राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी असा दर्जा दिला असून, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून तो महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत तळेगाव-चाकण- शिक्रापूर हा महामार्ग अतिवृष्टीमुळे खचला असून, रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती व रुंदीकरण आवश्यक झाले होते. हा मार्ग औद्योगिक दृष्ट्या महत्त्वाचा असल्यामुळे येथे अवजड वाहतुकीची मोठी वर्दळ असते.

# जमिनीचेही नुकसान भरून काढा

## शरद पवारांचे राज्य सरकारला आवाहन

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २३ :



राज्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे शेती, जनावरे आणि जनजीवन यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. सुरळीत झाली होती. मात्र, सलग पाच दिवस वाफ्यात पाणी साचल्याने मोठ्या प्रमाणावर पिके कुजून गेली. काही भागात कापूस आणि इतर खरीप पिकेही उध्वस्त अनेक जिल्ह्यांत पिके जमीनदोस्त झाली असून शेतकऱ्यांच्या संसारावर संकट ओढवले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सरकारकडे ठोस मागणी केली आहे. नैसर्गिक आपत्ती म्हणून या संकटाकडे पाहून शेतकऱ्यांना तातडीची आणि दीर्घकालीन मदत द्यावी, पंचनामे करताना शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन वास्तव पाहणी केली जावी, अशी त्यांची आग्रही भूमिका त्यांनी मांडली आहे. या संदर्भात शरद पवार म्हणाले की, मराठवाडा आणि विदभार्सारख्या कमी पाऊस पडणाऱ्या भागांत यंदा अतिवृष्टी झाल्याने परिस्थिती बिकट झाली आहे. सोयाबीन हे शेतकऱ्यांचे प्रमुख आधारपीक असून या पिकाची वाढ झाली आहेत. या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या हातात काहीही उत्पादन आले नाही. "आपण दुष्काळ पाहिला आहे, पण अशी अतिवृष्टी याआधी कधी पाहिली नव्हती," असे ते म्हणाले. त्यामुळे पिकांच्या नुकसानीबरोबरच शेतकरी कुटुंबांची आर्थिक घडी विस्कळीत झाली आहे.

सोलापूर, लातूर, धाराशिव, जालना, परभणी आणि नगर जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अशावेळी राज्य व केंद्र सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देण्याची जबाबदारी बजावली पाहिजे, असे पवारांनी ठामपणे नमूद केले. "केंद्र सरकारकडे नैसर्गिक आपत्तीतील मदतीची योजना आहे.

## व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी,
ठाणे, दि. २३ :

भिवंडी येथे एका ३४ वर्षीय महिलेवर तिच्या ओळखीतील ३२ वर्षीय मुलाने लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. त्या तरुणाने मोबाईलमधील तिचे छायाचित्र आणि चित्रीकरण समाजमाध्यमावर प्रसारित करण्याची धमकी देऊन तिच्यावर अत्याचार केले. याप्रकरणी निजामपूरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिडीत महिला आणि तरुणाची ओळख सुमारे वर्षभरापूर्वी बसगाडीतील प्रवासामध्ये झाली होती. त्यानंतर तो तरुण महिलेच्या घरी जाऊन लैंगिक अत्याचार करु लागला. त्यास विरोध केल्यानंतर तो पिडीत महिलेला मारहाण देखील करत असे. त्याने पिडीत महिलेचे छायाचित्र आणि चित्रीकरण देखील मोबाईलमध्ये कैद केले होते. हे छायाचित्र आणि चित्रीकरण समाजमाध्यमावर प्रसारित करण्याची धमकी देऊन तो लैंगिक अत्याचार करु लागला होता. अखेर महिलेने निजामपूरा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

# नांदेडच्या लेखकाचा रशियात सन्मान

■ महासागर प्रतिनिधी,
नांदेड, दि. २३ :

नांदेड लेखक डॉ. पृथ्वीराज तौर यांचा रशियात सन्मान करण्यात आला. जागतिक पातळीवरील साहित्यातील योगदानासाठी त्यांना सिल्व्हर मेडल प्रदान करण्यात आले. वर्ल्ड ऑर्गनायझेशन ऑफ राइटर्सच्या अध्यक्ष मार्गारिता अल यांनी पुरस्कारांची घोषणा केली, तर युनेस्कोच्या सद्भावना राजदूत अलेक्झांड्रिया ओचिरोव्हा यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. रशियातील मास्को येथे 20 आणि 21 सप्टेंबर रोजी आयोजित वर्ल्ड पब्लिक असेंब्लीमध्ये हा कार्यक्रम झाला.



वर्ल्ड पब्लिक असेंब्लीच्या निमित्ताने त्रेसष्ट देशातील लेखक वॉवच्या दुसऱ्या जागतिक परिषदेसाठी आले आहेत. त्यावेळी या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. भारतीय लेखक म्हणून डॉ. पृथ्वीराज तौर यांचा गौरव करण्यात आला. तौर यांच्या समवेत अन्य चार देशातील लेखकांनाही सिल्वर मेडलने सन्मानित करण्यात आले. डॉ. पृथ्वीराज तौर हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख आहेत.

परिषदेच्या विशेष सत्रात डॉ. पृथ्वीराज तौर यांनी अनुवादित केलेल्या व प्रा. स्वाती काटे यांनी संपादित केलेल्या 'आनंदोत्सवाचा विश्वसेतु' या संग्रहाचे प्रकाशन सुप्रसिद्ध इजिप्तचे सुप्रसिद्ध कवी अशरफ दाली आणि आफ्रिका लेखक संघटनेचे महासचिव डॉ वले ओकेदिरान यांच्या हस्ते करण्यात आले. संग्रहात पंचवीस देशातील चाळीस कवींच्या कवितांचे मराठी भाषांतर समाविष्ट करण्यात आले आहे. जागतिक परिषदेच्या दुसऱ्या दिवशी डॉ. यांनी 'सहलेखक म्हणून अनुवादकाचे अस्तित्व' हा विषयावर व्याखान झाले.

या कार्यक्रमाच्या अमेरिकेतील टस्कगी विद्यापीठातील प्रा. बिल एफ. एनडी. अध्यक्षस्थानी होते. जागतिक पातळीवरील साहित्याचे प्रतिष्ठीत सिल्व्हर मेडल प्राप्त झाल्याबद्दल डॉ. पृथ्वीराज तौर यांचे कुलगुरू डॉ मनोहर चासकर आणि साहित्य शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# पुण्यात ३१ व्या नवरात्र महोत्सवाचे उद्घाटन

## महसूलमंत्री बावनकुळेंच्या हस्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे यांना महर्षी पुरस्कार प्रदान

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २३ :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना नुकतेच एक जीएसटी दर कमी करून मोठे गिफ्ट दिले आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनात त्यामुळे आमूलाग्र बदल घडणार आहे. २८ टक्के जीएसटी काही ठिकाणी थेट पाच टक्के पर्यंत कमी केला आहे. गरिब आणि मध्यम नागरिकांचे कल्याण डोळ्यासमोर ठेऊन ऐतिहासिक निर्णय पंतप्रधान यांनी केला आहे. त्यामुळे काही कोटीचा महसूल कमी होईल याची जाणीव मला आहे पण नागरिकांसाठी हा निर्णय महत्वाचा आहे. नागरिकांनी आता स्वदेशी वस्तू वापर करण्यावर भर दिला पाहिजे. देशातील पैसा परदेशात न जाता देशातच राहिला पाहिजे.२०४७ चा विकसित भारत त्यातून निर्माण होईल. यापुढे "स्वदेशी" हाच मूलमंत्र आपला सर्वांचा राहील आणि तोच आपला धर्म आहे असे मत राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.



कला, संस्कृती, गायन, वादन, भजन, नृत्य, संगीत यांचा मनोहारी संगम असणाऱ्या ३१ व्या पुणे नवरात्रौ महोत्सवाचे उद्घाटन सोमवारी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते गणेश कला क्रीडा रंगमंच येथे संपन्न झाले. याप्रसंगी ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत व माजी आमदार उल्हास पवार, राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे, अप्पर पोलीस आयुक्त संजय पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या उद्घाटन सोहळ्यात भटक्या विमुक्त समाजातील मुलांचे संगोपन शिक्षण व संस्कार यासाठी अविरत काम करणारे जेष्ठ समाजसेवक पद्मश्री गिरीश प्रभुणे यांना महर्षी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.तसेच श्री लक्ष्मीमाता जीवन गौरव पुरस्काराने डॉ. पराग काळकर (प्र-कुलगुरू सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सामजिक कार्यकर्त्या डॉ. मेघा पुरव सामंत, बुलढाणा सहकारी बँकेचे सहसंस्थापक शिरीष देशपांडे आणि लोककलावंत प्रमिला लोदगेकर यांना गौरविण्यात आले. याशिवाय डॉ. मयूर कर्डिले आणि डॉ. अरविंद खोमणे यांनाही विशेष सन्मानित केले गेले.

बावनकुळे म्हणाले, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमचे सरकार पुण्यावर विशेष लक्ष्य ठेवून आहे. मुख्यमंत्री सातत्याने पुण्यात कामानिमित्ताने येत असतात. त्यांनी सन २०२९, २०३५ आणि २०४७ मधील विकसित पुण्याचे दीर्घकालीन नियोजन केले आहे.महाराष्ट्रात सर्वाधिक चांगले शहर पुणे होईल आणि पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणात निर्माण होतील असे काम सध्या सुरू आहे.

# अजित पवारांचे सर्व नियोजित कार्यक्रम रद्द

## पुरग्रस्त भागात मदत व बचाव कार्याला प्राधान्य

**मुंबई :** मराठवाड्यात सध्या भीषण पूर परिस्थिती निर्माण झाल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या सर्व सार्वजनिक कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. पूरग्रस्त भागातील नागरिकांना मदत व बचाव कायार्ला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली आहे. याआधी नियोजित असलेले कार्यक्रम आता पुढे ढकलण्यात आले असून, या क्षेत्रातील परिस्थितीवर लक्ष केंद्रीत करण्यासाठी स्वतः तातडीने मराठवाड्यात पोहोचणार आहेत. तर दुसरीकडे खासदार सुनेत्रा पवार यांनी देखील सर्व पदाधिकाऱ्यांना भावनिक आवाहन करत पूरग्रस्त नागरिकांना मदत करण्याचे आवाहन केले आहे.

अजित पवार प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतील आणि पूरग्रस्त जिल्ह्यांमध्ये त्वरित व प्रभावी मदत उपाययोजना राबवण्यात येतील याचीही त्यांनी खात्री दिली आहे. सध्या राज्य प्रशासनाचे संपूर्ण लक्ष मराठवाड्यातील जनतेवर केंद्रित असून, अजित पवार स्वतः मदत व बचाव कायार्चे नेतृत्व आणि देखरेख करतील.

याआधी खडकवासला येथे 24 सप्टेंबर रोजी नियोजित जनसंवाद कार्यक्रम आणि 25 सप्टेंबर रोजी होणारा राष्ट्रवादी परिवार मिलन कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे. या कार्यक्रमांच्या नव्या तारखा लवकरच जाहीर केल्या जाणार आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली आहे.



मराठवाड्यातील पूरग्रस्त भागात सध्या नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे, पाण्याखाली गेलेले घर आणि रस्त्यांचे नुकसान पाहणे, तसेच अन्न, औषधे आणि प्राथमिक गरजा तातडीने उपलब्ध करणे या सर्व कामकाजासाठी प्रशासन सतत कार्यरत आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार या कार्यात प्रत्यक्ष सहभागी होऊन पूरग्रस्त नागरिकांना मदत करण्यास पुढाकार घेत आहेत. राज्यभरात पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या या निर्णयामुळे प्रशासन व स्थानिक प्रशासनाचे कार्य अधिक गतिमान होईल, तसेच नागरिकांना जलद मदत मिळण्याची शक्यता वाढेल. मराठवाड्यातील जनता प्रशासनाकडून तत्काळ मदत मिळवण्याची अपेक्षा व्यक्त करत आहे.

# केंद्र शासनाच्या योजनांची अंमलबजावणी करा : खा. संजय देशमुख

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २३ :

केंद्र शासनाच्या वतीने अनेक लोकोपयोगी योजना राबवण्यात येतात. या योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करा. विकासकामे करताना अनावश्यक विलंब होऊ नये तसेच कामे गुणवत्तापूर्वक करा, असे निर्देश खा.संजय देशमुख यांनी दिले.



जिल्हा विकास समन्वय समितीची बैठक

जिल्हा परिषदेच्या वसंतराव नाईक सभागृहात जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीची बैठक समितीचे अध्यक्ष खा. देशमुख यांच्या अध्यक्षतेत आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार बाळासाहेब मांगुळकर, आमदार संजय देरकर, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, यांच्यासह इतर विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. यावेळी खा. देशमुख यांनी केंद्र शासनाच्या विविध योजनांचा विभागनिहाय सविस्तर आढावा घेतला. विविध योजनेची अपूर्ण विकासकामे तत्काळ पुर्ण करावीत, असे त्यांनी सांगितले. कृषी, पंचायती राज मंत्रालय, आवास, अटल नवी करण व शहरी परिवर्तन मिशन, प्रधानमंत्री आवास योजना, राष्ट्रीय पशू रोग नियंत्रण, महिला व बाल विकास विभागाचे बालगृह, बाल विवाह, भुमी व संसाधन विभाग आदी विभागांशी निगडीत कामकाजाची माहिती घेत निर्देश दिले. बैठकीत प्रत्येक विभागाने आपल्याकडील योजनांची सद्यस्थिती, प्रगती अहवाल व अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी सादर केल्या. त्यावर खा. संजय देशमुख यांनी सखोल चर्चा करत सूचना दिल्या. प्रधानमंत्री घरकुल योजनेची घरे पुर्ण करण्यासोबतच जिल्ह्यात डेअरी व्यवसाय कसा वाढता येईल, याबाबत त्यांनी संबंधित विभागास निर्देश दिले.

काही योजनांचा निधी वितरण, निविदा प्रक्रिया आणि प्रशासकीय मंजुरी मध्ये होणाऱ्या अडथळ्यांवर उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी विविध विभाग प्रमुखांनी कामकाजाची सद्यस्थिती सादर केली. काही अडचणी, निधीची मागणी व आवश्यक सहयोग यावरही चर्चा झाली. केंद्र शासनाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या योजना सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणाऱ्या असल्याचे या योजना अधिकाधिक चांगल्या पद्धतीने राबवण्याचे निर्देश खा.देशमुख यांनी दिले.

# वाशीम-शेलूबाजार मार्गावर रस्त्याच्या कडा भरतीमध्ये टाकली काळी माती

■ महासागर प्रतिनिधी
मंगरुळपीर , दि. २३ :

वाशीम ते शेलूबाजार या ३४ किलोमीटर अंतराच्या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम हाती घेऊन आता तीन ते चार वर्षांचा कालावधी उलटून गेला आहे. या दरम्यान बहुतांश काम पूर्ण झाले असले तरी पिंप्री ते चिखली अवघ्या ९ किलोमीटरच्या टप्प्याचे रुंदीकरण रखडले आहे. परिणामी मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांचे हाल होत आहे. कधी पूर्ण होणार या रस्त्याचे रुंदीकरण, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.



गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून टप्प्यावर देखभाल-दुरुस्तीच्या नावाखाली रस्त्याच्या कडांना काळ्या मातीचा भराव टाकण्याचे काम केले गेले. मात्र या मातीवर आवश्यक ती दबाई न झाल्याने रस्त्याच्या कडे सैलसर व धोकादायक स्वरूपात राहिले आहेत. दुचाकी व छोटे वाहनधारकांना बाजू घेताना अक्षरशः जीव मुठीत धरावा लागत आहे. अपघातांची शक्यता कायम आहे. या अंतर दरम्यान अनेक ठिकाणी वाहनधारकांना कसरत करत प्रवास करावा लागत असल्याचे दिसून आले. देखभाल-दुरुस्ती या नावाखाली केवळ खानापुर्तीची कामे केली जात आहे.

सार्वजनिक निधीचा अपव्यय होत असल्याचा वाहनधारकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, वाशीम-शेलूबाजार मार्गावरील बहुतांश रुंदीकरण पूर्ण झाले तरी पिंप्री-चिखलीटप्पा गेल्या ३ ते ४ वर्षांपासून रखडलेला आहे. तसेच संबंधितांवर कठोर कारवाई करावी.

हा मार्ग तातडीने रुंद, मजबूत करून प्रवाशांना दिलासा मिळवून द्यावा. परिसरातील जनतेने या प्रश्नाकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष वेधत तातडीने पावले उचलण्याची मागणी केली आहे. अन्यथा नागरिकांना न्याय मिळावा यासाठी मोठ्या प्रमाणावर आंदोलन उभारले जाईल, असा इशारा देण्यात येत आहे.

# कार्यालय नगर पंचायत भिवापुर

## मालमत्ता फेरफार जाहीरनामा

जा.क्र. कवि/जाहीरनामा-५/कात्री ७७० /२०२५ — दि. २३/०९/२०२५

सर्व नागरीकांना या व्दारे सूचित करण्यात येते की. न.पं. भिवापुर मालमत्ता दस्ताऐवज नोंद नुसार रकाना क्र. ५ मध्ये दाखविण्यात आलेली मालमत्ता खरेदी / बक्षिस / वाटणी / मृत्युपत्रा व्दारे खालील अर्जदारांनी सदरहु मालमत्ता स्वतःचे नावे करण्याबाबत कर विभाग न.पं. भिवापुर कार्यालयात म.न.प.न. पं.व औ. न. अधिनियम १९६५ चे कलम १३० अन्वये अर्ज दाखल केले आहे.

याबाबत कोणाला आक्षेप घ्यावयाचा असेल त्यांनी जाहीरनामा प्रसिध्दी पासुन ७ दिवसांचे आंत पुराव्यानिशी लेखी आक्षेप मुख्याधिकारी न.पं. भिवापुर यांचे कार्यालयात सादर करावा. मुदंतीच्या आंत पुराव्यानिशी लेखी आक्षेप सादर न झाल्यास आक्षेप नाही असे गृहीत धरुन नियमा नुसार सर्व प्रकारचे आवश्यक शुल्क वसुल करून अर्जदाराचे नावांने नोंद घेण्यात येईल. मुदंती नंतर प्राप्त आक्षेप विचारात घेण्यात येणार नाही. याची सर्वानी नोंद घ्यावी.

| अ.क्र | सद्या ज्या नावावर मालमत्ता आहेते नांव | ज्या नांवावर मालमत्ता हस्तांतर करावयाचे आहेते नाव | वार्ड क्रमांक | मालमत्ता क्रमांक | लेखाचे प्रकार | मालमात्तेचे प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुक्ताबाई चंद्रकांत नागोसे<br>चंद्रकांत नारायण नागोसे | सुरेश चंद्रकांत नागोसे<br>नलिनी हेमराज कावरे<br>अशोक चंद्रकांत नागोसे<br>माधुरी विनायक निकुळे<br>रेणुका साक्षातकार राखडे | 0३ | १९९४३ | आखीव पत्रिका व वारसान शपथपत्र | न.मु.क्र.६0२ |
| २ | बळीराम पांडूरंग कुरुटकर | तुळसाबाई बळीराम कुरुटकर<br>विलास बळीराम कुरुटकर<br>अतुल बळीराम कुरुटकर<br>अनुय बळीराम कुरुटकर<br>अश्वीनी बळीराम कुरुटकर | 0३ | १७४३ | आखीव पत्रिका व वारसान शपथपत्र | न.भु.क्र.८0४ |
| ३ | दादा पांडुरंग कुरुटकर | सयत्रा दादाराव कुरुटकर<br>गुरुदास दादाराव कुरुटकर<br>शालु गजानन लोहारे | 0३ | १७४२ | आखीव पत्रिका व वारसान शपथपत्र | न.मु.क्र.८0४ |
| ४ | नरेश देवराव चिचमलकर | प्रेमा नरेश चिचमलकर<br>तुषार नरेश चिचमलकर<br>निलेश नरेश चिचमलकर | 0३ | १९६२ | आखीव पत्रिका व वारसान शपथपत्र | न.भु.क्र.५३७ |
| ५ | नरेश देवराव चिचमलकर | प्रेमा नरेश चिचमलकर<br>तुषार नरेश चिचमलकर<br>निलेश नरेश चिचमलकर | 0३ | १९६१ | आखीव पत्रिका व वारसान शपथपत्र | न.भु.क्र ५३६ |
| ६ | सुरेश मोतीराम शेडे | प्रशांत यशवंत खांदे | २ | ४३८५ | विक्रीपत्र व ७/१२ | भु.क्र. ३८४/ १/१/३९ |
| ७ | कमला नामदेव कावळे व इतर ८ | नेहा रवी ठाकरे | ५ | ३११८ | विक्रीपत्र व आखीव पत्रीका अन्वये | न.भु.क्र.१४१९ |
| ८ | रक्षा अनिल दुधपचारे व रेखा सांबा कोतकेलवार | रक्षा अनिल दुधपचारे | २ | ४४५४ | आपसी वाटणी लेख ७/१२ | भु.मा.क्र. ३५२/६३ |
| ९ | रक्षा अनिल दुधपचारे व रेखा सांबा कोतकेलवार | रेखा सांबा कोतकेलवार | २ | ४४५४ | आपसी वाटणी लेख ७/१२ | भु.मा.क्र. ३५२/६३ |
| १० | शासकीय पट्टा | तुळशिदास पंजाबराव चिमुरकर | २ | नविन | तहसिल कार्यालयाचे पट्टा आदेश भु.खं क्र.१५0/C | भु.मा.क्र.३८७ |
| ११ | नारायण केवु राणे | रेखा इश्वर रंदई दामोधर नारायण राणे | ४ | २७३0 | वारसान शपथपत्र | |
| १२ | शासकीय पट्टा | रामदास योगेश्वर शेंडे | २ | नविन | तहसिल कार्यालयाचे पट्टा आदेश भु.खं क्र.१३१ | भु.मा क्र. ३८७ |
| १३ | विद्या भालचंद्र सोनटक्क | परसराम मारोती सोनुने | २ | ४५४१ | वारसान शपथपत्र | भु.क्र.८0९/११ |
| १४ | सोमा चंपा बन्सोड | वेणु सोमा बन्योड<br>अशोक सोमा बन्सोड<br>सिमा सोमा बन्सोड<br>सविता मंगीलाल मेश्राम | २ | २७६१ | वारसान शपथपत्र | |
| १५ | अशोक गणपत पिपरे | माया अशोक पिपरे<br>दर्शणा अशोक पिपरे<br>नव्या अशोक पिपरे | ४ | ४0२४ | वारसान शपथपत्र | |
| १६ | संदिप दामोधर तिडके व इतर ८ | अनित शरद तिडके<br>मंगेश शरद तिडके | ६ | ३४८५ | आखीव पत्रीका व विक्रीपत्र | न.मु.क्र ७७४ |
| १७ | वसंता काशिनाथ सोनडवले | अंकुश वसंता सोनडवले<br>राज वसंता सोनडवले<br>शिल्पा रोहीत राऊत | ४ | २७७४ | वारसान शपथपत्र | |
| १८ | वासुदेव पांडुरंग तिजारे | शंकुतला वासुदेव तिजारे<br>विनोद वासुदेव तिजारे<br>राहुल वासुदेव तिजारे<br>रुपाली अभय काकडे | २ | ७८९ | आखीव पत्रीका व वारसान शपथपत्र | न.मु.क्र. १६८0/२0 |
| १९ | शंकुतला वासुदेव तिजारे<br>वसुदेव पांडुरंग तिजारे | शंकुतला वासुदेव तिजारे<br>विनोद वासुदेव तिजारे<br>राहुल वासुदेव तिजारे<br>रुपाली अभय काकडे | ५ | ३0६३ | आर्खाव पत्रीका व वारसान शपथपत्र | न.मु.क्र. १५0२/२ |
| २0 | मारोती कृषर्षी उद्योग (आ.मु.जयंत शरदचंद्र खडके ) | अविनाश शरदचंद्र खडके | २ | १७१९ | विक्रीपत्र व ७/१२ | भु.क्र.३३३/२ |
| २१ | सिंधुताई दामोधर समर्थ व इतर २ | सिंधुताई दामोधर समर्थ व इतर २ | २ | ११३0 | आखीव पत्रिका, शपथपत्र नुसार वाटणी | भु.क्र.३ |
| २२ | नंदा बळीराम दिघोरे<br>बळीराम किसन दिघोरे | नागो बळीराम दिघोरे | ६ | ३६0३ | आखीव पत्रीका व विक्रीपत्र | न.भु.क्र.७0५ |
| २३ | कोटीराम भा. पांडुरंग रामाजी खळे | मदन कोठोराम खडे<br>ईश्वर कोठीराम खडे<br>प्रकाश कोठीराम खडे<br>सुशील मधुकर सोरते | 0३ | १९३0 | आखीव पत्रीका व शपथपत्र | न.भु.क्र.८0७ |
| २४ | रमन श्रीहरी चिमूरकर व इतर २ | धमेन्द्र शंकरराव लोहकरे | २ | | विक्रीपत्र व ७/१२ द | भु. क्रञ ३८४/१/१/३५ |
| २५ | कमलाबाई श्रीहरी बोराडे<br>श्रीहरी विठोबा बोराडे | वासुदेव श्रीहरी बोराडे | ६ | ३५५३ | वारसान शपथपत्र | |

(मिलींद साटोणे)
मुख्याधिकारी
नगर पंचायत, भिवापुर

# रोहना बॅरेज प्रकल्पांतर्गत बाधितांचा पुनर्वसनासाठी उमा नदीवर आक्रोश

■ महासागर प्रतिनिधी
मूर्तिजापूर , दि. २३ :

'भूलथापांच्या ओंजळीने आश्वासनांचे पाणी गेल्या सोळा वर्षांपासून शासन तसेच लोकप्रतिनिधी यांच्या माध्यमातून रोहना बॅरेज प्रकल्पांतर्गत बाधित असलेले रोहणा गावातील नागरिकांना पाजल्या जात आहे. कुठल्याही सुविधा मिळत नसल्याने त्रस्त झालेल्या संतप्त गावकऱ्यांनी नदीच्या पात्रात आक्रोश मोर्चा काढून आपला संताप व्यक्त करून शासनाचे लक्ष वेधले. लवकरात लवकर पुनर्वसन व १६ वर्षांपासून रखडलेल्या प्रकल्पाचे काम पूर्ण करावे, अशी मागणी केली आहे. अन्यथा याकरिता बेमुदत उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे. रोहना येथे उमा नदीवर बॅरेज प्रकल्प मंजूर झाला आहे. त्यामध्ये बुडीत क्षेत्रात रोहना गाव येत



असल्याने गावाचे पुनर्वसन शासनाने करणे अपेक्षित होते.परंतु गेल्या जवळपास १६ वर्षांपासून आश्वासनांची खैरात वाटणाऱ्या शासनाने दर गावातील रहिवाशांना वाऱ्यावर सोडले. गावामध्ये कुठलेही विकासकामे नाही, सुविधा नाहीत, त्यामुळे गावकरी त्रस्त झाले असून त्यांच्या संयमाचा बांध ढासळू लागला आहे. दिलेल्या आश्वासनावर शासन कायम राहिले नाही. अद्यापही त्यांचे पुनर्वसन न केल्याने रोहना येथील प्रकल्पग्रस्त संतप्त गावकऱ्यांनी आपल्या हक्काकरिता उमा नदी तीरावर जनआक्रोश मोर्चा नेऊन शासनाच्या व लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षित दिरंगाईबाबत तीव्र संताप व्यक्त केला. या प्रकल्पातील पोही गाव देखील असेच उपेक्षित आहे. पोही गावाच्या पुनर्वसनाकरिता संपादित केलेल्या जमिनीबाबत देखील उलट सुलट चर्चा होत आहे. उमा नदीवरील रोहना बॅरेज प्रकल्प याआधीच वादाच्या भोवऱ्यात सापडलेला आहे. त्यामुळे जवळपास ३0 ते ३५ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे?. उमा नदीवरील रोहना बॅरेज प्रकल्पाच्या बांधकामाचे भूमिपूजन २४ ऑगस्ट २00९ रोजी करण्यात आल्याची माहिती मिळाली.

भूमिपूजनापूर्वी जमीन संपादित करणे व बाधित गावांचे पुनर्वसन शासनाची जबाबदारी असताना देखील गेल्या थोड्या थोडक्या नव्हे तर तब्बल १६ वर्षांपासून शासनाच्या आणि लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेमुळे गावांचे पुनर्वसन रखडले असल्याचे दिसून येत आहे. शासनामार्फत रोहना येथील नागरिकांना विविध भूलथापा व आमिष देऊन अत्यल्प दरात गरीब शेतकऱ्यांकडून जमिनी खरेदी करून घेतल्या. आमच्या चांगुलपणाचा शासनाने गैरफायदा घेत फसवणूक केली, असा आरोप रोहना येथील नागरिकांनी केला आहे. आता बेमुदत उपोषणाचा ग्रामस्थांनी दिला इशारा एकीकडे शासनाने शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करून घेतल्या तर दुसरीकडे प्रकल्प ही रखडला त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. गोरगरीब रोजगार मिळवण्याकरिता पायपीट करत असल्याचे दिसून येते. प्रकल्प तातडीने पूर्ण करा.

# धनगर समाजाचे निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
चिखली, दि. २३ :

मुख्यमंत्री फडणवीस हे सन २0१४ मध्ये बारामती येथे धनगर समाजाच्या लाखोंच्या जन-समुदयाला उपोषणकर्तेसह संबोधित करतांना म्हणाले होते की, माझा धनगर एस.टी. आरक्षणा बाबतीत फार अभ्यास झाला असुन या बाबत माझ्याकडे धनगर एस.टी. आरक्षण बाजुने पुष्कळ असे पुरावे आहेत. आता पर्यतच्या राज्यकर्त्यानी धनगरांचा फक्त मतापुरता वापर केलेला आहे. तुम्ही आम्हाला या राज्याच्या सत्तेवर बसवा आमची सत्ता आल्यास पहिल्या कॅबिनेट बैठकीत आम्ही घटनादत्त धनगर एस.टी. आरक्षणाची अंमलबजावणी करतो. या आश्वासन मुख्यमंत्र्यांनी पाळावे, तसेच धनगर समाजाचे नेते दिपक बोऱ्हाडे यांचे उपोषण सोडवावे, अशी मागणी चिखली तालुका सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने करण्यात आली. सोमवार २२ सप्टेंबर रोजी चिखली तहसिलदारामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद आहे की, दिपक बोऱ्हाडे, हे १७ सप्टेंबर पासुन जालना येथे उपोषणास बसले आहे. त्यांचा उपोषणाचा ६ दिवस आहे, अजून पर्यंत आपण या उपोषणाची,आदोंलनाची दखल घेतली नाही. आपण २ दिवसाच्या आत धनगर जमातीच्या एस. टी. आरक्षणाची अंमलबजावणी करुन दिपक बोऱ्हाडे यांचे उपोषण तात्काळ सोडवावे, अन्यथा बोऱ्हाडे सांगतील त्या पध्दतीने तसेच धनगर बाण्याने राज्यभरात तिव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला.

धनगर समाज महासंघ जिल्हाध्यक्ष कडुबा गवारे, जिल्हा सल्लागार प्रदिप हाके, चिखली तालुका अध्यक्ष दत्ता आदबाने, चिखली शहर उपाध्यक्ष आकाश घोलप, नारायण हाके, सनी संजय पांढरे, संतोष थोरात, शिवा देव्हडे, सागर खरात, विजय सोरमारे, संतोष हाके, विलास खरात, गजानन जोशी उपस्थित होते.

# रिसोडची पिंगलाक्षी देवी भाविकांचे श्रद्धास्थान

रिसोड : विदर्भातील वाशीम जिल्ह्यातील रिसोड नगरी ही ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेसाठी ओळखली जाते. या नगरीचे वैशिष्ट्य म्हणजे येथील आराध्य दैवत श्री पिंगलाक्षी देवी. अनेक पिढ्यांपासून भाविकांची श्रद्धा व विश्वास यांचा केंद्रबिंदू असलेल्या या मंदिरामुळे रिसोड नगरीला विशेष ओळख मिळाली आहे.



धार्मिक आख्यायिकेनुसार या प्रदेशात प्राचीन काळी ऋषी-मुनींनीकठोर तपश्चर्या केली. ऋषींच्या तपोबलामुळे येथे दिव्य शक्ती प्रकट झाली. पिंगलाक्षी देवीचे प्रकटस्थान घडले. ऋषींच्या पत्नींनीही येथे साधना केली असल्याचे पुराणात उल्लेख आढळतात. त्यामुळे हे स्थळ अत्यंत पवित्र मानले जाते. शहराच्या दक्षिण भागात रमणीय तलावाच्या काठावर पिंगलाक्षी देवीचे भव्य मंदिर वसलेले आहे. शांत, प्रसन्न आणि आध्यात्मिक वातावरण लाभलेला हा परिसर भक्तांना आकर्षित करतो. मंदिरातील देवीची मूर्ती लाल गेरूमध्ये शोभून दिसते. नवरात्रोत्सव काळात देवीचा अलंकार व सजावट पाहण्यासाठी भाविकांची प्रचंड गर्दी होते. नवरात्र उत्सव हा पिंगलाक्षी देवीच्या मंदिरातील प्रमुख सोहळा आहे. या काळात मंदिर परिसरात अभिषेक, सप्तशती पठण, होम-हवन,सुंदरकांड, भजन, कीर्तन आणि सत्संगाचे आयोजन केले जाते. भाविक सकाळपासून रात्रीपर्यंत मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. मंदिराजवळील तलावामुळे वातावरण अधिक मनोहर भासते. या उत्सवाच्या काळात रिसोड शहरात भक्तिमय वातावरण निर्माण होते. मंदिर परिसरात विविध दुकाने, फुलांची मंडई, खेळणी व खाद्यपदार्थांच्या गाड्या लागतात. त्यामुळे नवरात्रोत्सवाचे रूपांतर एका सांस्कृतिक मेळाव्यात होते. स्थानिक व्यावसायिकांसाठी हा काळ उपजीविकेचे साधन ठरतो. पिंगलाक्षी देवीचे दर्शन घेतल्यावर भाविकांच्या मनात श्रद्धा दृढ होते. अनेक भक्त आपली मनोकामना पूर्ण झाल्यावर देवीला नैवेद्य अर्पण करतात. देवीचे दर्शन घेतल्याने अध्यात्मिक समाधान, मनःशांती, उन्नत विचारांचा अनुभव येतो. गेल्या काही वर्षांत मंदिर परिसराचा मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. तरीदेखील अजूनही रस्ते, घाट, स्वच्छता व्यवस्था आणि भाविकांसाठी निवासाची सोय करण्याची आवश्यकता आहे. शासन, नगरपरिषद तसेच स्थानिक भाविक मंडळी यांच्या संयुक्त प्रयत्नातून या पवित्रस्थळाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याची अपेक्षा आहे.

# शेतकऱ्याने १० एकरातील पिकात चारल्या शेळ्यामेंढ्या

शेतकऱ्याने केला शासनाचा निषेध



तिवसा: अतिवृष्टीमुळे जिल्ह्याच्या अनेक भागातील शेतकऱ्यांचे सोयाबीन व तुरीचे पीक हातातून गेले, तर कपाशीची स्थिती दयनीय झाली आहे. मात्र शासनाकडून अद्याप शेतकऱ्यांना दमडहीचीही मदत झाली नाही. काही भागात तर सर्वेक्षणही झाले नाही. त्यामुळे तिवसा तालुक्यातील शेंदोळा बु. येथील शेतकरी दयाराम राठोड यांनी शासनाचा निषेध नोंदवण्यासाठी महसूल प्रशासनाला पत्रिका देऊन सोमवारी (दि. २२) घटस्थापनेच्या दिवशी उभ्या पिकावर ट्रॅक्टर फिरवला, तर शेतातील काही भागात शेळ्या-मेंढ्या चराईसाठी सोडल्या. शेंदोळा येथील दयाराम रोठोड व अन्य काही शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे वारंवार निवेदन, भेटी दिल्या. परंतु कोणीही शेतात सर्वेक्षणासाठी आले नाही, असा आरोप शेतकरी राठोड यांनी केला आहे. तसेच आतापर्यंत शासन व प्रशासनाकडून कुठलीही मदत मिळाली नाही. त्यामुळेच दयाराम राठोड यांनी शासनाचा निषेध व्यक्त करण्याचा निर्णय घेत दहा एकर शेतात पेरणी केलेल्या तूर व सोयाबीन पिकावर ट्रॅक्टरद्वारे रोटाव्हेटर फिरवण्याचा कार्यक्रम ठेवला होता. या कार्यक्रमाच्या त्यांनी पत्रिका छापल्या, काही पत्रिका कृषी व तहसीलमध्ये जाऊन स्वत: अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच सोमवारी दुपारी १ वाजता शेतातच दुर्गादेवीच्या प्रतिमेचे पूजन करून शेतकरी बांधवांच्या उपस्थितीत राठोड यांनी दहा एकर शेतातील सोयाबीन व तूर पिकात शेळ्या, मेंढ्या चरण्यासाठी सोडल्या आणि पिकांवर रोटाव्हेटर फिरवून शासनाचा निषेध केला. या प्रसंगातून शेतकरी दयाराम राठोड यांचा आक्रोश स्पष्ट दिसला.

# यांच्या डोक्यातील 'चीप'चं काय?



काँग्रेसचे खासदार तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेता राहुल गांधी सातत्याने मतचोरीचे आरोप करीत सुटले आहेत. मागच्या आठवड्यात गुरूवारीही त्यांनी पत्रपरिषद घेत सत्ताधारी पक्षांवर मतचोरीचे आरोप केलेत. निवडणूक आयोग या प्रकाराला पाठीशी घालत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. राहुल गांधी यांनी सुरूवातीला मतचोरीचे आरोप केल्यानंतर निवडणूक आयोगाने तर उत्तर दिले नाही. मात्र, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'राहुल गांधी यांच्या डोक्यातील चीप चोरीला गेली' अशा शब्दात टीका केली होती. ते मुख्यमंत्री म्हणून सर्व विभागाचे प्रमुख आहेत, संगणकातील मदर बोर्ड, हार्ड डिस्क, प्रोसेसर आणि इतर सर्व सुट्या भागांचेही त्यांना ज्ञान असावे. परंतु, त्यांच्याच पक्षाच्या काही महाभागांनी कंबरेचे सोडून डोक्याला गुंडाळले आहे, अत्यंत हीन पातळीवर विरोधकांवर टीका करतातहेत. तेंव्हा यांच्या डोक्यातील 'चीप' चं काय? ती करप्ट झाली की डॅमेज? हे देखील माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगायला हवे.

---------------

गेल्या काही महिन्यात भाजपाचे एक मंत्री नितेश राणे आणि याच पक्षाचे एक आमदार गोपीचंद पडळकर यांनी वाचाळवीरांचेही सर्व रेकॉर्ड तोडल्याचे दिसून येते. शाळांमध्ये 'वराह पूजन' करण्याचे आदेश काढा, अशी मागणी करणारे नितेश राणे यांनी आपली बौद्धीक पातळी दाखवून दिली आहे. इतर अनेक प्रकरणे आणि वक्तव्यातून यापूर्वीही त्यांची बौद्धीक दिवाळखोरी या राज्याने पाहिली आहेच. त्यामुळे, नितेश राणे यांचे वक्तव्य आणि त्यांच्या मागण्या कुणीही फारशा गांभिर्याने घेत नाहीत.

पक्षाचा हा मंत्री वाह्यात बोलतो काय? मग मी त्याच्यापेक्षा कमी नाही, हे या गोपीचंद पडळकर नावाच्या आमदाराला कदाचित वाटले असावे. म्हणूनच, त्यांनी सर्व मर्यादा ओलांडून शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंतराव पाटील यांच्यावर अत्यंत हीन आणि खालच्या शब्दात टीका केली.

कुठे जयंत पाटील आणि कुठे हा गोपीचंद? माणसाने किमान आपली राजकीय ऊंची पाहून तरी बोलावे ना. गेल्या तीन दशकाहून अधिक काळ जयंत पाटील राजकारणात आहेत. १९९९ मध्ये काँग्रेस सोडून शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली, तेंव्हापासून जयंत पाटील त्यांच्यासोबत आहेत. ग्रामविकास, वित्त आणि इतर अनेक खात्याचे मंत्रीपद त्यांनी सांभाळले.

**पंचनामा**
**■ मनोज बागडे**

मागील काही वर्षात पक्षफुटीला उधाण आले असताना आणि खुद्द शरद पवारांचा पक्ष फुटला असताना जयंत पाटील निष्ठा बाळगून राहिले. अत्यंत सभ्य, सुसंस्कृत, संयमी, अभ्यासू, भाषेवर प्रभुत्व आणि शब्दावर नियंत्रण असणारा हा नेता त्यांच्या पक्षात लोकप्रिय तर आहेच, पण विरोधी पक्षातील नेतेही त्यांचा आदर करतात.

त्याच जयंत पाटील यांच्यावर टीका करताना 'जयंत पाटील हा राजारामबापू पाटील यांची औलाद वाटत नाही', अशा अश्लाघ्य शब्दांचा वापर पडळकरांनी केला अर्थात, हा गोपीचंद पहिल्यांदाच असे बरळला, असे नव्हे. तर यापूर्वी त्यांनी शरद पवार म्हणजे महाराष्ट्राला लागलेला कोरोना आहे, शरद पवार यांना ८० वर्षानंतर अक्कल येवू लागली आहे, अशी टीका केली होती. रोहित पवाराला त्यांनी औरंगजेब वृत्तीचा असल्याचे म्हटले होते. या वाचाळवीरांच्या यादीत आणखी एक नाव आहे 'मनोहारी किडे'. पण, तो थेट पक्षाचा नाही. खरे तर, नितेश राणे असोत किंवा पडळकर असोत, विरोधी पक्षातील नेत्यांवर टीका करताना भान सोडणाऱ्या या पुढाऱ्यांच्या गळ्यात मुख्यमंत्र्यांनी वेळीच पट्टा बांधायला हवा होता.

मात्र, सुरूवातीच्या काळात त्यांनी असे काही केले नाही. यावरून, पाळलेल्या श्वानांना केवळ भुंकण्यासाठी तेवढे ठेवले आहे काय? अशी शंका तमाम महाराष्ट्रवासियांना येणे स्वाभाविक आहे.

आमदार गोपीचंद पडळकर यांनी यापूर्वी केलेल्या टीकेला शरद पवार यांच्या पक्षाने फारसे गांभिर्याने घेतले नाही. परंतु, आता जयंत पाटील यांच्यावरची टीका अतिरेकी आणि खोलवर जखम करणारी होती. परिणामी, खुद्द शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट फोन करून कैफियत मांडली.

शरद पवार यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर मुख्यमंत्र्यांनी माध्यमांसमोर येत, गोपीचंद पडळकर आक्रमक नेते आहेत, त्यांचे भविष्य उज्वल आहे, बोलताना त्यांनी भान राखले पाहिजे, अशी मिळमिळीत प्रतिक्रिया दिली. पडळकरांचे कान उपटले... पडळकरांना तंबी... वगैरे शिर्षकाच्या बातम्या कुठेच आल्या नाहीत. यावरून काय समजायचे?

भाजपा हा शिस्तबद्ध, सभ्य आणि सुसंस्कृत लोकांचा पक्ष मानला जातो. किमान तसा प्रचार केला जातो. परंतु, राणे, पडळकर सारख्या नेत्यांचे वक्तव्य आणि जिव्हारी लागणाऱ्या टीका पाहिल्या की, पक्षाचा सुसंस्कृतपणा आता भुतकाळ झाला की काय? अशी शंका यायला लागते.

याच महिन्याच्या सुरूवातीला बिहार राज्यात प्रचार सभेत काँग्रेस आणि आरजेडीच्या काही नेत्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याविषयी अपशब्दांचा वापर केला होता. हा विषय भाजपाने उचलून धरला, पाटण्यात काँग्रेस कार्यालयावर हल्ला केला, राहुल गांधींच्या नावाने शिमगा केला गेला, त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचीही मागणी झाली.

परंतु, याच भाजपाचे मंत्री आणि आमदार विरोधी पक्षाच्या नेत्यांवर पातळी सोडून टीका करतात? त्याचे काय? याचे समर्थन कसे करता येवू शकते.

जयंत पाटील यांच्यावरील विखारी टीकेनंतर राज्यभरात पडळकरविरोधात संतापाची लाट उसळली. ठिकठिकाणी त्यांच्या प्रतिमांना चपलेने बदडण्यात आले. पुतळे जाळण्यात आले. शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी मनात आणले तर ते रस्त्यात पडळकर यांनाही तुडवू शकतात. परंतु, त्यांनी संयम बाळगला आहे, सभ्यता कायम ठेवली आहे.

पडळकर, राणे यांच्या अशा टीकेने समाजातील वातावरण कलुषित होत चालले आहे, सामाजिक सलोखा धोक्यात येवू लागला आहे, राजकारणाची पातळी किती खालावली, याचा प्रत्यय येवू लागला आहे. शरद पवार महाराष्ट्र पेटवायला निघाले आहेत, अशी टीका करणाऱ्यांनी आधी आपल्या पक्षातील या जळत्या टेंभ्यांना आवरायला हवे.

मतचोरीचे आरोप करणारे राहुल गांधी यांच्या डोक्यातील चीप चोरीला गेली की शाबूत आहे, हे राहुल गांधी पाहतील. परंतु, भाजपात आलेल्या किंवा आणल्या गेलेल्या राणे, पडळकर यांच्या डोक्यातील 'चीप' सद्ध्यातरी ओके दिसत नाही. ती करप्ट अथवा डॅमेज झाली असेल तर मुख्यमंत्र्यांनी बदलायला हवी.

तथापि, विरोधकांवर टीका करण्याचा आणि केवळ भुंकण्याचाच डेटा त्या चीपमध्ये हेतुपुरस्सर अपलोड केला असेल तर मात्र नाईलाज आहे. तसे असेल तर राणे, पडळकरांनी वेळीच ही चीप बदलून टाकायला हवी.

# पाकिस्तान, सौदी करार आणि भारत!

१७ सप्टेंबरला पाकिस्तान आणि सौदी अरेबिया यांच्यात जो करार करण्यात आला (स्ट्रॅटेजिक म्युच्युअल डिफेन्स ॲग्रिमेंट) त्या कराराचे दक्षिण आणि पश्चिम आशियामधील राजकारणावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतात. पाकिस्तानचे पंतप्रधान शहाबाज शरिफ आणि सौदी अरेबियाचे क्राऊन प्रिन्स मोहंमद बिन सलमान यांच्यात झालेल्या मिलिटरी पॅक्टमुळे भारतावर त्याचा काय परिणाम होईल हे पाहण्यापूर्वी काही महत्वाच्या गोष्टींचा उहापोह करावा लागेल.

------------

या करारानुसार पाकिस्तान अथवा सौदी अरेबिया यांच्यावर एखाद्या देशाने आक्रमण केल्यास ते आक्रमण दोन्ही देशांवरील आक्रमण समजले जाईल. अर्थात लष्करी संबंधांच्या बाबतीत विचार केला तर १९६० पासूनच पाकिस्तान आणि सौदी अरेबिया यांच्यात लष्करी संबंध आहेत. या मधल्या काळात पाकिस्तानने सौदी अरेबियाच्या पायलट्सना प्रशिक्षण दिलेले आहे. तसेच सौदी अरेबियामध्ये गेली अनेक वर्षे पाकिस्तानचे सैनिक तैनात करण्यात आले आहेत. पाकिस्तानने वेळोवेळी सौदी अरेबियाला शस्त्रास्त्र पुरवठा केलेला आहे. या दोन देशांत १९८२ साली झालेल्या करारानुसार पाकिस्तानचे सैनिक सौदी अरेबियात सातत्याने तळ ठोकून आहेत.



अभय गोखले

अलिकडच्या काळातील आकडेवारीनुसार साधारणपणे दोन हजारच्या आसपास पाकिस्तानी सैनिक सौदी अरेबियात तैनात आहेत.

हे सर्व लक्षात घेता पाकिस्तान आणि सौदी अरेबिया यांच्यात नुकताच जो करार करण्यात आला, त्यामध्ये नवे काय आहे,असा प्रश्न कुणालाही पडणे स्वाभाविक आहे. अर्थात यामध्ये दडलेली महत्वाची गोष्ट अशी आहे की,या करारामुळे, पाकिस्तानचा दुहेरी फायदा होणार आहे.

सौदी अरेबियाकडून पाकिस्तानकडे जो पैशांचा ओघ वळवला जाईल त्या पैशातून पाकिस्तानला अमेरीकेकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रे खरेदी करता येतील,शिवाय पाकिस्तानची कोलमडलेली अर्थव्यवस्था काही प्रमाणात सावरु शकेल.

या कराराला पार्श्वभूमी आहे ती म्हणजे काही दिवसांपूर्वी इस्त्रायलने कतारची राजधानी दोहावर केलेल्या हल्ल्याची.हे हल्ले अर्थातच हमासच्या दहशतवाद्यांवर केलेले असले तरी या हल्ल्यामुळे कतार आणि इतर अरब राष्ट्रांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण पसरले आहे.

सौदी अरेबिया हा अमेरिकेचा अगदी निकटचा मित्र असला तरी जेंव्हा इस्त्रायलचा प्रश्न येतो तेंव्हा अमेरिकेला इस्त्रायलपेक्षा कुणीही महत्वाचे वाटत नाही. दोहा वरील हल्ला हा इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या अविवेकी धोरणामुळे करण्यात आला असला तरी त्या हल्ल्याबद्दल, अमेरिकेने उघडपणे नाराजी व्यक्त केलेली नाही, ही गोष्ट प्रकर्षाने लक्षात घ्यायला हवी.

त्यामुळे सौदी अरेबियाला असे वाटणे स्वाभाविक आहे की, आपल्या संरक्षणासाठी केवळ अमेरिकेवर अवलंबून राहणे शहाणपणाचे ठरणार नाही. म्हणुनच सौदी अरेबियाने पाकिस्तान बरोबर सदर करार केला असावा.

खरे पाहता सौदी अरेबियाला धोका आहे तो इस्त्रायलकडून नव्हे तर इराणकडून. इराणने पोसलेले हौथीज सारखे जे दहशतवादी आहेत, त्यांची सौदीला नेहमीच भीती वाटत असते. तेंव्हा इराण आणि इराणने पोसलेल्या दहशतवादी संघटना यांच्या पासून संरक्षण मिळवण्यासाठी सौदी अरेबियाने पाकिस्तान बरोबर सदर करार केला असावा.

आजवर सौदी अरेबियाने पाकिस्तानला मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली आहे. १९८० पासून आजवर सौदी अरेबियाने पाकिस्तानी अर्थव्यवस्थेत ३० बिलियन डॉलर्स इतका पैसा ओतला आहे. आपली आर्थिक स्थिती सुधारण्या व्यतिरिक्त इस्लामीक जगताचा संरक्षक अशी पाकिस्तानची प्रतिमा या करारामुळे निर्माण होऊ शकेल.

१९९८ साली पाकिस्तानने यशस्वीपणे आपली अणूविषयक चाचणी पार पाडल्यानंतर, पाकिस्तानने, आपण इस्लामिक जगताचे संरक्षक असल्याचा दावा केला होता. तेंव्हा असं बोललं जातं होतं की पाकिस्तानच्या अणूविषयक कार्यक्रमाला सौदी अरेबियाकडून अर्थ पुरवठा करण्यात आला होता.

आता, या कराराचा भारतावर काय परिणाम होईल, ते पाहूया. गेल्या काही वर्षांचा इतिहास पाहिला तर, सौदी अरेबिया आणि भारत यांच्यातील संबंध सातत्याने वृध्दिंगत होत असल्याचे आपल्या लक्षात येईल. व्यापाराच्या दृष्टीकोनातून बघितले तर सौदी अरेबिया हा, उलाढालीच्या बाबतीत भारताचा पाचव्या क्रमांकाचा भागिदार आहे.

२०२३ -२४ मध्ये भारत आणि सौदी अरेबिया यांच्यातील द्विपक्षीय व्यापार हा ४३ बिलियन डॉलर्स इतका होता.सौदी अरेबियाच्या दृष्टीने ही भागिदारी इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा महत्वाची आहे.

त्यामुळेच पहलगाम मध्ये अतिरेक्यांनी निरपराध लोकांवर हल्ला केल्यानंतर,त्या हल्ल्याचा सौदी अरेबियाने ताबडतोब निषेध केला होता, मात्र त्याचा बदला घेण्यासाठी भारताने ऑपरेशन सिंदूर या मोहिमेंतर्गत जेंव्हा पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या तळावर हल्ले केले तेंव्हा सौदी अरेबियाने त्यावर टिका करण्याचे टाळले होते.

तेंव्हा सौदी अरेबियाला आपले भारताबरोबरील व्यावसायिक हितसंबंध जपणे ही गोष्ट इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा महत्वाची वाटत असल्याने, पाकिस्तान बरोबर सौदी अरेबियाने जो करार केला आहे,त्याचा भारतावर फारसा परिणाम होण्याची शक्यता दिसत नाही.

सौदी अरेबियाचे खरे शत्रू हे इराण आणि इराणने पोसलेल्या दहशतवादी संघटना याच आहेत. पाकिस्तानकडे अणुबॉम्ब आहे, त्यामुळे त्याच्याकडून सदर करारद्वारे सौदी अरेबियाला जे संरक्षण मिळेल ते अतिशय महत्त्वाचे आहे आणि या कराराचे गुपीत त्यामध्येच दडलेले आहे.

# आरोग्य व्यवस्थेपुढे बदलते संदर्भ



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

**पूर्वार्ध**

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण याचप्रमाणे आरोग्य हा देखील भारतीय नागरिकांचा मूलभूत हक्क आहे, तो अबाधित ठेवणे आज काळाची गरज बनली आहे.

आजघडीला देशाची लोकसंख्या ही जगात सर्वाधिक आहे. मात्र त्यांच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेबद्दल मागासलेपण दिसून येते. नेमके याच दृष्टीने आरोग्य व्यवस्थेत फार मोठे बदल करणे अत्यंत गरजेचे आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या( डब्ल्यूएचओ) म्हणण्यानुसार देशात अजून २५ टक्के ज्यादा डॉक्टरांची गरज आहे. 'रुरल हेल्थ स्टॅटिस्टिक्स'च्या अहवालानुसार महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक आरोग्य यंत्रणेचे विविध वैद्यकीय पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहे. वाढत्या लोकसंख्येच्या सार्वजनिक आरोग्याचा विचार करता आज आरोग्यसेवा अधिक बळकट करणे गरजेचे आहे.

संपूर्ण देशात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचे १९ प्रशस्त रुग्णालये आहेत हे प्रशस्त रुग्णालय दिल्ली, भुवनेश्वर,जोधपुर,पाटणा,रामपूर, ऋषिकेश, मंगलगिरी, नागपूर, कल्याणी, गोरखपूर, भटिंडा, बिलासपुर, गुवाहाटी, देवघर, बिबी नगर, रायबरेली, राजकोट, मदुराई आणि जम्मू अशी १९ एम्स संस्थेची हॉस्पिटल आहेत.

एम्स संस्थेमध्ये तज्ञ डॉक्टरांची ४० टक्के तर इतर स्टाफची ५५ टक्के पदे रिक्त असल्याची माहिती काही महिन्यांपूर्वी आरोग्य मंत्रालयाच्या वतीने लोकसभेत सादर झाली होती.

सर्वच क्षेत्रात अग्रेसर म्हणून महाराष्ट्राची ख्याती आहे. परंतु सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापनात मागासलेपण आढळून येते. राज्यातील 'सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा आणि आरोग्यसेवांचे व्यवस्थापन' या संदभार्तील त्याच्या लेखापरिक्षणाच्या अहवालातून डिसेंबर २०२४ मध्ये राज्यातील आरोग्य व्यवस्थेची सरकारी अनास्था कॅगने उघड केली. सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सक्षम करण्याबरोबर निधी उपलब्धतेवर भर देणे गरजेचे आहे असे म्हटले होते.

जागतिक आरोग्य परिषद निर्देशित डॉक्टरांची लोकसंख्येच्या निकषांनुसार राज्यात एक लाख चोवीस हजार चारशे अकरा डॉक्टरांची गरज आहे. प्रत्यक्षात मात्र राज्यात मार्च २०२२ पर्यंत एक लाख एकात्तर हजार दोनशे ब्यानशी नोंदणीकृत डॉक्टर होते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या १:१००० च्या मानकाच्या तुलनेत महाराष्ट्रातील डॉक्टर लोकसंख्येचे प्रमाण १:७३२ आहे. अशा प्रकारे राज्यातील जागतिक आरोग्य परिषदेच्या निकषांपेक्षा जास्त (३७ टक्यांहून ) अधिक आहे. मात्र परिचारकांची ५८ टक्के कमतरता दर्शविते.

तज्ञ डॉक्टरांच्या संवर्गात सुध्दा ४२ टक्के पदे रिक्त असल्याचे नमूद केले आहे.वैद्यकीय शिक्षण व औषधद्रव्ये विभागाच्या अंतर्गत डॉक्टर परिचारिका आणि निमवैद्यकीय कर्मचारी यांची कमतरता अनुक्रमे ३६ टक्के, ३५ टक्के आणि ४४ टक्के अशी होती.

वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुष महाविद्यालय आणि रुग्णालयामधील डॉक्टर, परिचारिका तसेच निमवैद्यकीय संवर्गातील पदांचा वानवा सुद्धा आहे.

भारताच्या रजिस्ट्रार जनरल२०२३ च्या नमुना नोंदणी प्रणालीनुसार देशातील सहा लाख महिलांची प्रसूती कोणतेही प्रशिक्षण नसलेल्या महिलांकडून होत असल्याचे समोर आले होते. याच अहवालानुसार देशात ७२.५ टक्के प्रसूती सरकारी रुग्णालयात झाल्या. तर २३.४ टक्के खासगी रुग्णालयात झाल्या. उर्वरित २ टक्के प्रसूती पात्र डॉक्टरांकडून झाल्या.

ग्रामीण भागात ७६.४ टक्के प्रसूती सरकारी रुग्णालयात, तर शहरी भागात ५६.६ टक्के प्रसूती सरकारी रुग्णालयात झाल्या आहेत.म्हणजेच ग्रामीण भागातील महिलांचा सरकारी रुग्णालयावर अधिक विश्वास दिसतो. देशभरात महिलांची प्रसूती कोणत्याही प्रशिक्षणा नसलेल्या महिलांकडून होत असेल तर अशा प्रकारामुळे मातामृत्यू व बालमृत्यूचे धोके वाढण्याची शक्यता अधिक असते.

असुरक्षित प्रसूती टाळण्यासाठी आरोग्य विभागाकडून जनजागृती करणे आज जरुरीचे आहे.आज आरोग्यवस्थेसमोर अनेक नवनवे आव्हाने उभे राहत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या ताज्या अहवालानुसार,आपल्या परिसरात किमान एक व्यक्ती मानसिक आजाराने त्रस्त दिसतो.

नैराश्य व चिंता हे मानसिक आजार मानले जातात. नैराश्याच्या गर्तेत ढकललेले आज असंख्य लोक आत्महत्येचा मार्ग स्वीकारत आहे.मानसिक आजारांचा विस्तार झपाट्याने आज बघायला मिळतो. कर्करोग व हृदयविकारांसारख्या आजाराने होणारे मृत्यू आरोग्यवस्थे समोर फार मोठे आव्हान निर्माण करीत आहे.

अनेक समस्यांच्या गर्तेत ढकललेली राज्यातील आरोग्य व्यवस्थेत बनावट औषधी वितरित झाल्याचा कलंक काही महिन्यांपूर्वी लागला होता. देशातील औषधी उत्पादन आकारमानाने जगभरात तिसऱ्या क्रमांकावर आहे व जेनेरिक औषधींचा हब म्हणून भारताची जगभरात ओळख आहे.

-------------------------

(उर्वरीत भाग पुढील अंकी)

■ ■ ■

## गोडगोड जाळं!

गेलो एकदा नेटवर शोधायला ज्ञान,
AI Website आलं पहिल्याच पान!
गोंडस दिसतं, म्हणे "Free Tools for you!
पण आत लपलेलं होतं एक धोक्याचं clue…

Face swap करा, photo edit मोफत,
Voice clone पण, अगदी सहज आणि सोपं!
क्लिक करताच, विचारलं Allow mic & cam?
कळलं नंतर दिलंय हॅकर्स ना आमचं घरचं map

शोधायला ज्ञान,AI Website आलं पहिल्याच पान!
गोंडस दिसतं, म्हणे "Free Tools for you!
पण आत लपलेलं होतं एक धोक्याचं clue…

Data घेतात ते, नकळत आपला ठाव,
Email, photos सगळ्याचं करतात हाव.
अकच्या नावाखाली, होते identity चोरी,
मग म्हणतो आपण का केली ही चुक मोठी भारी?

Terms & Conditions"
कुणीच वाचत नाही,
Accept वर क्लिक करणं
सवय झाली काही!
पण तेव्हाच करार
होतो नकळत
फसवणुकीचा
AI Website चा
वापर
गरज आहे हुशारीचा!

तर मित्रांनो, ऐका माझं सांगणं,
AI वापरा शहाणपणानं, नका घ्या गाफिलपणानं!
खरं ज्ञान हवं तर खात्रीची निवड करा,
फुकटाचं मोह सोडून, सुरक्षित मार्ग धरा.

**सौ.अश्विनी बा. डकरे, चांदुर बाजार.**

# 2 मिनिटांत तुटलेली हाडे जोडेल नवीन लिक्विड

**खबर हटके**

चिनी शास्त्रज्ञांनी 'बोन ०२' नावाचा एक द्रव गोंद तयार केला आहे जो फक्त २-३ मिनिटांत तुटलेली हाडे जोडू शकतो.





हे द्रव गोंद डॉ. लिन जियानफेंग आणि त्यांच्या टीमने तयार केले आहे. शस्त्रक्रियेदरम्यानही हे द्रव हाडे घट्टपणे जोडू शकते.

या द्रवाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते पूर्णपणे जैवविघटनशील आहे. ते ६ महिन्यांत शरीरात आपोआप विरघळते. याचा अर्थ असा की धातूचे इम्प्लांट बसवून नंतर काढण्यासाठी दुसऱ्या शस्त्रक्रियेची आवश्यकता राहणार नाही.



# लहानमुलांमध्ये लठ्ठपणाची समस्या वाढण्याचे मुख्य कारण तुम्हाला माहिती आहे का?



सप्टेंबर महिना हा राष्ट्रीय बालपणातील लठ्ठपणा जागरूकता महिना म्हणून साजरा केला जातो. बालपणातील लठ्ठपणा आज जगातील सर्वात मोठे आरोग्य आव्हान बनले आहे. बदलती जीवनशैली, खाण्याच्या सवयी आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे मुलांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. आजकालची मुले मोबाईल, टीव्ही आणि संगणकावर तासनतास घालवतात, ज्यामुळे शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. यासोबतच जंक फूड, साखरयुक्त पेये आणि पॅकेज्ड स्नॅक्सचा वापर वाढला आहे.

आधुनिक पालकत्व देखील या समस्येस उत्तेजन देत आहे. वारंवार बाहेर खाणे, प्रक्रिया केलेल्या अन्नावर अवलंबून राहणे आणि अनियमित खाण्याच्या सवयी मुलांसाठी हानिकारक आहेत. मुलांमध्ये लठ्ठपणा वाढण्याची अनेक कारणे आहेत. जर वेळेवर काळजी घेतली नाही तर बालपणातील लठ्ठपणामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि अगदी कर्करोग यासारखे आजार मोठे झाल्यावर होऊ शकतात.

लठ्ठ मुलांना अनेकदा समवयस्कांची छेडछाड, सामाजिक अलगाव, आत्मविश्वासाचा अभाव यासारख्या समस्यांचा सामना करावा लागतो. यामुळे चिंता, नैराश्य आणि अभ्यासात बिघाड यासारख्या समस्या देखील उद्भवू शकतात.

**घरापासून सुरुवात करा** : चांगली गोष्ट म्हणजे लठ्ठपणा टाळता येऊ शकतो. आई-वडिलांची भूमिका सर्वात महत्त्वाची असते. छोट्या सवयी खूप मोठा बदल घडवू शकतात.

**संतुलित आहार** : फळे, भाज्या, संपूर्ण धान्य आणि प्रथिने असलेले पौष्टिक घरगुती जेवण द्या. तळलेले पदार्थ आणि साखरयुक्त पेये मर्यादित करा.

**दररोज व्यायाम करा** : मुलांना सायकलिंग, मैदानी खेळ किंवा कोणत्याही शारीरिक क्रियाकलापांसाठी दररोज किमान ६० मिनिटे घालवण्यास प्रोत्साहित करा.

**स्क्रीन टाइमवर मर्यादा घाला** : टीव्ही, मोबाइल आणि व्हिडिओ गेमवर मयार्दा निश्चित करा जेणेकरून मुले सक्रिय राहतील आणि झोपेची गुणवत्ताही चांगली होईल.

**कौटुंबिक सहभाग** : कुटुंबाने एकत्र व्यायाम केला पाहिजे, एकत्र खाल्ले पाहिजे आणि सोयीपेक्षा आरोग्याला अधिक महत्त्व दिले पाहिजे.

**शाळेची भूमिका** : शाळांनी पौष्टिक आहार उपलब्ध करून द्यावा, खेळांना प्रोत्साहन दिले पाहिजे आणि आरोग्य शिक्षण अभ्यासक्रमाचा एक भाग बनवावे.

**वेळेवर जागरूकता आवश्यक** : राष्ट्रीय बाल लठ्ठपणा जागरूकता महिना हा केवळ कॅलेंडरवरील तारीख नाही, तर एक जागरूकता संदेश आहे. कुटुंब, शाळा आणि समाज मिळून मुलांमध्ये निरोगी जीवनशैलीच्या सवयी लावू शकतात. हे केवळ वजन कमी करण्याबद्दल नाही, तर पुढच्या पिढीला निरोगी, आत्मविश्वासपूर्ण आणि यशस्वी बनवण्याचा संकल्प आहे.

■ ■ ■

## गरबा : परंपरेपासून विकृतीकडे...

**वाचक लिहितात**

यंदा २२ सप्टेंबरपासून देवीचे नवरात्र प्रारंभ होत आहे. नवरात्र म्हणजे आदिशक्तीची साधना! नवरात्रात देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते. प्रांतानुसार देवीची उपासना करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. नवरात्राच्या काळात गरबा खेळण्याची प्रथा विशेषतः गुजरातमध्ये आहे आणि आता भारतभर मोठ्या उत्साहात गरबा खेळला जातो.

गरबा खेळताना मध्यभागी देवीचा घट किंवा प्रतिमा ठेवून त्याभोवती स्त्री-पुरुषांनी नृत्य करणे, तसेच नृत्याच्या वेळी देवीची, कृष्णलीलेची गीते गाणे, असे गरबा खेळण्याचे पारंपरिक स्वरूप आहे. मात्र आज भगवंताच्या या सामूहिक नृत्योपासनेला विकृत स्वरूप आलेले आहे.

पारंपरिक तालाऐवजी डीजेच्या जोरदार संगीतावर, चित्रपटांतील गीतांच्या तालावर अश्लील अंगविक्षेप करून गरबा खेळला जातो. गर्दीत मुलींची छेडछाड करणे, गैरवर्तन करणे असे प्रकार वाढत आहेत. पूजास्थळी गुटखासेवन, मद्यपान, ध्वनीप्रदुषण असे प्रकार घडतात.

हल्ली नवरात्राच्या आधी गरबा शिकवण्यासाठी क्लासेस चालतात, गरब्यामध्ये भाग घेण्यासाठी महागडे ड्रेस भाड्याने आणतात. मोठमोठ्या मंडळांमध्ये गरब्यावर मोठमोठे बक्षीस ठेवले जातात. एकंदरीतच आर्थिक उलाढाल भरपूर होते.


या सर्व प्रकारात देवीची आराधना आणि भक्तिभाव कुठे दिसतो? आज गरबा म्हणजे केवळ मनोरंजन, मौजमजा, मार्केटिंग असे स्वरूप त्याला प्राप्त झाले आहे आणि ही आपल्या धर्माची आणि संस्कृतीची मोठी हानी आहे.

त्यामुळे गरब्यातील हे गैरप्रकार थांबवणे, शुद्ध परंपरा जपणे आणि भक्तिभावाने देवीची उपासना करणे हेच खरे धर्मपालन आहे. गरब्यात शिस्त, भक्तिभाव आणि संस्कृतीचे भान ठेवले तरच नवरात्र पवित्र आणि अर्थपूर्ण ठरेल. चला तर, गरब्यात भक्तीची ज्योत उजळवून संस्कृतीचे रक्षण करू या.

■ **सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा.**

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### नाही कसं म्हणता..?

तुम्ही गरबा जरूर खेळा
त्याबद्दल आक्षेप नाही काही
पण स्वसंरक्षणार्थ कराटे ही
शिकायला हवे की नाही?

दांडीया शिकायला पालक
कौतुकाने लावती क्लास
पण तेवढेच मुलींच्या रक्षणार्थ
जागृत नाही हमखास..

वर्तमान स्थिती पाहता -
महिला कुठे आहे सुरक्षित
अशा स्थितीत नटाथटायला
प्रोत्साहन देणे आहे का उचित ?

# पेप्सिको इंडियाने नवीन कुरकुरे जोवार पफ्स बाजारात केले सादर

नागपूर, २३ सप्टेंबर : पेप्सिको इंडियाचा प्रतिष्ठित घरगुती स्नॅक ब्रँड कुरकुरे आपल्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त नवीन कुरकुरे जोवार पफ्स बाजारात आणत आहे. या निमित्ताने कुरकुरे भारतातील बाजरी-आधारित स्नॅकिंग श्रेणीमध्ये पाऊल ठेवत असून ज्वारीची शक्ती आणि कुरकुरेची अविश्वसनीय चव आणि उत्साह एकत्र आणली आहे. यापेक्षा चांगले काय असू शकते? बेक्ड (तळलेले नाही), कुरकुरे ज्वारी पफ्स ग्राहकांना आधुनिक स्वरूपात परिचित घटकांचा आनंद घेण्याचा एक मजेदार, चवदार मार्ग दाखवतात.

मागील २५ वर्षांपासून कुरकुरे अभिमानाने मेड इन इंडिया ब्रँड ठरला आहे भारतीय ग्राहकांसाठी तयार केलेला, विकसित आणि संगोपन केलेले. या वारशावर आणि ग्राहकांच्या सखोल अभ्यासावर आधारित कुरकुरे जोवार पफ्सच्या या नवसंशोधनात भारताच्या खाद्यपदार्थांच्या संस्कृतीशी जोडण्याची क्षमता असून पेप्सिको इंडियाच्या प्रदेश, अभिरुची आणि संस्कृतींमधील अनेक भारतीयांना सेवा देण्याचा दृष्टिकोन साजरा करतात.

पेप्सिको इंडियाच्या कुरकुरे आणि डोरिटोसच्या मार्केटिंग संचालक आस्था भसीन म्हणाल्या, पेप्सिको इंडियामध्ये ग्राहक केंद्री दृष्टीकोन आमच्या प्रत्येक कामाच्या केंद्रस्थानी असतो. आमचे ध्येय भारताच्या समृद्ध खाद्यपदार्थांच्या परंपरांमध्ये रुजलेले राहून ग्राहकांच्या आवडी आणि पसंतींमध्ये सतत बदल घडवून आणणे हे आहे. कुरकुरे जोवार पफ्ससह आम्ही एका कालखंडातील धान्याची नव्याने कल्पना अशा स्वरूपात करत आहोत जे सुलभ आणि अप्रतिम आहे आणि 'इस से अच्छा क्या होगा' चे खरे प्रतीक आहे. हे उत्पादन भारताच्या परंपरा आणि भविष्याशी जुळणारे घटक तयार करताना ग्राहकांना आनंद देण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा पुरावा आहे.

कुरकुरे जोवार पफ्स हे उत्तर, पश्चिम आणि पूर्व भारतात आधुनिक आणि पारंपरिक रिटेल, आघाडीचे ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि क्विक-कॉमर्स ॲप्सद्वारे १० रूपये आणि २० रूपये पॅकमध्ये उपलब्ध असतील. या अनावरणाला टीव्ही, डिजिटल आणि रिटेल टचपॉइंट्सचा विस्तार करणाऱ्या एका मजबूत मीडिया प्लॅनद्वारे मदत मिळेल.

### म. ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत शस्त्रक्रिया

# सावंगी रुग्णालयात गत तीन वर्षात एक हजार सांधे प्रत्यारोपण




अकोला, २३ सप्टेंबर : सावंगी मेघे येथील जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालय आणि आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयातील अस्थिशल्यचिकित्सा विभागाने मागील तीन वर्षात एक हजार नितंब व गुडघ्याच्या सांधेबदल शस्त्रक्रियांचा टप्पा यशस्वीरीत्या गाठला आहे. शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत या शस्त्रक्रियांचा विनामूल्य लाभ मध्यभारतातील रुग्णांना घेता आला.

कधीकाळी रुग्णांना सांधे बदलण्याच्या शस्त्रक्रियांसाठी महानगरांकडे धाव घ्यावी लागत असे. मात्र, ग्रामीण भागात वसलेल्या सावंगी रुग्णालयाने सर्व प्रकारच्या अत्याधुनिक सुविधा असलेली शस्त्रक्रियागृहे, प्रगत उपकरणे आणि जागतिक दर्जाची आरोग्यसेवा निर्माण करीत वैद्यकीय क्षेत्रात नावलौकिक प्राप्त केला आहे. तज्ज्ञ अस्थिशल्यचिकित्सकांमुळे अत्यंत गुंतागुंतीच्या व जोखमीच्या शस्त्रक्रिया कुशलतेने पार पाडतानाच शस्त्रक्रियेनंतरचे रूग्ण व्यवस्थापन, उत्तम शुश्रूषा आणि सुरक्षित अतिदक्षता विभाग या सेवांनी या यशात भर टाकली आहे. खाजगी रुग्णालयांमध्ये सांधे बदलण्याच्या शस्त्रक्रियांसाठी सामान्यतः २ ते ३ लाख रुपये खर्च येतो. मात्र, महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेमुळे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या रुग्णांना सावंगी मेघे रुग्णालयात मोफत उपचार प्राप्त झाले आहेत.

या यशस्वी वाटचालीत अस्थिशल्यचिकित्सा विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर अंबाडे, डॉ. संदीप श्रीवास्तव, डॉ. संजय देशपांडे, डॉ. गजानन पिसूळकर, डॉ. हितेंद्र वांबोरीकर, डॉ. सुहास लांडगे आणि सहकाऱ्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. तर, रुग्णांना अद्ययावत सुविधा विनामूल्य प्राप्त व्हाव्यात, यासाठी अभिमत विद्यापीठाचे कुलपती दत्ता मेघे, मुख्य सल्लागार डॉ. वेदप्रकाश मिश्रा, प्रधान सल्लागार सागर मेघे, कुलगुरू डॉ. ललितभूषण वाघमारे यांचे मार्गदर्शन आणि सर्वतोपरी सहकार्य लाभले आहे.

या तीन वर्षात आजघडीला सुमारे १,०५० शस्त्रक्रिया कोणताही संसर्ग किंवा गुंतागुंतीशिवाय पूर्णत्वाला नेल्या आहेत. पूर्णतः बरे झालेले हे सर्व रुग्ण पुन्हा दैनंदिन कामे करत आहेत आणि आपल्या कामावर परतून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावत आहेत, हीच आमच्यासाठी खरी मिळकत आहे, अशी भावना ज्येष्ठ अस्थिशल्यचिकित्सक डॉ. संदीप श्रीवास्तव यांनी व्यक्त केली.

# पर्यटन दिनाच्या निमित्ताने सोनी सबवरील कलाकार सांगत आहेत आपल्या प्रिय प्रवासाच्या आठवणी आणि भारतात फिरण्याच्या आवडीविषयी



मुंबई, २३ सप्टेंबर : दर वर्षी जागतिक पर्यटन दिन २७ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो आणि त्या निमित्ताने प्रवासाचे आणि पर्यटनाचे महत्त्व अधोरेखित केले जाते. जागतिक पर्यटन दिन म्हणजे नव्या ठिकाणांचा शोध, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि नव्या जागांचा शोध घेण्यातील गंमत. भारत हे पहिल्यापासून वारसा, खाद्यसंस्कृती आणि नयनरम्य स्थळांचे डेस्टिनेशन आहे. या अद्भुत देशात नव्या जागांचा शोध घेण्याचा आनंद आणि या प्रवासाच्या आठवणी यांविषयी सांगत आहेत, सोनी सबचे कलाकार रजत वर्मा, ऋषी सक्सेना, करुणा पांडे, आशी सिंह आणि अभिषेक वर्मा. काही अस्पर्श ठिकाणांपासून ते प्रसिद्ध पर्यटन स्थळांपर्यंतच्या या आठवणींमधून या कलाकारांचे पर्यटनविषयी आणि आपल्या देशाची ओळख असणाऱ्या सांस्कृतिक विविधतेविषयीचे प्रेम दिसून येते.

इत्ती सी खुशी मालिकेत विराटची भूमिका करणारा रजत वर्मा म्हणतो, मी देशाची राजधानी, दिल्लीचा आहे. हे ऐतिहासिक शहर खूप गजबजलेले असते. कॉलेजच्या दिवसात हौज खास या ठिकाणी आम्हा मित्रांचा अड्डा असायचा. ही जागा रॉकस्टार मुळे पुढे प्रसिद्ध झाली. कुतुब मिनार जवळच्या कुतुब रोड वर फिरायला आम्हाला आवडायचे. चाँदनी चौक येथील नॉन-व्हेज पदार्थ आणि दही भल्ले, सीपीचे गजबजलेले कॅफे, करोल बागेतील छोले भटूरे आणि पिपल्स दिल्लीतील अद्भुत स्ट्रीटफूड यांच्याशिवाय तर दिल्लीची कल्पनाच होऊ शकत नाही. खरं सांगतो, तुम्ही एकदा त्याची चव घेतली की तुम्हाला जीवनात नक्कीच रस येतो!

इत्ती सी खुशी मालिकेत संजयची भूमिका करणारा ऋषी सक्सेना म्हणतो, मी जयपूरचा आहे, हे शहर इथले खाद्य पदार्थ आणि स्थापत्य याबद्दल प्रसिद्ध आहे. इथे प्रसिद्ध हवा महल आणि आमेर फोर्ट आहे तसेच खरेदीदारांचे आवडते जोहरी आणि बापू बाजारसारखे गजबजलेले बाजारही आहेत. अर्थात, मी स्वतः या बाजारांमध्ये फारसा जात नाही, पण बाहेरून येणाऱ्या लोकांना मात्र त्याचे खूप आकर्षण आहे. मी स्वतः खाण्याचा शौकीन असल्याने मी जयपूरच्या घेवरचा उल्लेख केल्याशिवाय राहू शकत नाही. खास करून मलाई घेवर मला फार आवडते. माझ्यासाठी घेवरच्या प्रत्येक घासात जयपूरचा स्वाद साठवलेला असतो!

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, माझ्यासाठी प्रवास ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे. अलीकडे मला फिरायला वेळ मिळत नाही, पण लहानपणी आमचे खूप फिरणे व्हायचे, कारण माझे वडील सैन्यात होते आणि दर दोन वर्षांनी त्यांची नव्या ठिकाणी बदली व्हायची. आम्ही या निमित्ताने भारतात खूप फिरलो, इथले खाद्यपदार्थ, संस्कृती, लोक पाहिले. आणि त्या आठवणी अजून माझ्या मनात ताज्या आहेत. कोडाई कॅनाल ही माझी सगळ्यात आवडती जागा आहे. माझे आई-वडील, बहीण आणि आमचा जर्मन शेफर्ड शेरी यांच्या सोबतच्या तिथल्या खूप सुंदर आठवणी आहेत. संस्कृती, इतिहास आणि नैसर्गिक सौंदर्याच्या दृष्टीने भारत किती समृद्ध देश आहे! डेहराडून, उधमपूर, चेन्नई आणि कोडाई कॅनाल ही माझी प्रिय ठिकाणे आहेत. प्रवास करताना तुम्हाला स्वतःला अधिक जाणण्याची संधी मिळते. आणि मला वाटते, प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी एकट्याने प्रवास करण्याचा अनुभव घ्यायला हवा.

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरीची भूमिका करणारी आशी सिंह म्हणते, मला फिरायला फारच आवडते. प्रवास केल्याने मी रिचार्ज आणि स्थिर होते. हिल स्टेशन्स मला विशेष आवडतात. मनाली आणि मसूरी सारख्या ठिकाणी जाऊन कसे शांत वाटते! माझ्यासाठी प्रवास म्हणजे केवळ प्रेक्षणीय स्थळे बघणे नाही. प्रवास म्हणजे निसर्गाशी एकरूप होणे, स्थानिक खाद्य पदार्थांचा आस्वाद घेणे आणि तेथील लोक कसे राहतात हे जवळून बघणे. मला रस्त्यावरून भटकंती करणे आवडते. मला तर वाटते, प्रत्येक प्रवास तुम्हाला काहीतरी नवीन शिकवतो, फक्त बाह्य जगाविषयीच नाही, तर तुमच्या स्वतःविषयी देखील. मी जेव्हा जेव्हा शूटिंगसाठी प्रवास करते, तेव्हाही मी आवर्जून स्थानिक बाजारात जाते आणि तेथील प्रसिद्ध खाद्य पदार्थांचा आस्वाद घेते. ती जागा आणि तेथील लोक यांच्याशी तादात्म्य पावण्याची ही माझी पद्धत आहे.

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत शौर्यची भूमिका करणारा अभिषेक वर्मा म्हणतो, माझ्या साठी प्रवास म्हणजे अनुभव! इतिहास आणि साहस यांचे मिश्रण असलेल्या, अशा जागा मला आवडतात. राजस्थान मला फार आवडते. मेहरानगड आणि आमेर फोर्टवर फिरायला आणि तेथील स्थानिक लोकसंगीतात रममाण व्हायला मला आवडते. मला रोडट्रिप्स देखील फार आवडतात. मग तो जयपूर-दिल्लीचा प्रवास असो किंवा समुद्री वारा अंगावर घेत केलेला गोव्याचा प्रवास! माझ्या प्रवासांमध्ये खाद्यपदार्थांचे मोठे स्थान असते. स्थानिक लोकांचा सल्ला घेऊन मी तेथील खास स्थानिक खाद्य पदार्थ अजमावून पाहतो. प्रवास मला सर्वार्थाने प्रेरित आणि जमिनीशी बांधून ठेवतो!

# ॲक्सिस बँकने संपूर्ण भारतातील ग्राहकांसाठी हंगामभर आकर्षक सणासुदीच्या ऑफर्ससह दिल से ओपन सेलिब्रेशन्स २०२५ मोहीम केली जाहीर



नागपूर, २३ सप्टेंबर : भारतामधील सर्वात मोठ्या खासगी बँकांपैकी एक असलेल्या ॲक्सिस बँकेने दिल से ओपन सेलिब्रेशन्स २०२५ या उत्सवी उपक्रमाची घोषणा केली आहे. हा उपक्रम संपूर्ण हंगामभर ग्राहकांना अप्रतिम मूल्य देण्यासाठी तयार करण्यात आला आहे. उत्सवाच्या मूळ भावनेशी प्रामाणिक राहून आणि 'सिर्फ एक फेस्टिव्हल नाही, पूरे फेस्टिव्ह सीझन चलेगा' या तत्त्वज्ञानावर आधारित, खरेदी, प्रवास आणि लाइफस्टाईल या विविध क्षेत्रांमध्ये ग्राहकांना व्यापक फायदे बँक देत आहे.

ॲक्सिस बँकेच्या ग्राहकांना विशेष लाभांचा विस्तृत संच मिळणार आहे. यात सवलती, कॅशबॅक ऑफर्स, पार्टनर डील्स आणि रिवॉर्ड प्रोग्रॅम्सचा समावेश असून हे सर्व ॲक्सिस बँक क्रेडिट कार्ड्स आणि इतर बँकिंग उत्पादनांवर लागू होतील. ऑफर्स अनेक श्रेणींमध्ये उपलब्ध आहेत. ई-कॉमर्स क्षेत्रात मेझॉन आणि फ्लिपकार्ट, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात हायर, एलजी, सॅमसंग, सोनी, मोबाइल्समध्ये वनप्लस, मोटोरोलॉला, शाओमी, क्विक कॉमर्समध्ये ब्लिंकिट, बिगबास्केट, पोर्टल स्विगी इन्स्टामार्ट, टाटा क्लिक, लाइफस्टाईलमध्ये मिंत्रा, अजिओ, नायका, सेलेक्टेड, शॉपर्स स्टॉप, टाटा क्लिक लक्झरी ब्रँड्सअंतर्गत कोच, मायकेल कॉर्स, मदरकेअर, हॅम्लीज आदी ब्रँड्सचा समावेश आहे. प्रवास क्षेत्रात पॅसिफिक, क्लिअरट्रिप, आयटीसी हॉटेल्स लिमिटेड, इक्सिगो, मेकमायट्रिप, श्रीलंकन एअरलाइन्स या ब्रँड्ससोबत आकर्षक ऑफर्स दिल्या जातील. या ऑफर्स व्यतिरिक्त, ॲक्सिस बँकेने अनेक अग्रगण्य ब्रँड्ससोबत भागीदारी केली असून, त्यामुळे हा उपक्रम ग्राहकांसाठी सर्वात फायदेशीर उत्सवी अनुभव ठरतो आहे.

या वर अर्जुन चौधरी, प्रेसिडेंट आणि हेड कार्ड्स, पेमेंट्स आणि वेल्थ मॅनेजमेंट, ॲक्सिस बँक म्हणाले, ॲक्सिस बँकेत आम्ही जे काही उपक्रम हाती घेतो त्याच्या केंद्रस्थानी नेहमीच आमचे ग्राहक असतात. दिल से ओपन सेलिब्रेशन्स २०२५ ही एक अशी ऑफर आहे जी शॉपिंग, ट्रॅव्हल आणि लाइफस्टाईलमध्ये ग्राहकांना अधिक मूल्य दिले जाईल. आघाडीच्या ब्रँड्ससोबतच्या सहकार्यान आम्ही क्रेडिट कार्डधारकांसाठी कॅशबॅक, क्युरेटेड डिस्काउंट्स आणि हाय-व्हॅल्यू खरेदींसाठी सोपे ईएमआय असे खास फायदे देत आहोत. हा उपक्रम आमच्या कस्टमर-फर्स्ट तत्त्वज्ञानाचा पुनरुच्चार करतो आणि इनोव्हेशनसोबत अर्थपूर्ण रिवॉर्ड्स एकत्र करून कार्ड्स व पेमेंट्स क्षेत्रातील आमचे नेतृत्व अधिक दृढ करतो.

# वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी प्रस्तुत करीत आहे 'रिॲलिटी राणीज ऑफ द जंगल'चा दुसरा सिझन



नागपूर, २३ सप्टेंबर : वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीची लोकप्रिय मालिका रिॲलिटी राणीज ऑफ द जंगल पुन्हा एकदा दुसऱ्या सिझनसह परतत आहे. यावेळी हा संपूर्ण महिला- ॲडव्हेंचर प्रवास गोव्याच्या खडकाळ किनाऱ्यावर रंगणार आहे. उसळणाऱ्या लाटा, बदलणारी वाळू आणि कठीण जगण्याच्या चाचण्या यामध्ये १२ स्पर्धक 'रिॲलिटी राणी ऑफ द जंगल'चा मुकुट जिंकण्यासाठी झुंज देतील.

पहिल्या सिझनला मिळालेल्या घवघवीत यशानंतर, नवीन सिझनमध्ये मोठी आव्हाने, तीव्र स्पर्धा आणि दुहेरी नाट्य पाहायला मिळेल. स्पर्धकांना त्यांच्या शारीरिक आणि भावनिक मर्यादांची कसोटी लागेल. वरुण सूद त्याच्या खास शैलीत पुन्हा परत येत आहे आणि तो 'राणीज'ना त्यांच्या आतापर्यंतच्या सर्वात कठीण प्रवासात मार्गदर्शन करणार आहे.

अर्जुन नोहार, व्यवस्थापकीय संचालक दक्षिण आशिया, वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी म्हणाले, मनोरंजन विश्वात रिॲलिटी-ॲडव्हेंचर हा आजचा सर्वाधिक लोकप्रिय प्रकार बनला आहे. यात प्रेक्षकांच्या भावनांना भिडणाऱ्या मानवी कथा आणि थरारक दृश्यांचा उत्तम संगम असतो. रिॲलिटी राणीज ऑफ द जंगल हे बोल्ड मनोरंजन आणि अस्सल कथाकथन यांचे उत्कृष्ट मिश्रण आहे. नवीन सिझन या नात्याला आणखी उंचीवर घेऊन जात आहे. बानिजय एशियासोबतची आमची भागीदारी हा शो वास्तवात आणण्यासाठी महत्त्वाची ठरली असून, प्रेरणा देणाऱ्या व मनोरंजन करणाऱ्या कथा आम्ही प्रेक्षकांपर्यंत पोहोचवत आहोत, याचा आम्हाला अभिमान आहे.

सूत्रसंचालक वरुण सूद म्हणाला, पहिला सिझन हा अविस्मरणीय अनुभव होता आणि यावेळी नव्या वातावरणात परतण्याबद्दल मी प्रचंड उत्सुक आहे. रिलिटी राणीज ऑफ द जंगल हा भारतातील सर्वात आव्हानात्मक आणि खरा रिलिटी शो आहे. यात खरी कसोटी म्हणजे परिवर्तन जिथे ताकदवान व्यक्तिमत्त्वे भीती, शंका आणि कठीण शारीरिक आव्हानांना सामोरे जातात. हा सिझन अधिक धाडसी, तीव्र आणि आश्चर्यांनी भरलेला आहे. प्रेक्षकांना हे नाट्य पाहण्याची मला आतुरता आहे.

ऋषी नेगी, ग्रुप चीफ ऑपरेटिंग ऑफिसर, बानिजय एशिया आणि एंडेमोलशाइन इंडिया म्हणाले, 'रिॲलिटी राणीज ऑफ द जंगल'च्या दुसऱ्या सिझनमधून आम्ही भारतीय प्रेक्षकांसाठी साहसी मनोरंजनाची नवी परिभाषा निर्माण करत आहोत. या सिझनमध्ये असलेली सत्यता, अनपेक्षितता आणि भावनिक खोलीमुळे हा शो प्रत्येकासाठी पाहण्याजोगा ठरेल. वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीसोबतच्या आमच्या भागीदारीमुळे आम्हाला सर्जनशील मर्यादा ओलांडता येतात आणि प्रेक्षकांना भावणाऱ्या कथा सादर करता येतात. या स्पर्धका कशाप्रकारे आव्हानांना सामोऱ्या जातात आणि त्यांची छाप सोडतात, हे पाहण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.

हा सिझन एका महत्त्वाच्या टप्प्यावर आला आहे, कारण डिस्कव्हरी जगभरात ० वर्षे आणि भारतात ३० वर्षांचा प्रवास पूर्ण करत आहे. याद्वारे, प्रेक्षकांना प्रेरणा देणाऱ्या आणि त्यांचे मनोरंजन करणाऱ्या धाडसी, अनोख्या कथा सादर करण्याचा आपला वारसा कंपनीने कायम ठेवला आहे.

# कलाकारांनी जागतिक पर्यावरण आरोग्य दिनानिमित्त पर्यावरणपूरक राहणीमानाबाबत सांगितले!

मुंबई, २३ सप्टेंबर : २६ सप्टेंबर रोजी साजरा केला जाणारा जागतिक पर्यावरण आरोग्य दिन पर्यावरणीय आरोग्य आणि मानवी स्वास्थ्य यांच्यामधील महत्त्वपूर्ण दुव्याबाबत जागरूकता निर्माण करतो. या दिनानिमित्त एण्ड टीव्ही कलाकारांनी ते पर्यावरणपूरक निवडी, शाश्वत पद्धतींचा कशाप्रकारे अवलंब करतात आणि निसर्गाशी कशाप्रकारे संलग्न राहतात याबाबत सांगितले. तसेच त्यांचा विश्वास आहे की लहान, सातत्यपूर्ण पाऊल आरोग्यदायी जीवनाकडे घेऊन जाऊ शकते. हे कलाकार आहेत पारस अरोरा (जीतू, 'घरवाली पेडवाली'), सपना सिकरवार (बिमलेश, 'हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है').

आगामी मालिका 'घरवाली पेडवाली'मधील पारस अरोरा ऊर्फ जीतू म्हणाले, ''माझ्यासाठी फिटनेस म्हणजे फक्त जिममध्ये व्यायाम करणे नाही तर निसर्गाशी संलग्न राहणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. बहुतांश वेळ मी ट्रेडमिलऐवजी खुल्या पार्कमध्ये सकाळच्या वेळी जॉगिंग करतो, कारण हरित वातावरणामध्ये धावल्याने मला ताजी ऊर्जा मिळते. मी बाहेर योग करायला देखील सुरूवात केली आहे, जेथे नैसर्गिक सूर्यप्रकाश व ताजी हवा प्रसन्न अनुभव मिळतो. मी शूटिंगदरम्यान सोबत पुनर्वापर होण्यायोग्य स्टीलची पाण्याची बॉटल घेऊन जातो आणि मी माझ्या मित्रांना देखील तसे करण्यास प्रेरित करतो. माझा विश्वास आहे की, हे लहान जीवनशैली बदल माझ्या शरीराला आरोग्यदायी ठेवतात आणि पर्यावरणावरील भार कमी करतात.''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील सपना सिकरवार ऊर्फ बिमलेश म्हणाल्या, ''दररोज सकाळी मी घराबाहेर जाऊन किमान १५ ते २० मिनिटे सूर्यप्रकाशात उभी राहते. यासोबत ताज्या हवेचा श्वास घेतल्याने मला दिवसभरासाठी ऊर्जा मिळते. मी आता पॅक्ड फूडऐवजी ताजी, हंगामी फळे खाते, तसेच पौष्टिक जेवणाचा आनंद घेते, कधी-कधी आरोग्यदायी आहारासाठी चिकणमातीच्या भांड्यांचा वापर करते. घरामध्ये मी सिंगल-युज प्लास्टिक्सचा वापर टाळते आणि शक्य असल्यास त्यांचे रिसायकल करते. माझ्या या सवयींमुळे माझे आरोग्य सुधारते, तसेच पर्यावरणाला देखील फायदा होतो.'' मालिका 'भाबीजी घर पर है'मधील शुभांगी अत्रे ऊर्फ अंगूरी भाबी म्हणाल्या, ''बागकाम माझे सर्वात मोठे स्ट्रेसबस्टर आहे. रोपांचे संगोपन करण्यामधून मला आराम मिळतो आणि घरामध्ये हवा देखील शुद्ध राहते. मी नैसर्गिकरित्या रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी चहामध्ये तुळशी व पुदीना यांसारख्या स्वदेशी औषधी वनस्पतींचा वापर करते. कचरा टाळण्यासाठी मी कापडी पिशव्यांचा वापर करते आणि पर्यावरणपूक साफसफाई उत्पादनांना प्राधान्य देते. वैयक्तिक स्वास्थ्य सवयींसोबत शाश्वतता राखत मी आरोग्यासोबत पर्यावरणाचे देखील संरक्षण करते.''

# व्ही-जॉन तर्फे रणबीर कपूरसोबत नवीन जाहिरात मोहीम सादर



नागपूर, २३ सप्टेंबर : गेल्या सहा दशकांहून अधिक काळ ग्रूमिंग क्षेत्रात आघाडीवर असलेल्या भारतातील प्रथम क्रमांकाचा शेव्हिंग क्रीम ब्रँड व्ही-जॉनने ब्रँड ॲम्बेसिडर रणबीर कपूरसोबत नवीन समग्र जाहिरात मोहिमेची घोषणा केली आहे. 'फोटोकॉपी नही, ओरिजिनल दिखो' (फोटोकॉपी नाही, ओरिजिनल दिसा) या प्रभावी कल्पनेवर आधारित ही जाहिरात मोहिम ग्रूमिंगकडे नुसती नक्कल करण्यापेक्षा वेगळा दृष्टीकोन देत एका अस्सल, प्रामाणिकपणाच्या आणि व्यक्तित्वाच्या दृष्टीने कृती म्हणून बघते.

पिढ्यानुपिढ्या व्ही-जॉन भारतीय घरांमध्ये विश्वास, गुणवत्ता आणि सहज उपलब्धतेसाठी ओळखला जात आहे. या नवीन कॅम्पेनद्वारे ब्रँड आजच्या आत्मविश्वासाने भरलेल्या आणि आता कुणाच्याही 'कॉपी' बनू इच्छित नाहीत तर आपल्या व्यक्तिमत्वाला, आपल्या लूकमध्ये, भावनांमध्ये आणि वागण्यातून ओरिजिनलपणे, स्वतंत्रपणे व्यक्त करू इच्छितात अशा भारतीय पुरुषांच्या आकांक्षा स्वीकारत आहे.

मेगास्टार आणि या कॅम्पेनचा चेहरा असलेला अभिनेता रणबीर कपूर याच संदेशाला त्याचा खास करिष्मा आणि सुसंगती देत आहे. कॅम्पेनबद्दल बोलताना रणबीर म्हणाला, आजच्या पिढीला नुसतं मिसळून जायला आवडत नाही तर त्यांना सर्वांमध्ये उठूनही दिसायचं असतं. ग्रूमिंग हा तुमची ओरिजिनॅलिटी, तुमचं स्वतःचं मूळ अस्तित्व व्यक्त करण्याचा महत्त्वाचा भाग आहे. व्ही-जॉन तरुणांना फोटोकॉपी होणं थांबवून स्वतःला स्वीकारायला सांगतो आहे हे मला खूपच भावलं आहे. आजच्या काळाबद्दल बोलणारी ही साधी पण ताकदवान कल्पना आहे.

या जाहिरातीची संकल्पना हॅवस क्रिएटीव्हची असून डेंटसु मिडिया सोबत भागीदारीत ही जाहिरात मोहीम टीव्ही, डिजिटल, प्रिंट आणि सोशल मीडियावर प्रसारित होत आहे. विनोद, ताजेपणा आणि तरुणाईची उर्जा दाखवत ही जाहिरात सादर होते. या कथानकात व्ही-जॉन केवळ एक शेव्हिंग ब्रँड नसून पुरुषांना त्यांची खरी ओळख व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहित करत आत्मविश्वास देणारा सहयोगी म्हणून सादर केला जातो.

# तुमचा दिवस योग्य प्रकारे सुरू करा : कॅलिफोर्निया बदामांसह जागतिक हृदय दिन साजरा करा



मुंबई, २३ सप्टेंबर : यंदा जागतिक हृदय दिनाची थीम आहे डोन्ट मिस अ बीट एक प्रभावी स्मरण की हृदयविकारामुळे अनेक जीव अकाली गमावले जात आहेत, जे कुटुंबांपासून अमूल्य वेळ हिरावून घेत आहे. ही सूचना भारतासाठी विशेषतः गंभीर आहे, कारण येथे हृदयविकारांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढत आहे. लॅन्सेटच्या भारतातील राज्यांमध्ये हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगांचे बदलते स्वरूप आणि त्यांचे जोखीम घटक या अभ्यासानुसार, भारतीयांना हृदयविकार इतर देशांतील लोकांपेक्षा सरासरी दहा वर्षांनी आधी होतात. वर्ल्ड हार्ट फेडरेशनच्या मते, महिलांना पहिला हृदयविकाराचा झटका अधिक तीव्र असतो आणि त्यामधून मृत्यूचे प्रमाण पुरुषांपेक्षा जास्त असते. तसेच, तरुणांमध्ये हृदयविकाराच्या घटनांमध्ये अभूतपूर्व वाढ होत आहे. हृदयविकार टाळण्यासाठी एक साधा पण परिणामकारक उपाय म्हणजे हृदयासाठी फायदेशीर जीवनशैली स्वीकारणे उदाहरणार्थ, दररोजच्या आहारात कॅलिफोर्निया बदामांचा समावेश करणे.

पोषण व आरोग्य सल्लागार शीला कृष्णस्वामी यांनी सांगितले असे भारतामध्ये हृदयविकाराचे प्रमाण वाढत असल्यामुळे, केवळ कोलेस्ट्रॉल कमी करणे पुरेसे नाही, तर हृदयाच्या एकूण आरोग्यावर सकारात्मक परिणाम करणाऱ्या आहारावर भर देणे आवश्यक आहे. बदाम हे आरोग्यासाठी उपयुक्त असणारे घटकांनी समृद्ध आहेत जसे की चांगल्या प्रकारचे मेद, तंतूमय घटक, अँटीऑक्सिडंट्स, तसेच जीवनावश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजे. हे घटक शरीरातील दाह कमी करण्यास, तसेच हृदयाचे कार्य सुधारण्यास मदत करतात. कॅलिफोर्नियातील बदामांचा सकाळी समावेश केल्यास कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत होते आणि हृदय निरोगी राहते. याशिवाय, यामुळे उर्जा टिकून राहते आणि एकूणच आरोग्य सुधारते.

दिल्ली येथील मॅक्स हेल्थकेअरच्या डायटेटिक्स विभागाच्या प्रादेशिक प्रमुख रितिका समद्दर म्हणाल्या, धावपळीच्या जीवनशैलीमुळे आणि वाढणाऱ्या आजारांच्या जोखमीमुळे, लहान पण परिणामकारक आहारातील बदल करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. बदामांमध्ये मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्स, जीवनसत्त्व ई आणि मॅग्नेशियम मुबलक प्रमाणात असतात, जे ताज्या भारतीय आहार मार्गदर्शकांच्या सूचनेनुसार रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवण्यासाठी आवश्यक घटक पुरवतात. या जागतिक हृदय दिनानिमित्त, रोजच्या आहारात बदामांचा समावेश करणे म्हणजे संतुलित आहार आणि बळकट हृदयाकडे एक हुशार पाऊल आहे. सकाळच्या दिनचर्येत कॅलिफोर्निया बदामांचा समावेश करणे हृदयासाठी उपयुक्त आणि कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्याचा सोपा आणि परिणामकारक मार्ग आहे. पोषणाने समृद्ध आणि बहुपयोगी असलेले हे बदाम, जागतिक हृदय दिन २०२५ च्या दिवशी तुमचा दिवस चांगला सुरू करण्याचा एक उत्तम मार्ग आहे.

# विद्यार्थ्यांना क्लिक झालेली पेन्सिल, युवाची प्रोमेक मेकॅनिकल पेन्सिल



मुंबई, २३ सप्टेंबर : नवनीत एज्युकेशन लिमिटेडच्या युवा या ब्रँडतर्फे प्रोमेक ही ०.७ मिमीची पेन्सिल लॉंच करण्यात आली असून ही या पेन्सिलची किंमत फक्त रु. १० इतकी आहे. लिखाणाची प्रक्रिया सहज व्हावी, कम्फर्टेबल असावी आणि विद्यार्थ्यांसाठी व स्टेशनरीच्या चाहत्यांसाठी स्टालयिश असावी, हे या पेन्सिलीचे उद्दिष्ट आहे.

प्रोमेक पेन्सिलमध्ये विचारपूर्वक समाविष्ट करण्यात आलेल्या फीचर्समुळे ही पेन्सिल रोजच्या लिखाणासाठी एक परिपूर्ण साथी ठरते. या पेन्सिलीच्या ईझी-क्लिक मेकॅनिझममुळे ही पेन्सिल वापरायला अगदी सहज होते, त्याचप्रमाणे ड्युअल पेस्टल टोनमुळे या पेन्सिलला फ्रेश व ट्रेंडी लुकही मिळाला आहे. या पेन्सिलची ग्रिप कम्फर्टेबल असल्याने सहजपणे लिहिता येते. त्याचप्रमाणे या पेन्सिलला पारदर्शक टोपण असलेला खोडरबरही लावलेला आहे. त्यामुळे या पेन्सिलच्या उपयुक्ततेत व स्टाइलमध्ये भर पडते.

मेकॅनिकल पेन्सिलच्या लॉंचबद्दल बोलताना, युवा स्टेशनरीचे चीफ स्ट्रॅटजी ऑफिसर अभिजीत सान्याल म्हणाले, चांगली स्टेशनरी परवडणारी आणि आनंददायी असावी, अशी युवामध्ये आमची धारणा आहे. उपयुक्तता व डिझाइन यांची सांगड घालण्याची आमची बांधिलकी प्रोमेक मेकॅनिकल पेन्सिलमधून दिसून येते. या पेन्सिलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आणि तरुण क्रिएटर्सना त्यांचा लिखाणाचा दैनंदिन अनुभव अधिक सुलभ व मजेशीर करण्याचे साधन मिळणार आहे.

ही कूल मेकॅनिकल पेन्सिल आता महाराष्ट्र व गुजरातमधील आघाडीच्या सर्व स्टेशनरी आउटलेट्समध्ये उपलब्ध आहे. तुमची पेन्सिल लगेच खरेदी करा!


## आज का अंदाज

बुधवार २४ सप्टेंबर २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ८ | ९ | २ | ३ | ६ | ७ |
| ११० | ४५६ | १३४ | २७० | ५८९ | ६७० | १५० | २६९ |
| २४६ | ५०० | २७९ | ४६९ | ६७९ | ४४५ | ३४९ | ४५८ |
| ३४५ | ६९० | ३५० | ३७९ | ४९९ | ३०० | २७७ | ३६८ |
| २३ | ५३ | ८९ | ९१ | २१ | ३१ | ६८ | ७८ |
| २४ | ५४ | ८० | ९० | २४ | ३४ | ६९ | ७९ |
| २६ | ५६ | ८७ | ९७ | २० | ३० | ६५ | ७५ |

२४ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ४१ | ५८ | ७८ |
| ३० | ४० | ५६ | ७६ |
| ३९ | ४९ | ५२ | ७२ |
| १४८ | १५८ | १२२ | ३४० |
| ३४६ | ३४७ | ३५७ | २५० |
| २५६ | ७८९ | २३० | १६० |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# 'सोलापूर सोशल फाउंडेशनतर्फे 'सोलापूर जिल्हा पर्यटन महोत्सव २०२५ चे आयोजन



मुंबई, २३ सप्टेंबर : 'सोलापूर सोशल फाउंडेशन' आणि चिंचणी ग्रामीण कृषी पर्यटन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान चालणाऱ्या 'सोलापूर जिल्हा पर्यटन महोत्सव २०२५' चे उद्घाटन शनिवारी जागतिक पर्यटन दिनी २७सप्टेंबर रोजी होत आहे. महाराष्ट्राचे माजी वस्त्रोद्योग मंत्री आणि विद्यमान आमदार श्री सुभाष देशमुख यांच्या संकल्पनेतून हा महोत्सव पार पडत आहे. सोलापूर जिल्ह्याच्या पर्यटनाच्या सर्वांगीण विकासाबरोबरच ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, निसर्ग व ग्रामीण पर्यटनाचा प्रचार व प्रसार या उद्दिष्टाने हा महोत्सव साजरा होत असून तो '५-पी मार्केटिंग ब्रँ डिंग' संकल्पनेवर आधारित आहे. प्लेसेस, पर्सनॅलिटीज, प्रॉडक्ट्स, प्लेसमेंट, पोल्युशन फ्री एन्व्हायर्नमेंट या पाच महत्वपूर्ण 'पी'चा आविष्कार या महोत्सवात घडणार आहे.

प्लेसेस' म्हणजेच जिल्ह्यातील धार्मिक, सांस्कृतिक, औद्योगिक व ग्रामीण पर्यटन स्थळे; 'पर्सनॅलिटीजम्हणजे सोलापुरातील कलाकार, संशोधक, आधुनिक शेतकरी, उद्योजकः 'प्रॉडक्ट्स' म्हणजे स्थानिक खाद्यसंस्कृती, कृषी उत्पादन व औद्योगिक निर्मिती; चौथा 'पी' म्हणजे प्लेसमेंटच्या माध्यमातून तरुणांसाठी जास्तीत जास्त रोजगारनिर्मिती आणि 'पोल्युशन फ्री एन्व्हायर्नमेंट' च्या माध्यमातून वृक्षलागवड व पर्यावरण संवर्धन! अशा या सर्वांगीण आणि सर्वसमावेशक अशा संकल्पनेतून हा विकास साकारणारण्याचे स्वप्न आहे.

२७ सप्टेंबर रोजी उद्घाटन झाल्यावर २८ सप्टेंबर रोजी महिलांसाठी झिम्मा, फुगडी, उखाणे, झाड झुंज आदी पारंपारिक रविवारी २९ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषदेतील विद्यार्थ्यांसाठी बाल चित्रकला महोत्सव ३० सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अभियान ही तालुकास्तरीय कार्यशाळा पार पडणार आहे. १ ऑक्टोबर रोजी आध्यात्मिक कार्यक्रमांमध्ये भजन, भारुड, कीर्तन व महामंगल आरती आयोजित करण्यात आली आहे तर महोत्सवाच्या सांगता दिनी २ ऑक्टोबर रोजी वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम व परिसंवाद असा कार्यक्रम पार पडणार आहे.

या महोत्सवामुळे जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे. त्याबद्दल उलगडून सांगताना आमदार देशमुख म्हणाले, प्रयागराजमध्ये कुंभमेळ्याच्या काळात एक महिन्यामध्ये जर साठ कोटी लोक येत असतील आणि त्या प्रत्येकाने एक हजार रुपये जरी त्याठिकाणी खर्च केले असतील तर साठ हजार कोटी रुपये प्रयागराजचे उत्पन्न वाढले. बरे हे मी फक्त सरासरी म्हणतोय. मग या पार्श्वभूमीवर मला असे वाटते की माझ्या सोलापूरला एक कोटी लोक येतील असे गृहीत धरले तर येथे प्रत्येकाला काम मिळेल, आर्थिक उलाढाल प्रचंड वाढेल.

## राशीभविष्य

**मेष :** अनुभवी लोकांशी बोलून समस्यांवर उपाय शोधावेत. विद्यार्थी त्यांच्या करिअरबाबत गंभीर असतील. जवळच्या व्यक्तीशी वाद होऊ शकतो, म्हणून शांत राहा. खर्चाकडे लक्ष द्या.

**वृषभ :** आजचा दिवस व्यवस्थित जाईल. कामात तुमची रुची वाढेल. परदेशातून चांगली बातमी मिळू शकते. मुलांच्या करिअरच्या अपयशामुळे निराश होऊ नका, त्यांना आधार द्या.

**मिथुन :** तुमची कमाई आणि खर्च यात समतोल राखावा. वडिलोपार्जित संपत्तीचा वाद सामंजस्याने मिटेल. तुमच्या योजना सर्वांसमोर उघड करू नका, अन्यथा कोणीतरी त्याचा फायदा घेऊ शकतो.

**कर्क :** घरातील व्यवस्थापन चांगले राहील. ज्यामुळे सर्वजण आपापल्या कामावर लक्ष केंद्रित करु शकतील. विद्यार्थ्यांना चांगले परिणाम मिळतील. कुटुंबाशी चांगले संबंध ठेवा. मालमत्तेच्या वादापासून दूर राहा.

**सिंह :** मेहनत आणि परिश्रम यशस्वी होतील. ज्यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. तुम्हाला चांगली बातमी मिळेल. प्रवासाचे योग टाळा. कारण वादाची शक्यता आहे. आर्थिक चिंता असू शकते.

**कन्या :** कोर्ट-कचरीच्या प्रकरणात विजय मिळण्याची शक्यता आहे. कोणत्याही समस्येमुळे घाबरू नका. कौटुंबिक व्यवसायात यश मिळेल, पण नवीन काम सुरू करण्यासाठी हा काळ अनुकूल नाही.

**तुळ :** व्यवसायात खूप काम असेल. पण त्याचे चांगले परिणाम मिळतील. मार्केटिंग आणि मीडियाशी संबंधित कामांमध्ये यश मिळणार नाही. कुटुंबात गैरसमज होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** व्यवसायात थोडेसे बदल करणे आवश्यक आहे. तुमच्या कोणत्याही समस्येसाठी जीवनसाथीचा सल्ला खूप फायदेशीर ठरेल. प्रगतीचे नवीन मार्ग मिळतील. कामाचा ताण वाढेल.

**धनु :** पॉलिसी किंवा मालमत्तेत गुंतवणूक करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. धार्मिक कामांमध्ये वेळ घालवल्याने मानसिक शांती मिळेल. तुमची गोपनीयता जपून ठेवा. शेजाऱ्यांशी वादापासून दूर राहा.

**मकर :** मोठ्यांचे आशीर्वाद तुमच्यासाठी फायदेशीर ठरतील. कोणत्याही नकारात्मक गोष्टींकडे दुर्लक्ष करा. व्यवसायात सुधारणा करण्यासाठी नवीन तंत्रज्ञान जाणून घेणे आवश्यक आहे. नोकरीत प्रगतीचे योग आहेत.

**कुंभ :** इलेक्ट्रॉनिक वस्तू खराब झाल्याने खर्च वाढेल. प्रतिस्पर्धकांवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. तुमच्या रागावर नियंत्रण ठेवा. नवीन कामाची सुरुवात यशस्वी होईल, आर्थिकदृष्ट्या ते फायदेशीर ठरेल.

**मीन :** आज ऑफिसमध्ये तुमचा कामाचा ताण वाढू शकतो. मोठी डील होऊ शकते. व्यावसायिक व्यवहारांमध्ये सावधगिरी बाळगा, एक छोटीशी चूक मोठे नुकसान देणारी ठरु शकते.

# ८० हजार भाविक देवींच्या चरणी लीन

## अंबानगरीत दोन्ही देवींच्या अभिषेकाला भक्तिभावाने सुरुवात





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, दि. २३ :** अमरावतीकरांचे आराध्य दैवत अंबादेवी, एकवीरा देवीच्या शारदीय नवरात्रोत्सवाला मंगळवारी उत्साह व भक्तिभावात सुरुवात झाली. सकाळी ८ नंतर दोन्ही मंदिरामध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी उसळली. रात्री तर भाविकांनी मोठी गर्दी केली होती. दिवसभरात ८० हजारांवर भाविकांनी दर्शन घेतल्याचे विश्वस्तांनी सांगितले आहे. त्याचप्रमाणे जत्रेचा परिसरात गजबजण्यास तसेच विविध वस्तूंची दुकाने उभारण्यास सकाळपासूनच सुरुवात झाली होती. तत्पूर्वी, पहाटे ५ पासून अंबादेवी, एकवीरा देवीचा मंत्रोच्चारात अभिषेक सुरू झाला. अंबादेवीचा अभिषेक ३० मिनिटे चालला. त्यानंतर घटस्थापना करण्यात आली. तर एकवीरा देवीचा अभिषेक हा ५.४५ पर्यंत सुरू राहिला. त्यानंतर घटस्थापना करण्यात आली. दोन्ही देवींना नऊवारी साडीने सजवण्यात आले. तसेच सोन्याच्या दागिन्यांनी साजशृंगार करण्यात आला. अंबादेवीला मुखवटा घालण्यात आला. त्यामुळे दोन्ही देवींचे रूप हे तेजस्वी व सुरेख दिसत होते. दोन्ही देवी संस्थानाच्या सचिवांनी सपत्निक देवीची पूजा करून खणा, नारळाने ओटी भरली. त्यानंतर नवरात्रीची पहिली आरती करण्यात आली. या वेळी बऱ्याचशे भाविक मंदिरात दर्शनासाठी उपस्थित होते. बहुतेक भाविक हे घट स्थापना झाल्यानंतरच देवीच्या दर्शनाला येतात. त्यामुळे पहाटे व सकाळी गर्दी कमी होती. परंतु, जसा दिवस वर चढत होता. तशी गर्दी वाढत राहिली. श्री एकवीरा देवी मंदिरातही महिला व पुरुष भाविकांनी मोठ्या श्रद्धेने दर्शन घेतले. एकवीरा देवींचा अभिषेक सकाळी ६ पूर्वी करण्यात आला. त्यानंतर नवरात्रीची पहिली आरती करण्यात आली.

देवींच्या मूर्तीची सुरक्षा महत्त्वाची दोन्ही देवी या प्राचीन असून अंबादेवी ही स्वयंभू प्रगट झाली आहे. तसेच एकवीरा देवीची स्थापना १६६० मध्ये जनार्दन स्वामींनी केली. त्यामुळे दोन्ही देवींच्या मूर्तीची सुरक्षा महत्त्वाची असल्याने अभिषेक करताना जास्तीत जास्त पाण्याचा वापर केला जातो. गायीचे दूध वापरले जाते. तसेच मूर्तीच्या डोक्यावर मोठे फुल ठेवून अभिषेक करण्यात आला. जेणेकरून थेट मूर्तींवर कोणताही पदार्थ पडू नये. यात दूध व पाणी मोठ्या प्रमाणात वापरण्यात आले. तसेच साखर, मद, हळद यात रासायनिक पदार्थ असतात. त्यामुळे मूर्तीची झीज होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या पदार्थांचा पुरातत्त्वविभागाच्या या सूचनेनुसार अल्प प्रमाणात वापर करण्यात आला.

मंदिराकडे येणाऱ्या रस्त्यांवर स्वागत कमानींसोबतच फलके श्री अंबादेवी आणि श्री एकवीरा देवी मंदिराकडे येणाऱ्या रस्त्यांवर अनेक मोठ्या स्वागत कमानी तसेच भाविकांना शुभेच्छा देणारे फलके लावली आहेत. मात्र महापालिकेच्या पथकाने अनेक फलके काढली. तरी काही फलके शाबूत होती. त्याचप्रमाणे मोठ्या स्वागत कमानींवर मनपा निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या नेत्यांचे चित्र दिसून येते. या मोठ्या स्वागत कमानी राजकमल चौकापासून ते गांधी चौकापर्यंत उभारण्यात आल्या आहेत. या कमानी काढण्याचे काम सुरु राहणार आहे.

### 'जय अंबे जय दुर्गे'च्या जयघोषात आदिमाया आदीशक्तीची स्थापना

## ८९ नवदुर्गा तर १६ शारदा मंडळांची नोंद



**महासागर प्रतिनिधी**

**अकोट, दि. २३ :** अकोट शहरात भक्तीमय वातावरणात नवरात्र उत्सव व नवदुर्गा उत्सवाला सुरुवात झाली आहे. दुर्गा मातेची मूर्ती पारंपरिक वाद्यांच्या गजरात मंडपात आणल्या गेली. शहरांतर्गत सार्वजनिक ८९ नवदुर्गा तर १६ शारदा उत्सव मंडळांनी आदिशक्ती दुर्गा माता व शारदा मातेची भक्तीमय वातावरणात विधिवत पूजा अर्चना करून स्थापना करण्यात आली. नवदुर्गा उत्सव हा अतिशय भक्तिभावात व विधिवत उपवास राखून साजरा केला जातो. सार्वजनिक नवदुर्गा उत्सव मंडळ व भक्तांमध्ये सध्या अभूतपूर्व आनंद दिसून येत आहे. यावर्षी अतिवृष्टीमुळे शेतकरी वर्ग चिंतेत आहे. परंतु याही स्थितीत नवरात्र महोत्सवास शहरासह ग्रामीण भागात उत्साह कायम दिसत आहे. त्यामुळे सध्या नवरात्र उत्सवाची धूम जोरात सुरू आहे. शहरात विविध मंदिरांमधून तसेच प्रत्येकाच्या घरी घटस्थापना निमित्त साफसफाईचा नवरात्रीनिमित्त रंगरंगोटी व सजावटीची कामे पूर्ण करण्यात आलेली आहे. नऊ दिवस चालणाऱ्या उत्सवात घटस्थापना पाठोपाठ यज्ञ आयोजित केले जाणार आहेत. शहरातील कबुतरी मैदान परिसरात असलेल्या भव्य दुर्गा माता मंदिरातही नवरात्र उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केल्या जाणार आहे. त्या सोबतच कालंका माता मंदिर शिवाजीनगर व शनिवारपुरा, शक्तीधाम मंदिर सिंधी कॅम्प, रेणुका माता मंदिर केशवराज वेटाळ, खोडीयार माता मंदिर, अंबिका नगर मंदिरात कार्यक्रम होणार आहेत. मंदिरासमोर सुंदर आरास अनव नेत्रदीपक रोषणाई नवदुर्गा मंडळांनी सुंदर मंडप उभारणी करीत वेगवेगळ्या प्रकारच्या विद्युत रोषणाई होईल. ५९ मंडळ विसर्जन मिरवणुकीत सहभागी अकोट शहरांतर्गत ८९ नवदुर्गा, १६ शारदा मंडळांनी शहर पोलिस ठाण्यात रीतसर परवानगी मिळवली आहे. यावर्षी ५९ मंडळे दुर्गा विसर्जनाच्या वेळी सहभागी होतील.

## राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण



**महासागर प्रतिनिधी**

**आर्वी , दि. २३ :** अखिल भारतीय महानुभाव परिषद व श्री गोविंद प्रभू देवस्थान ट्रस्ट भिष्णूर यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते सहकार मंगल कार्यालयात महानुभाव पंथीय मेळाव्यात वितरीत करण्यात आले. आमदार सुमित वानखडे यांच्या हस्ते बक्षीस वितरित करण्यात आले .यावेळी तीन गटात निबंध स्पर्धा घेण्यात आली. अ गटामध्ये प्रथम क्रमांक साक्षी डोळे बोथली २हजार १११ सील व प्रमाणपत्र,द्वितीय क्रमांक प्रियंका चेपटकर तळेगाव रघुजी १५हजार ५११ सीलओ प्रमाणपत्र, तृतीय क्रमांक सुनील साबळे लहान आर्वी १हजार१११, तर प्रोत्साहनपर पुरस्कार कृष्णा कालोकारला देण्यात आला. तर ब गटामध्ये खुला विषय सर्वज्ञ चक्रधर स्वामींचे अवतार कार्य व नितीमूल्ये हा होता. यामध्ये प्रथम पुरस्कार २हजार ५११ हेमंत विनोद असटकर वर्धा ,व्दितीय पुरस्कार १हजार ५११ चंद्रकांत वडकर, तृतीय पुरस्कार१हजार १११ वर्षा कोहडे मोर्शी, प्रोत्साहन पर पुरस्कार ७७७ योगेश महल्ले अमरावती, महिलांकरिता राखीव विषय महानुभाव पंथाच्या दृष्टिकोनातून स्त्रीशक्तीचा गौरव हा होता. याकरिता २हजार १११ रेशमा जावरकर अचलपूर, द्वितीय१हजार ५११ पुरस्कार पूजा ढोणे आर्वी, तृतीय पुरस्कार१हजार १११ वैशाली डोळे कारंजा, प्रोत्साहन ७७७ स्नेहा वैभव मोहड अमरावती, यांना प्रदान करण्यात आले यावेळी राज्यातून तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला विजेत्यांना प्रमाणपत्र ,शील मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले या निबंध स्पर्धेमध्ये अ गटांमध्ये १५६ स्पर्धकांनी भाग घेतला तर ब गटांमध्ये ५१ स्पर्धकांनी भाग घेतला तर क गटांमध्ये ७१ स्पर्धकांनी भाग घेतला.

### किनगावराजातील आराध्य दैवत

## श्री कामक्षा देवीच्या नवरात्रोत्सवास प्रारंभ



**महासागर प्रतिनिधी**

**किनगावराजा, दि. २३ :** परिसरातील भाविकांचे आराध्य दैवत असलेल्या येथील श्री कामक्षा देवीच्या नवरात्रोत्सवास आज, दि. २२ सप्टेंबर रोजी प्रारंभ झाला. नवरात्रोत्सवानिमित्त मंदिरात दि. १ ऑक्टोबरपर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाचे हे ५३ वे वर्ष आहे. घटस्थापनेपासून प्रारंभ होणारा हा उत्सव एकूण दहा दिवस साजरा होणार आहे. या नवरात्रोत्सवाच्या सप्ताहात सकाळी ५ ते ६ काकडा, ६ ते ७ विष्णु सहस्रनाम, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी १२ ते १ गाथाभजन, २ ते ४ देवी भागवत, सायंकाळी ४ ते ५ प्रवचन, ६ ते ७ हरिपाठ व रात्री ९ ते ११ वाजता हरी कीर्तन होणार आहे.

या सप्ताहात वखारी येथील संगीत विशारद रघुनाथ महाराज देशपांडे, प्रकाश महाराज साठे, पाचन वडगाव येथील संत तुकोबाराय वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक सतीश महाराज बनकर, पांगरी फाटा येथील माऊली आश्रमाचे संस्थापक प्रेमानंद महाराज देशमुख, झोटिंगा येथील बाप्पू गुरुजी, नाना महाराज पोखरीकर, वाशीम जिल्ह्यातील गोभणी येथील शंकर महाराज शास्त्री, माळ सावरगाव येथील मुक्तिधाम आश्रमाचे संस्थापक अनिरुद्ध महाराज क्षीरसागर, आळंदी येथील साधकाश्रमाचे संचालक डॉ. यशोधन महाराज साखरे यांचे कीर्तन होणार आहे. पाचन वडगाव येथील निवृत्ती महाराजांचे काल्याचे कीर्तन, महाप्रसाद व श्री कामाक्षा देवीच्या पालखी मिरवणुकीने नवरात्रोत्सव व सप्ताहाची सांगता होणार आहे.

सप्ताहात दररोज दुपारी २ ते ४ वाजता पांगरी उगले येथील भागवताचार्य विश्वनाथ महाराज उगले यांचे संगीतमय देवी भागवत होणार आहे.

यावेळी दीपक मुंडे, बाळासाहेब देशमुख उमरदकर व गजानन महाराज जगताप, आत्माराम महाराज रायमल संगीत साथ करणार आहेत. किनगावराजा परिसरातील वारकरी व भाविकांनी सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन किनगावराजा येथील श्री कामाक्षा देवी संस्थानचे पारंपारिक विश्वस्त राजे जाधव आणि विश्वस्तांनी केले आहे.

# मोताळा तालुक्यात पावसाचा हाहाकार

## नद्यानाल्यांना पूर: शेतकऱ्यांचे नुकसान





**महासागर प्रतिनिधी**

**मोताळा, दि. २३ :** तालुक्यातील रोहिनखेड, खडकी, खामखेडसह परिसरात रविवारी मध्यरात्री नंतर सर्वत्र मुसळधार पाऊस पडला असून नदी-नाल्यांना मोठ्या प्रमाणात पूर आला आहे. त्यामुळे नदीकाठच्या शेतांमध्ये पाणी साचले तसेच पाझर तलाव ओव्हरफ्लो झाल्याने पाझर तलावाखालील शेतात सांडव्यातील पाणी शिरल्याने शेतातील पिके भुईसपाट झाले तर काही ठिकाणी जमिनी खरडून गेल्या त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. तालुक्यात खामखेड, खडकी, गुळभेली, राहेरा, दाभा, तांडा, नळकुंड या गावांसह परिसरात ढगफुटी सदृश पाऊस पडला. या पावसामुळे खामखेड पाझर तलाव ओव्हर फ्लो झाल्यामुळे पाझर तलावा खालील शेतकऱ्यांच्या शेतात सांडव्यातील पाणी शिरल्याने सोयाबीन, मका, तूर, कापूस व पिकांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले तर अनेक ठिकाणी पिके भुईसपाट झाली आहे. तसेच खामखेड येथील शेतरस्त्यावरील पूल वाहुन गेल्यामुळे शेतात जाण्या-येण्याचा रस्ता बंद झाला असून शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले तर नळकुंड, दाभा, तांडा या गावातील नदीचे पाणी शेतात शिरल्याने शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या ढगफुटी सदृश पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावला आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून आर्थिक संकटात सापडला आहे. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे. नुकसानग्रस्त भागाची आमदार संजय गायकवाड यांनी केली पाहणी अतिपावसाने नुकसान झालेल्या भागात आमदार संजय गायकवाड यांनी प्रत्यक्ष भेट देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली तसेच नुकसानीचे ड्रोनद्वारे सर्वे करून तातडीने पंचनामे करण्याचे महसूल आणि कृषी विभागाला निर्देश दिले. सर्वेक्षणानंतर सरसकट मदत कशी देता येईल यासंदर्भात तहसीलदार, कृषी अधिकाऱ्यांना आदेश दिले तसेच शेतकऱ्यांनी निराश होऊ नये शासन तुमच्या पाठीशी आहे असा धीर दिला. तालुक्यात ढगफुटी सदृश झालेल्या पावसाने तालुक्यातील दाभा येथे ४५ हेक्टर, उबाळखेड ७० हेक्टर, गुळभेली ५० हेक्टर, सोनबरड २० हेक्टर, नाईकनगर १५ हेक्टर आणी नळकुंड येथील ३० हेक्टर असे २३० हेक्टर मधील शेतातील कापूस, सोयाबीन, मका या शेती पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी रामदास सिरसाट यांनी दिली आहे.

## राज्यस्तरीय वर-वधू मेळावा २८ रोजी

**वर्धा:** सहयोग कल्याणकारी बहुउद्देशीय संस्था नागपूर द्वारा बुद्धिस्ट मंगल ग्रुपतर्फे डॉ. भदंत राजरत्न यांच्या संयुक्त विद्यमाने शहरामध्ये राज्यस्तरीय वधु ,वर परिचय मेळाव्याचे आयोजन २८ सप्टेंबर रोजी दुपारी १२ ते ४ वा.दरम्यान सम्यक दृष्टी, बुद्ध विहार ,नालंदा नगर येथे करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे खासदार अमर काळे माजी आमदारा रणजित रंजीत कांबळे यांची उपस्थिती रहाणार आहे.

कामगार शेतकरी पक्षाचे यशवंत झाडे, प्रमोद सोमकुवर यांनी प्रथमच शहरात वधू वर मेळाव्याचे आयोजन केले असून प्रथम वधू -वर, घटस्फोटीत विधुर, विधवा, अपंग व समाजातील अनेक क्षेत्रातील स्थळे या ठिकाणी असे आयोजकांनी सांगितले. असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे समाजसेवक दिलीप वैद्य, व सामाजिक कार्यकर्ते पद्माकर कांबळे यांनी कळिवले आहे.

## माँ नरसाई माता गडावर जगराता कार्यक्रम आज

**आंजी(मो.) :** येथे नवरात्राच्या पवित्र पर्वावर माँ शितला देवी जागरण ग्रुप बैतूलब झाकीयाद्वारे विशाल देवी जागरण २४ सप्टेंबरला सायंकाळी सात वाजता माता नरसाई गडावर जगराताचे आयोजन केले असुन सायंकाळी सात ते दहा त्यानंतर प्रसादाचे आयोजन आहे. भक्तांनी कार्यक्रमात सहभाग नोंदवावा असे आवाहन आयोजक समितीने केले आहे.

## स्व.ॲड.भैय्यासाहेब काळेंना आदरांजली



**महासागर प्रतिनिधी**

**आर्वी , दि. २३ :** कृषक शिक्षण संस्थाचे अध्यक्ष स्व.ॲड.भैय्यासाहेब काळे यांच्या पुण्यतिथी ते जयंतीनिमित्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे विविध विद्यार्थीपयोगी उपक्रम व स्पर्धा राबवून स्व. ॲड.भैय्यासाहेब काळे यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. ॲड.भैय्यासाहेब काळे यांच्या जयंतीनिमित्त सामूहिक वाचन दिनाच्या माध्यमातून महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांनी सामूहिकरीच्या वाचन केले. मौन श्रध्दांजलीच्या माध्यमातून त्यांच्या विचारांना उजाळा दिला.

एक राष्ट्र, एक निवडणूक प्रशासकीयदृष्ट्या योग्य आहे. या विषयावर वादविवाद स्पर्धा घेण्यात आली यामध्ये २३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यानंतर ' भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे योगदान ' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये १८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यानंतर प्रश्नमंजूषा स्पर्धा (सामान्य ज्ञान व चालु घडामोडी संदर्भात) घेण्यात आली.

यामध्ये प्रत्येक शाखेतून प्रत्येकी २ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन स्पर्धा यशस्वी केली. स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन रासेयो विभाग, सांस्कृतिक विभाग व ग्रंथालय विभाग यांचेमार्फत करण्यात आले होते.

रक्तदान शिबिर, दत्तक पालक योजनाचे दत्तक विधान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिरामध्ये २४ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. सोबतच ८७ विद्यार्थिनींचे हिमोग्लोबिन तपासणी या शिबिरामध्ये करण्यात आली. विद्यार्थ्यांसोबतच महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून आदरांजली वाहिली. या शिबिराचे समन्वय रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष पेठे यांनी केले.

या सर्व उपक्रमांना कृषक शिक्षण संस्था अध्यक्ष ॲड.शोभा काळे आर्वी, सचिव प्रदीप काळे , कोषाध्यक्ष संदिप काळे, सचिव, डॉ.हरिभाऊ वेरुळकर आदी मान्यवरांनी भेटी देउन स्व.ॲड.भैय्यासाहेब काळे यांना आदरांजली अर्पण केली. याप्रसंगी डॉ.रविंद्र सोनटक्के, डॉ.पुरुषोत्तम माळोदे, डॉ.संजय धनविजय, प्रा.मनोहर कोल्हे, प्रा.धर्मेंद्र राऊत,संजय मेश्राम, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

# २९ सप्टेंबरला शौर्य दिनाचे आयोजन

**वर्धा:** जिल्हा सैनिक कार्यालय, माजी सैनिक संघटना, सामाजिक संस्था आणि नालसा विर परिवारसहायता योजना विधी सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयात दि.२९ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता शौर्य दिन साजरा करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या अध्यक्षतेखाली होर्णाऱ्या कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमादरम्यान युध्दविधवा तसेच वीरमातांचा मान्यवरांच्याहस्ते सत्कार करण्यात येणार आहे.यावेळी २९ सप्टेंबर २०१६ रोजी भारतीय लष्कराने पाकिस्तानी हद्दीत घुसुन केलेल्या सर्जिकल स्ट्राईकबाबतची माहिती देण्यात येणार आहे. कार्यक्रमाला माजी सैनिक, माजी सैनिकांचे कुटूंबिय तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी श्रीपती मोरे यांनी केले आहे.

### जाहीर सूचना

ट्र व्हीलर अजय दुर्योधन मेश्राम MH 32Z-7346 होन्डा शाईन, Chesses No. Me4JC-36JAE7780111, Engine No. JC363-E73265993 पत्नीचे नावे सारिका अजय मेश्राम, रा. विक्रमशीला नगर, हनुमान मंदिरजवळ, वर्धा यांचे नावे करावयास आहे करीता जाहीरनामा देण्यात येत आहे.

### -: जाहीर नोटीस :-

नमुना क्रमांक - १

अमरावती येथील म.ह्.प. शेळके, प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय यांच्या न्यायालयीन

पिटीशन क्र. अ. २२१/२०२४ P. No. 837
पेशी दिनांक १४/१०/२०२५ Dt. 01/08/2025

सौ. अवंतिका अतुल मोघे .......... वादी
विरुद्ध
अतुल आनंदराव मोघे ..... प्रतिवादी

प्रति,

अतुल आनंदराव मोघे, रा. फ्लॅट नं. २०३ विंग बी, एम्बाल्ड ४ ग्रीन सिटी घोटाळ पंजारी, नागपूर, ता.जि. नागपूर.

ज्याअर्थी उपरनामित अर्जदारांनी आपल्या विरुद्ध वाद पत्रात नमूद केल्याप्रमाणे दावा दाखल केला आहे.

आपणास हे समन्स बजावल्यापासून ३ आठवड्याच्या आत न्यायालयाच्या परवानगीसह व्यक्तीशः आपली उपस्थिती व्हावी आवश्यक आहे. आणि त्याअर्थी सदरहू दावा निर्देशकरिता दिनांक १४/१०/२०२५ दिवशी न्यायाधीशांच्या बोर्डावर ठेवण्यात येईल.

आपणास याद्वारे कळविण्यात येते की, आपण वादीच्या दाव्याला उत्तर देण्याकरिता न्यायाधीशांच्या समोर दिनांक १४/१०/२०२५ या दिवशी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहावे.

वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित पक्षकाराचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालयाचे समुपदेशक यांचे समोर सुनावणीच्या तारखेसंबंधी आणि पिटीशन संबंधातील अन्य प्रकरणाबाबत निर्देश देतील याची नोंद घ्यावी.

आपणास अधिक अशीही सूचना देण्यात येते की, आपणावर निर्देश दिल्याप्रमाणे व्यक्तीगत आपली उपस्थिती दाखल करण्या कामी कसूर केल्यास किंवा वर नमूद केलेल्या दिवशी न्यायाधीश समोर उपस्थित राहण्यास कसुर केल्यास पिटीशन त्याच दिवशी किंवा कोणत्याही पुढील दिवशी बचाव दिलेला नाही या मथळ्याखाली बोर्डावर ठेवण्यात येईल आणि आपणाविरुद्ध हुकूमनामा किंवा आदेश संमतपत्र राहाल.

मुख्य न्यायाधीश कौटुंबिक न्यायालय, अमरावती यांचे सहीने आज दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी दिले.

आदेशानुसार,
प्र. प्रबंधक,
कौटुंबिक न्यायालय, अमरावती

### जाहिर सूचना

मेरे पक्षकार नामे शकील रशीद शेख, उम्र-४१ वर्ष, निवासी आशीनगर, कामठी रोड, छोटी मस्जीद के पास, नागपुर इन्होंने दी हुई जानकारी, निर्देश एवं अधिकार अनुसार आम जनता को सूचित किया जाता है की, इन्होंने प्लॉट नं. ९०४, खसरा क्र. १२३/१, सिटीएस क्रं. १४५४, बुद्ध नगर, मौजा-इंदोरा, नागपुर यहाँ स्थित एक मकान संजय बावनगडे इनसे सन २०२५ में खरीदा है। इस मकान के सामने १) वाहन होंडा ॲक्टीवा एमएच-४९-आर-६९४६, २) हिरो होंडा फॅशन क्र. एमएच-३१-डीड-९५६७ और एक सिलेंड यह वस्तुएं है और वह सन जनवरी २५ से पड़ी है। और वह सामान वहीं पर लावारिस की तरह है। यदि इस सामान की चोरी या तुटफुट होती है तो इसकी जिम्मेदारी घर मालक की नहीं रहेगी। इसकी जानकारी इन्होंने पांचपावली पोलीस स्टेशन में दी थी।

उपरोक्त सामान यह ७ दिन के अंदर लेकर जाये अन्यथा मेरे पक्षकार/घर मालक की कोई जबाबदारी नहीं रहेगी।

नागपुर
दिनांक: २३/०९/२०२५

(शिल्पा एस. श्रीवास)
अधिवक्ता
पत्ता : प्लॉट नं. ३६५, सत्नाम धाम रोड, जरीपटका, नागपुर - ४४००१४
मो. ९३७२६९३११५, ८६६८३७३४५३

### महसूल व वनविभाग
### कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड- ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११६४

प्र.क्र. ०९/प्रसु-३/जन्म (शहर)/कावि-१६३/२०२५ दिनांक २२/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. म ा . उ प . सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-श्र अ.वि. १०/०३/२०२५, ३. म ा . जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अकम/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. श्री. परशुदास गोपालदास महंत, रा. न्यु नंदनवन पाण्याच्या टाकीजवळ मो. ९२८४३०१२५७

### -: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार श्री. परशुदास गोपालदास महंत, रा. नंदनवन पाण्याच्या टाकीजवळ मो. ९२८४३०१२५७ यांनी त्यांच्या मोठील मुलगा यांच्या जन्म तारखेची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार मुलगा नामे रोशन परशुदास महंत जन्म दिनांक २५/०४/१९७५ रोजी घरी झालेला आहे. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमुद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गुणवत्तीकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणाचा काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत पुढल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

### कोर्ट विद्यमान श्रीमती प्रियंका अं. पटेल, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, आष्टी
ता. आष्टी, जि. वर्धा

### -: जाहिरनामा :-

(MJC) किरकोळ अर्ज क्र. ५०/२०२५
Bom. Reg. Act of VIII, 1827
पु.ता. ०१/११/२०२५
प्रोसेस नं. ७५०/२५ दिनांक १७/०९/२०२५

अर्जदार : संजय देवीदास साळवीकर
विरुद्ध
गैरअर्जदार: निरंक

ज्याअर्थी अर्जदार - संजय देवीदास साळवीकर, वय ५५ वर्ष, रा. ह.मु. कोंढाळी, ता. काटोल, जि. नागपूर यांनी मयत - शकुंतला देवीदास साळवीकर, मृत्यु दिनांक १२/०६/१९७३, रा. काकडदरा, आष्टी, ता. आष्टी, जि. वर्धा व देवीदास विश्वनाथ साळवीकर, मृत्यु दिनांक १६/०३/१९९७, रा. वार्ड क्र. २, पुलगांव, जि. वर्धा यांचे वारस असल्याबाबतचा अनुशांगिक ओळख म्हणून वारसान प्रमाणपत्र (Legal Heir-Ship Certificate) मिळण्याबाबतचा अर्ज या न्यायालयात सादर केलेला आहे. म्हणून सदर अर्जदार ज्या कुणालाही आक्षेप/उजर घ्यावयाचा असेल त्यानी मा. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, आष्टी, ता. आष्टी, जि. वर्धा येथे जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत सकाळी ११.०० वाजता जातीने हजर राहावे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ ज्यांचा आधार घेवू इच्छितो असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी सादर करावेत उपरोक्त कालावधीत कोणीही हजर न राहिल्यास अर्जाची सुनावणी होवून निर्णय देण्यात येईल, याची सर्वांनी दखल घ्यावी.

करीता आज दिनांक १७/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशान्वये
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय क. स्तर, आष्टी

### Change Of Name

MY OLD NAME WAS **NEHA SUBHASHCHANDRA AGRWAL**. NOW MY NEW NAME IS **NEHA ROHIT GOENKA.**
**ADD :** AT POST - AKHADA BALAPUR, HINGOLI 431701

I **KARAN SINGH CHANDEL** CHANGING MY DAUGHTERS NAME IN HER PASSPORT NO **J3367528.** HER OLD NAME WAS **VADIKA CHANDEL** AND NOW NEW NAME IS **VEDIKA KARANSINGH CHANDEL.**
**ADD:** ALLAPALLI ROAD SHIVAJI WARD BALLARPUR CHANDRAPUR 442701

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **N2587967.** MY OLD NAME WAS **DHARABEN BHARATBHAI GAJERA** AND NOW NEW NAME IS **DHARA ADITYA MANGROLIA.**
**ADD:** PLOT NO 17 FIVESTAR CO-OP HOU SOCIETY RAMDASPETH NAGPUR 440010

MY OLD NAME WAS **MOHAMMED ZAHID**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD ZAHID MOHAMMAD SADIQUE.**
**ADD :** H NO 41A, AULIYA NAGAR TAJBAG NAGPUR 440024

MY OLD PASSPORT NO, **P3438872**, MY OLD NAME WAS **VAISHNVI RAMESH TALEKAR**, NOW MYNEW NAME IS, **VAISHNAVI RAMESH TALEKAR.**
**ADD:** PLOT NO.15, NEAR SAI MANDIR AYODHYA NAGAR NAGPUR - 440024

MY OLD NAME WAS **ABDUL QAYYUM SHAIKH ISA**. NOW MYNEW NAME IS, **QAYUM SHAIKH ISA SHAIKH.**
**ADD:** SHAH COLONY UMARKHED DISTRICT YAVATMAL 445206

MY OLD NAME WAS **PRAVINKUMAR HARISHKUMAR MANGHARAMANI**. NOW MY NEW NAME IS **PRAVIN HARISH MANGHARAMANI.**
**ADD:** HOUSE NO 23,SHRI NARAYAN KRUPA, DATE COLLEGE ROAD, BEHIND LOYA HOSPITAL, VAIDYA NAGAR, YAVATMAL-445001

MY OLD PASSPORT NO, **N5471959**. MY OLD NAME WAS **MANGALA NARENDRA PATOLE**. NOW MY NEW NAME IS **MANGALA NANA PATOLE.**
**ADD:** FLAT NO 101 KESHAV KALA APARTMENT WARDHA ROAD RAHATE COLONY NAGPUR 440022

MY OLD NAME WAS **NARENDRA FALGUNRAO PATOLE**. NOW MY NEW NAME IS **NANABHAU FALGUNRAO PATOLE.**
**ADD:** FLAT NO 101 KESHAV KALA APARTMENT WARDHA ROAD RAHATE COLONY NAGPUR 440022

MY OLD NAME WAS **NARENDRABHAI SHIVGANBHAI PATEL / NARENDRAKUMAR SHIVGAN PATEL**. NOW MY NEW NAME IS **NARENDRA SHIVGAN PATEL.**
**ADD:** PLOT NO 26, HIWRI LAYOUT, NEAR POONAM MALL, NAGPUR-440008

MY OLD NAME WAS **MAHEKKUMAR NARENDRABHAI PATEL / MAHEKKUMAR NARENDRA PATEL**. NOW MY NEW NAME IS **MAHEK NARENDRA PATE.**
**ADD:** PLOT NO 26, HIWRI LAYOUT, NEAR POONAM MALL, NAGPUR-440008

MY OLD NAME WAS **RAJESHSINGH BAGHEL**. NOW MY NEW NAME IS **RAJESH BAGHEL.**
**ADD:** HOUSE NO. 906, NEAR BORKAR HOUSE JUNI VASTI ZINGABAI TAKLI MANKAPUR NAGPUR - 440030

MY OLD NAME WAS **RADHA RAJESHSINGH BAGHEL**. NOW MY NEW NAME IS **RADHA RAJESH BAGHEL.**
**ADD:** HOUSE NO. 906, NEAR BORKAR HOUSE JUNI VASTI ZINGABAI TAKLI MANKAPUR NAGPUR - 440030

MY OLD PASSPORT NO, **U3348705.** MY OLD NAME WAS **ASHUTOSH RAJESHSINGH BAGHEL**. NOW MY NEW NAME IS **ASHUTOSH RAJESH BAGHEL.**
**ADD:** HOUSE NO. 906, NEAR BORKAR HOUSE JUNI VASTI ZINGABAI TAKLI MANKAPUR NAGPUR -440030

MY OLD NAME WAS **TAUSIF AHMAD QURESHI GHULAM AHMAD QURESHI**. NOW MY NEW NAME IS **TOUSIF AHMAD GULAM MOHAMMAD.**
**ADD:** PLOT NO 184 BADA TAJBAGH NIRALA SOCIETY AALEMA MADARSA NAGPUR 440024

MY OLD NAME WAS **MALA GOVINDRAM AHUJA**. NOW MY NEW NAME IS **CHAHAT RAKESH MANUJA.**
**ADD:** CITRA NAGAR HARIKASHI NAGAR GONDIA 441601

MY PASSPORT NO.**E5195930** IS MY INCORRECT NAME WAS **MOHAMMAD SHAMIM.** NOW CORRECT NAME IS **MOHD SHAMIM ANSARI.**
**ADD:** BEHIND BAKRA MANDI, MOMINPURA ,NAGPUR MS 440018

I **KANEEZ FATMA MOHAMMED HASHIM** DECLARED THAT MY SON PASSPORT NO. **J0199569** IS MY INCORRECT NAME WAS **KANEEZ FATEMA.** NOW CORRECT NAME IS **KANEEZ FATMA MOHAMMED HASHIM.**
**ADD:** PLOT NO.49-C, GOREWADA ROAD, RATHOR LAYOUT,ANANT NAGAR,NAGPUR MS 440013


RNINo-20789/71 महासागर नागपूर पालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सितावर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७१४७७३५८५१/९९२२९७००२३/७२४३७३५८५३




## ...म्हणून दुखतं डोकं

डोकेदुखी ही सर्वसाधारणपणे आढळणारी समस्या. ताणतणाव, अपुरी झोप, थकवा अशा कारणांमुळे डोकं दुखू शकतं. यासोबतच काही अन्नपदार्थांच्या सेवनामुळेही डोकेदुखीचा त्रास जाणवू शकतो. आपण अनवधनाने आहार-विहाराशी संबंधित बऱ्याच चुका करतो. डोकेदुखीला कारणीभूत ठरणाऱ्या काही अन्नपदार्थांविषयी...

**कुठे चुकतो आपण?**



✻ कॅफेनच्या अतिसेवनामुळे डोकं दुखू शकतं. तसंच चहा, कॉफीसारख्या पदार्थांचं सेवन अचानक बंद केल्यास त्रास होऊ शकतो. त्यामुळे चहा, कॉफीचं सेवन मर्यादित प्रमाणात करावं.

✻ साखरेला पर्याय म्हणून सुक्रालोज, सॅकरिन, एससल्फेमसारखे घटक वापरले जातात. अशा घटकांच्या अतिसेवनामुळे डोकं दुखू शकतं. त्यामुळे कृत्रिम गोड पदार्थांचं सेवन टाळणं योग्य ठरतं.

✻ अल्कोहोलमुळे शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होते. त्यामुळे नियमित मद्यपान करणाऱ्यांना डोकेदुखीचा त्रास होतो. डोकेदुखी टाळण्यासाठी मद्यपानावर नियंत्रण आणणं गरजेचं आहे.

✻ चॉकलेटचं अतिसेवनही त्रासदायक ठरू शकतं. चॉकलेटमध्ये कोकोचं प्रमाण कमी असतं. तसंच यात टायरामीन, कॅफेनसारखे घटकही असतात. यामुळे डोकं दुखू शकतं.

## गर्भवती महिलांना संसर्गाचा जास्त धोका

इतर ऋतूंच्या तुलनेत पावसाळ्यात संसर्गाचा धोका अधिक वाढतो. गर्भवती महिलांना याचा सर्वाधिक धोका असतो. गर्भवती महिलांची रोगप्रतिकारकशक्ती कमी असल्याने मूत्रमार्गाचे संक्रमण (यूटीआय), विषाणूजन्य ताप, योनीमार्गात संसर्ग, डेंगी, मलेरिया, पोटाचे संसर्ग आणि कावीळ यासारखे आजार बळावण्याचा धोका जास्त असतो. पावसाळा हा गर्भवती महिलांसाठी मोठ्या प्रमाणात चिंतेचा विषय ठरतो. या दिवसात वातावरणातील आर्द्रता आणि दमटपणामुळे सर्दी आणि फ्लूसारख्या श्वसनाच्या समस्यांमध्ये वाढ होते. यामुळे खोकला, शिंका येणे आणि अंगदुखी अशी लक्षणे दिसून येतात. मिठाच्या पाण्याने गुळण्या करणे, वाफ घेणे, विविध स्वरुपातील द्रवपदार्थांचे सेवन आणि पुरेशी विश्रांती करणे गरजेचे आहे. उघड्यावरील अन्न पदार्थांचे सेवन टाळणे तसेच दूषित पाण्यामुळेदेखील पोटाच्या संसर्गाचा धोका वाढतो. त्यामुळे उलट्या, अतिसार आणि निर्जलीकरण होते. या दिवसात स्ट्रीट फुड टाळणे, योग्यरित्या शिजवलेल्या ताज्या, गरम अन्नाचे सेवन करणे, गाळून, उकळून थंड केलेले पाणी पिणे गरजेचे आहे.

डासांमुळे होणारे डेंगी आणि मलेरियासारखे आजार गर्भवती महिलांकरिता त्रासदायक ठरू शकतात. यासाठी डास प्रतिबंधक उपायांचा वापर करणे, संपूर्ण अंग झाकणारे पूर्ण बाह्यांचे कपडे घालणे आणि सांडपाण्याचा निचरा करणे यासारख्या प्रतिबंधात्मक उपायांचा अवलंब करणे योग्य ठरते. डेंगीच्या लक्षणांमध्ये तीव्र ताप, डोकेदुखी, उलट्या आणि सांधेदुखी यांचा समावेश आहे तर मलेरियामुळे ताप, थंडी वाजून येणे आणि थकवा येणे अशी लक्षणे आढळतात. विषमज्वर हा दूषित अन्न आणि पाण्याद्वारे पसरू शकतो. त्यामुळे अशक्तपणा आणि भूक न लागणे यासारख्या



**आरोग्य वार्ता**

**डॉ. मेघा पठारे**

समस्या उद्भवू शकतात. 'व्हायरल हेपेटायटीस' मुळे होणाऱ्या काविळीमुळे त्वचा आणि डोळे पिवळे होऊ शकतात. गर्भधारणेदरम्यान मूत्रमार्गाचे संसर्ग (यूटीआय) ही एक सामान्य घटना आहे आणि ती अस्वच्छता किंवा जास्त ओलावा असल्यास आणखी वाढू शकते. यासाठी श्वास घेण्यायोग्य सुती कपड्यांचा वापर करणे, भरपूर द्रव पदार्थांचे सेवन करणे आणि स्वच्छता राखणे गरजेचे आहे.

गर्भधारणा हा महिलांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा असतो. हंगामी संसर्गामुळे तो आव्हानात्मक ठरु शकतो. एका महिन्यात २५-३७ वयोगटातील दहापैकी पाच गर्भवती महिलांना डेंगी, गॅस्ट्रोइंटेस्टाइनल इन्फेक्शन किंवा यूटीआयची समस्या आढळून येते. या आजाराचे कारण आणि लक्षणे निश्चित केल्यानंतर उपचारांची पद्धत ठरवली जाते. रुग्णांना स्वतःच्या मर्जीने औषधोपचार न करण्याचा सल्ला दिला जातो, कारण ते धोकादायक ठरु शकते. महिलांनी ताजे अन्न, स्वच्छ पाणी, डास प्रतिबंधात्मक उपाय तसेच वैयक्तिक स्वच्छतेवर भर दिला पाहिजे. संध्याकाळी घराबाहेर पडणे टाळावे आणि घराजवळील कुंड्यांमध्ये, टायरमध्ये किंवा भांड्यांमध्ये पावसाचे पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. कोणतीही असामान्य लक्षणे आढळल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

## उच्च रक्तदाबाचा यकृतावरही परिणाम

उच्च रक्तदाबाला अनेकदा 'सायलेंट किलर' म्हटले जाते. कारण हा आजार फक्त हृदयावरच परिणाम करत नाही, तर हळूहळू यकृतालाही नुकसान पोहोचवतो. अनेक वेळा लोक त्याची लक्षणे थकवा, ताणतणाव किंवा वाढत्या वयाशी जोडून दुर्लक्ष करतात. एका अभ्यासानुसार उच्च रक्तदाब असलेल्यांना 'लिव्हर फायब्रोसिस'चा धोका जास्त असतो. मेटाबॉलिक समस्येमुळे फॅटी लिव्हरची समस्या असलेल्यांमध्ये हा धोका आणखी वाढतो.

**आरोग्यवेध**

**डॉ. गोविंद भोसले**

**सतत थकवा आणि सुस्ती**

पुरेशी विश्रांती घेतल्यानंतरही शरीर थकल्यासारखे वाटत असेल किंवा नेहमीच सुस्ती जाणवत असेल तर हे यकृतावरील ताणाचे लक्षण असू शकते. उच्च रक्तदाबामुळे यकृताचे काम बिघडते आणि शरीरातील ऊर्जानिर्मिती आणि पोषक तत्वांचे नीट शोषण होत नाही. हा थकवा साध्या थकव्यापेक्षा वेगळा असतो.

**पोटात वेदना**

उजव्या बाजूच्या वरच्या पोटात वेदना किंवा जडपणा जाणवणे हे यकृतात सूज किंवा लिव्हर वाढल्याचे लक्षण असू शकते. बरेचदा लोक अपचन किंवा गॅसचा त्रास मानून याकडे दुर्लक्ष करतात; मात्र अल्ट्रासाऊंडसारख्या तपासण्यांमुळे वेळेत लिव्हर एन्लार्जमेंट ओळखता येते आणि गंभीर नुकसान टाळता येऊ शकते.

**पिवळेपणा आणि त्वचेतील बदल**

त्वचा किंवा डोळ्यांमध्ये थोडासा पिवळसरपणा दिसणे हे यकृत बिघडल्याचे स्पष्ट संकेत आहे. उच्च रक्तदाबामुळे यकृताच्या समस्या वाढू शकतात आणि त्यातून बिलिरुबिनची पातळी वाढते. त्वचेतील अगदी हलके रंगबदलही दुर्लक्षित करू नयेत.

## सतत थकवा येतोय...

बऱ्याचजणांना दिवसभर थकवा जाणवतो. दुपारच्या जेवणानंतर झोप येते. सकाळी उठल्यानंतर ताजंतवानं वाटत नाही. हा थकवा दूर करून दिवसभर उत्साह टिकवून ठेवयचा असेल तर आहारात काही पदार्थांचा समावेश करता येईल.

✻ उन्हाळ्यात कलिंगड खाता येईल. शरीरात पाण्याची कमतरता निर्माण झाली की दिवसभर थकल्यासारखं वाटतं. म्हणूनच कलिंगडासारख्या रसाळ पदार्थांचं सेवन वाढवायला हवं. कलिंगडात ९० टक्के पाणी असतं. तसंच यात जीवनसत्त्वं आणि पोषक घटक असतात. त्यामुळे तुम्ही ताजेतवाने होता.

✻ बदाम खाल्ल्यामुळे अंगात दिवसभर उत्साह टिकून राहतो. बदामातल्या 'ब' जीवनसत्त्वामुळे अन्नाचं रुपांतर ऊर्जेत होतं. बदामात मॅग्नेशियम हा घटक असतो. मॅग्नेशियममुळे स्नायूंचा थकवा दूर होतो.



**काय खावं?**

✻ अंड्यातली प्रथिनं आणि आरोग्यदायी फॅट्समुळे उत्साह दिवसभर टिकून राहतो. यात लोह, बी १२ आणि 'ड' ही जीवनसत्त्वं असतात.

✻ सफरचंदामुळे मेंदू आणि शरीराला ऊर्जेचा पुरवठा होत राहतो. यात फ्रुक्टोज हा घटक असतो. फ्रुक्टोसमुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि आपण दिवसभर ताजचतवानं राहतो.

✻ केळं हा सुद्धा ऊर्जेचा खूप चांगला स्रोत आहे. यात पोटॅशियम आणि फायबर हे घटक असतात. केळ्यातल्या फायबरमुळे साखर रक्तात शिरण्याचा वेग मंदावतो. तसंच केळ्यातून 'ब' जीवनसत्त्व आणि मॅग्नेशियम हे घटकही मिळतात.




## स्टेथोस्कोपमधील 'एआय' शोधतो १५ सेंकदात आजार

तंत्रज्ञान आणि आरोग्यसेवेचा समन्वय आता पूर्वीपेक्षाही जलद झाला आहे. आता स्टेथोस्कोपमध्येही कृत्रिम बुद्धिमत्ते(एआय)ने प्रवेश केला आहे. रुग्णांचे आरोग्य योग्यरित्या पाहण्यासाठी हे नवीन तंत्रज्ञान डॉक्टरांना खूप उपयुक्त ठरत आहे. विशेष म्हणजे आता फक्त १५ सेकंदात अनेक आजार शोधता येतात.

**'एआय' स्टेथोस्कोप कसा काम करतो?**

या स्मार्ट स्टेथोस्कोपमध्ये सेन्सर्स आणि 'एआय अल्गोरिदम' आहेत. डॉक्टर तो रुग्णाच्या छातीवर किंवा पाठीवर ठेवतात आणि श्वास ऐकतात तेव्हा ते आवाज रेकॉर्ड करतात. 'एआय' त्या आवाजाचे विश्लेषण करते आणि रुग्णाला हृदय, फुफ्फुस किंवा इतर अवयवांच्या आजाराचा धोका आहे की नाही, हे काही सेकंदात सांगते.

**कोणते आजार शोधता येतात?**

**नवसंशोधन**

**डॉ. कुंदन गायकवाड**

'एआय स्टेथोस्कोप'ने काही मोठे आजार लवकर शोधता येतात. त्यामुळे हृदयाचा आवाज, हृदयविकाराचा झटका, हृदय अपयशाचे संकेत मिळतात. त्याचबरोबर दमा, ब्राँकायटिस, फुफ्फुसात पाणी होणे आदीबाबत ते माहिती देते. उच्च रक्तदाब किंवा अडथळा, संसर्ग आणि दाह आदींची माहिती ते देते. पूर्वी, डॉक्टर रुग्णाचा श्वास ऐकून किंवा छातीची तपासणी करून रोगाचे निदान करण्यासाठी काही मिनिटे किंवा तास घेत असत. 'एआय स्टेथोस्कोप'द्वारे ही प्रक्रिया फक्त १५ सेकंदात पूर्ण होते. त्यामुळे वेळ आणि मेहनत दोन्ही वाचतात. याशिवाय, सुरुवातीच्या टप्प्यात रोग आढळल्यास उपचार जलद आणि सोपे होतात. 'एआय स्टेथोस्कोप' डॉक्टरांना मदत करते; परंतु ते त्यांची जागा घेऊ शकत नाही. विशेषज्ञ डॉक्टर सहज उपलब्ध नसलेल्या ठिकाणी, विशेषतः दुर्गम आणि ग्रामीण भागात हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरु शकते.

**भविष्यातील शक्यता**

'एआय'च्या या वापरामुळे, आरोग्यसेवेमध्ये रिअल-टाइम देखरेख आणि चांगले अंदाज मिळवणे शक्य आहे. भविष्यात, हे तंत्रज्ञान अधिक स्मार्ट होईल आणि स्वयंचलित अहवाल आणि डेटा विश्लेषणदेखील करेल. स्टेथोस्कोपमध्ये 'एआय'चा प्रवेश आरोग्यसेवेसाठी एक क्रांतिकारी बदल आहे. यामुळे डॉक्टरांना रोग लवकर, अचूक आणि सुरुवातीच्या टप्प्यात ओळखण्यास मदत होते. आता फक्त १५ सेकंदात रुग्णाच्या आरोग्याचे मूल्यांकन करणे शक्य आहे, जेणेकरून उपचार लवकर सुरु करता येतील आणि रुग्णांचे प्राणही वाचू शकतील.

## मानेभोवतीचा काळेपणा दुर्लक्षू नका

मानेभोवती काळेपणा ही एक सामान्य समस्या आहे. मानेचा काळेपणा किंवा त्याभोवतीची त्वचा काळी पडणे हे कधी कधी शरीरात होणाऱ्या काही बदलांचे लक्षण असू शकते. मानेवर काळे डाग किंवा वर्तुळे दिसू लागल्यास दुर्लक्ष करू नये. हे शरीराच्या आत होणाऱ्या आरोग्य समस्येचे लक्षण असू शकते. ते वेळीच ओळखणे आणि उपचार करणे खूप महत्वाचे आहे.

बरेच लोक अनेकदा चेहऱ्याचे सौंदर्य राखताना मानेकडे लक्ष देत नाहीत. मानेची त्वचा चेहऱ्यापेक्षा जास्त संवेदनशील असते आणि त्यावर धूळ, घाम आणि घाण सहजपणे जमा होऊ शकते. त्यामुळे त्वचेचा रंग बदलू शकतो. कधी कधी हा बदल फक्त बाहेरूनच दिसून येतो आणि वेळेवर योग्य उपाययोजना करून बरा करता येतो; परंतु कधी कधी तो शरीरात होणाऱ्या मोठ्या बदलाचे लक्षणदेखील असू शकतो. मानेतील काळेपणाची अनेक कारणे असू शकतात. यापैकी काही कारणे आपल्या जीवनशैलीशी संबंधित आहेत, तर काही गंभीर आरोग्य समस्यांशी संबंधित असू शकतात.

**मानेवरील काळेपणाची कारणे**

मानेवरील त्वचा खूप संवेदनशील असते आणि ती चेहऱ्याच्या त्वचेपेक्षा वेगळी असते. त्यामुळे चेहऱ्याच्या त्वचेकडे लक्ष देऊनही, मानेवरील त्वचेकडे दुर्लक्ष केले जाते. यामुळे मानेवर घाण, घाम आणि धूळ साचते. त्यामुळे काळेपणा येऊ शकतो. चुकीचे अन्न आणि त्वचेची योग्य काळजी न घेतल्यानेदेखील मानेचा काळेपणा येऊ शकतो. अस्वास्थ्यकारक अन्न, विशेषतः जंक फूड आणि जास्त साखरेचे सेवन, त्वचेच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम करू शकते. कधी कधी शरीरातील हार्मोनल असंतुलनामुळे मानेचा काळेपणा वाढू शकतो. विशेषतः महिलांमध्ये, पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम (पीसीओएस) सारख्या स्थितीत इन्सुलिनची पातळी वाढल्यामुळे मानेवरील काळेपणा वाढू शकतो. याशिवाय, मधुमेहाने ग्रस्त असलेल्या लोकांमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण जास्त असते आणि



**आरोग्यमंत्र**

**डॉ. महेश दळे**

यामुळे मानेवर काळेपणा येऊ शकतो. याशिवाय उच्च इन्सुलिन पातळीमुळे त्वचेचा काळेपणा येतो. कुशिंग सिंड्रोम या स्थितीमध्ये शरीरात कोर्टिसोल हार्मोनची पातळी वाढते. ही स्थिती गंभीर आजाराचे लक्षण असू शकते. त्यामुळे मानेवर काळेपणा दिसून येतो.

**मानेवरील काळेपणाशी संबंधित आजारांची लक्षणे**

✻ **रक्तातील साखर आणि इन्सुलिन असंतुलन:** मानेभोवती काळी वर्तुळे असणे हे मधुमेह किंवा इन्सुलिन प्रतिरोधकता सारख्या समस्या असल्याचे लक्षण असू शकते.

✻ **हार्मोनल बदल:** 'पीसीओएस' किंवा इतर हार्मोनल असंतुलनसारख्या समस्यांमुळे मानेवर काळेपणा येऊ शकतो.

✻ **कुशिंग सिंड्रोम:** शरीरात कोर्टिसोल हार्मोनची पातळी वाढत असल्यामुळेदेखील मानेवर काळेपणा येऊ शकतो.

## लाभदायी पदाभ्यंग

आयुर्वेदात पायांना प्रचंड महत्त्व आहे. आपले पाय शरीराचा आधारस्तंभ आहेत. म्हणूनच त्यांची नीट काळजी घ्यायला हवी. पायाच्या नसांना आराम द्यायला हवा. यासाठी आयुर्वेदात पदाभ्यंग नावाचा मसाज



**आयुर्वेद आणि विकार**

सांगितला आहे. हा मसाज अत्यंत आरामदायी आहे. आयुर्वेदिक तेलांनी पायांना मसाज केल्यामुळे नसांवरचा ताण कमी होतो आणि पर्यायाने सर्वांगिण आरोग्य सुधारतं. पायांना मसाज केल्यानंतर संपूर्ण शरीरातल्या अवयवांना आराम मिळतो. पदाभ्यंग रात्री झोपण्याआधी करण्याचा मसाज आहे. दररोज पदाभ्यंग केल्यामुळे अनेक लाभ मिळतात. पदाभ्यंगामुळे शरीरातल्या त्रिदोषांचं संतुलन साधलं जातं. पदाभ्यंगामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. यामुळे प्रतिकारशक्तीशी संबंधित आजारांना आळा घालता येतो. पदाभ्यंगामुळे मानसिक ताणतणाव, अस्वस्थता, भीती, काळजी या मानसिक आजारांची तीव्रता कमी होते. मानसिक शांतता लाभते. निद्रानाशाची समस्या असेल तर पदाभ्यंग करून घेता येईल. पदाभ्यंगामुळे रक्ताभिसरण सुधारतं, दृष्टिदोष दूर होतात, श्रवणशक्ती सुधारते.

## 'इंटरमिटंट फास्टिंग'

आजकाल वजन कमी करण्यासाठी आणि फिट राहण्यासाठी लोक अनेक प्रकारच्या डाएट पद्धतींचा वापर करतात.

त्यातलीच सर्वात लोकप्रिय पद्धत म्हणजे 'इंटरमिटंट फास्टिंग'; पण ही पद्धत खरोखरच सुरक्षित आहे का? 'जर्नल ऑफ अमेरिकन हार्ट असोसिएशन' मध्ये प्रकाशित झालेल्या एका महत्त्वाच्या संशोधनाने हे दाखवून दिले आहे, की 'इंटरमिटंट फास्टिंग'मुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. या अभ्यासात हजारो लोकांचे दीर्घकाळ निरीक्षण करून निष्कर्ष काढण्यात आला. त्यात दिसून आले की 'इंटरमिटंट फास्टिंग' करणाऱ्यांना हृदयरोग आणि स्ट्रोकमुळे मृत्यू होण्याचा धोका अधिक असतो. म्हणजेच ही पद्धत अल्पकाळासाठी काहींना फायदेशीर ठरली, तरी पुढे आरोग्यास हानीकारक ठरू शकते.

**'इंटरमिटंट फास्टिंग' म्हणजे काय?**

या डाएट पद्धतीत लोक आपल्या खाण्याचे वेळापत्रक ठरवतात.



**घ्या काळजी**

**डॉ. प्रसन्न नेने**

उदाहरणार्थ १६ तास उपवास आणि आठ तास खाण्याची वेळ. असे केल्याने शरीरातील चरबी लवकर कमी होते, मेटाबॉलिझम सुधारतो असे मानले जाते; पण हे 'इंटरमिटंट फास्टिंग' चालू ठेवले किंवा योग्य आहार घेतला नाही, तर शरीराला आवश्यक पोषकतत्वांची कमतरता भासते.

**कोणते दुष्परिणाम?**

✻ पोषणाची कमतरतता: ठराविक वेळेत मर्यादित आहारामुळे व्हिटॅमिन्स आणि मिनरल्सची कमतरता भासू शकते.

✻ **हृदयविकाराचा धोका:** संशोधनानुसार, दीर्घकाळ या पद्धतीचा अवलंब केल्यास हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका वाढतो.

✻ **ब्लड शुगर असंतुलन:** मधुमेह असलेल्या रुग्णांमध्ये साखरेचे प्रमाण अचानक कमी जास्त होऊ शकते.

**नवसंशोधन**

### धूम्रपानामुळे



धूम्रपानामुळे होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल आपण जाणतो. धूम्रपानामुळे शारीरिक आरोग्य धोक्यात येतच, शिवाय मानसिक आरोग्यावरही दुष्परिणाम होतात. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. धूम्रपान, नैराश्य आणि चिंता यांच्यातला परस्परसंबंध दाखवून देणारा शोध नुकताच प्रसिद्ध झाला आहे. म्हणजे धूम्रपानामुळे आपलं मानसिक आरोग्य धोक्यात येऊ शकतं. धूम्रपान करणारे लोक नैराश्याला बळी पडण्याची शक्यता दुपटीने अधिक असल्याचं या संशोधनातून समोर आलं आहे. यामुळे धूम्रपानाचं प्रमाण कमी करणं गरजेचं आहे.

**दंतारोग्य**

### मुलांचे दात येताना



दात येणं हा प्रत्येक बाळाच्या शारीरिक जडणघडणीतला महत्त्वाचा टप्पा मानला जातो. काही मुलं दात येण्याच्या प्रक्रियेतून सहज तरून जातात तर काही मुलांना खूप त्रास होतो. दात येण्याआधी काही मुलांच्या हिरड्या सुजतात. काहींना हिरड्यांमध्ये वेदना जाणवतात. यामुळे बाळ अस्वस्थ होतं. म्हणूनच या काळात मुलं रडतात, चिडचिड करतात. त्यांना भूक लागत नाही. काही मुलं झोपतही नाहीत. त्यामुळे या काळात मुलांची विशेष काळजी घेणं गरजेचं आहे.

**जपणूक त्वचेची**


### वय वाढल्याच्या खुणा...



वय वाढल्याच्या खुणा त्वचेवर दिसू लागतात. खाद्यतेलापासून आहारातले विविध घटक त्वचेच्या आरोग्यावर परिणाम करतात. वय वाढल्याच्या खुणांमुळे त्वचा निस्तेज दिसू लागते. आपली त्वचा नैसर्गिक तजेला हरवून बसते. यामुळे हाडं आणि नसा दिसू लागतात. ही समस्या दूर करण्यासाठी भरपूर पाणी प्या. ग्रीन टीमुळेही त्वचेला तजेला मिळू शकतो. पोषक आहार, फळांचं सेवनही उपयुक्त ठरू शकतं. चिया सीड्स तसंच ॲव्हाकॅडोमुळेही त्वचेला आवश्यक पोषण मिळतं.

**आजीबाईचा बटवा**

### लाभदायी मखाणे



मखाणे खूप आरोग्यदायी आहेत. त्याच्या नियमित सेवनामुळे विविध प्रकारच्या आजारांपासून मुक्ती मिळू शकते. मखाण्यांमध्ये फॅट्सचं प्रमाण बरंच कमी तर फायबरचं प्रमाण बरंच जास्त असतं. सोडियमही बरंच कमी असतं. सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी मखाणे खाल्ल्यामुळे रक्तातली साखर नियंत्रणात राहू शकते. मखाणे हृदयाच्या आरोग्यासाठीही चांगले आहेत. यासोबतच बद्धकोष्ठता, निद्रानाश अशा विकारांवरही ते उपयुक्त ठरतात.

## ९९ टक्के गुणांसह नीट परीक्षा उत्तीर्ण
# अनुराग बोरकरची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २३ :
नीट परीक्षेत ९९ टक्के गुण मिळवून वैद्यकीय क्षेत्रात भविष्य घडवू पाहणाऱ्या अनुराग अनिल बोरकर (२०) या विद्यार्थ्याने घरात गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना सिंदेवाही तालुक्यातील नवरगाव येथे घडली. हुशार विद्यार्थ्याच्या आत्महत्येने नवरगाव गावावर शोककळा पसरली आहे.

सिंदेवाही तालुक्यातील नवरगाव येथील व्यापारी संघटनेचे अध्यक्ष अनिल बोरकर यांचा अनुराग हा मुलगा होता. त्याने नीट यूजी-२०२५ परीक्षेत ओबीसी प्रवर्गातून १४७५ वी रँक मिळवून घवघवीत यश संपादन केले होते.

त्याला उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस प्रथम वर्षाला प्रवेश मिळाला होता आणि याच प्रवेशासाठी त्याला आज मंगळवार २३ सप्टेंबर रोजी पहाटे गोरखपूरला जायचे होते.

मात्र, त्याआधीच त्याने आपले जीवन संपवले. मंगळवारी (दि. २३) पहाटे उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस प्रवेश करण्यासाठी जायचे असल्याने सोमवारी रात्री जेवण झाल्यानंतर बोरकर कुटुंब अंदाजे १०.३० च्या सुमारास झोपले.

मंगळवारी पहाटे २.३० वाजता अनुरागच्या आई बाथरूमकरिता उठली असता आईला त्याच्या खोलीतील लाईट सुरू असल्याचे दिसले. त्यांनी खोलीचा दरवाजा उघडून पाहिले असता, अनुराग पंख्याला पांढऱ्या नायलॉनच्या दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत लटकलेला आढळला.

त्यांनी तातडीने पती अनिल बोरकर यांना याची माहिती दिली. दोघांनी मिळून गळ्यातील दोर कापून त्याला खाली उतरवले, पण तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर सिंदेवाही पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सिंदेवाही येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवला.

अभ्यासात अत्यंत हुशार असलेल्या अनुरागचे दहावीपर्यंतचे शिक्षण सिंदेवाही येथील देवयानी इंटरनॅशनल स्कूलमधून झाले होते आणि बारावीचे शिक्षण त्याने नागपूरच्या सेंट पॉल ज्युनियर कॉलेजमधून पूर्ण केले होते. तो एक हुशार आणि मेहनती विद्यार्थी म्हणून ओळखला जात होता. त्याने आपल्या कठोर परिश्रमातून नीट परीक्षेत यश मिळवले होते, त्यामुळे त्याचे डॉक्टर बनण्याचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार होते.

अनुरागच्या या यशामुळे त्याचे शिक्षक, मित्र आणि नातेवाईक यांनी त्याचे अभिनंदन केले होते. त्याच्या अचानक जाण्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे. एवढे मोठे यश मिळवूनही अनुरागने हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे नेमके कारण अद्याप समोर आले नाही.

सिंदेवाही पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. एका यशस्वी विद्यार्थ्याने असे पाऊल उचलल्याने शैक्षणिक आणि करिअरच्या दबावाचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. अनुरागच्या मागे त्याचे आई-वडील आणि एक लहान बहीण असा परिवार आहे. मंगळवारी दुपारी अत्यंत शोकाकुल वातावरणात नवरगाव येथील मोक्षधाम परिसरात त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# समृद्धीवर सौरऊर्जा वीज निर्मितीलाही सुरुवात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
नागपूर व मुंबईला जोडणारा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वकांक्षी समजला जाणारा हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'समृद्धी महामार्ग' आता सौरऊर्जा निर्मितीसाठीही ओळखला जाणार आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या महामार्गावर सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केला आहे. बुलढाणा येथील कारंजालाड व वाशिम जिल्ह्यातील मेहकर इंटरचेंज येथील सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाला आहे. यामुळे समृद्धी महामार्ग देशातील असा पहिलाच पथदर्शी प्रकल्प ठरला आहे.

समृद्धी महामार्गावर बुलढाणा जिल्ह्यातील कारंजालाड आणि वाशिम जिल्ह्यातील मेहकर इंटरचेंज येथे सौरऊर्जा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात या प्रकल्पाची एकूण स्थापित क्षमता ९ मेगावॅट आहे. यापैकी कारंजालाड येथे ३ मेगावॅट तर मेहकर येथील प्रकल्पातून २ मेगावॅट वीज निर्मितीला प्रारंभ झाला आहे. यामुळे आता महामार्गावरील सौरऊर्जा प्रकल्पांना गती मिळणार आहे.

नागपूर आणि मुंबईला जोडणाऱ्या ७०१ किलोमीटर लांबीच्या समृद्धी महामार्गावरून आतापर्यंत २.२५ कोटींहून अधिक वाहनांनी प्रवास केला आहे. वेगवान प्रवासासोबतच सौरऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट महामंडळाने ठेवले होते. महामार्गावरील सर्व इंटरचेंजवर एकूण २०४ मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

बुलढाणा-वाशिम इंटरचेंजवर प्रकल्पाचा प्रारंभ : देशातील पहिला प्रकल्प



### रस्ते महामंडळासाठी उत्पन्नाचे स्त्रोत

या सौरऊर्जा निर्मितीमुळे टोलव्यतिरिक्त उत्पन्नाचा एक नवीन स्त्रोत महामंडळाला उपलब्ध झाला आहे. 'महासमृद्धी रिन्युएबल एनर्जी लि.' आणि 'महावितरण' यांच्यात झालेल्या करारानुसार, प्रति युनिट ३.०५ रुपये दराने ही वीज विकली जाईल.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळांची विशेष उद्देश वाहन कंपनी महासमृद्धी रिन्युएब्ल एनर्जी लि. व महावितरण यांच्या दरम्यान २०२२ मध्ये झालेला करारान्वये या विजेची विक्री करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना १ अंतर्गत निविदा प्रक्रियेत महामंडळाने प्रति युनिट ३.०५ रुपये दर दिला होता.

या प्रकल्पासाठी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली अधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक मनुज जिंदल यांनी सांगितले की, इतर प्रस्तावित महामार्गांवरही असे प्रकल्प राबवण्याचा विचार आहे. सौरऊर्जा निर्मितीमुळे मिळणारे 'कार्बन क्रेडिट' महामंडळाला पायाभूत प्रकल्पांसाठी कर्ज मिळवण्यात मदत करतील.

## बाबा गुजर यांचा अध्यक्षपदाचा तडकाफडकी राजीनामा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
तीन दिवसापूर्वी नागपूरमध्ये झालेल्या चिंतन शिबिरात पक्ष बळकट करण्याचा संकल्प करणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे नागपूर जिल्हा अध्यक्ष बाबा गुजर यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला आहे.

गुजर एकसंध राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष होते. पक्षात फूट पडल्यावर ते अजित पवार गटात गेले. तेथे त्यांना जिल्हाध्यक्ष करण्यात आले. १९ सप्टेंबर ला नागपूरमध्ये झालेल्या पक्षाच्या चिंतन शिबिरात त्यांचा सहभाग होता. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत पक्षाला चांगले यश मिळण्यासाठी जिल्हा अध्यक्षांनी प्रयत्न करावे, असे आवाहन शिबिरात करण्यात आले होते. पण जिल्हा परिषदेच्या निवडणुका जवळ आल्या असताना अचानक गुजर यांनी राजीनामा दिला. राजीनामा पत्रात त्यांनी व्यक्तीगत कारणामुळे राजीनामा दिला असे नमूद केले आहे व पक्षात काम करण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानले आहे.

एक महिन्यापूर्वी शहर अध्यक्ष प्रशांत पवार यांना पदावरून हटवण्यात आले होते. आता चिंतन शिबीर झाल्यावर जिल्हा अध्यक्षांनी राजीनामा दिला आहे.

# दुर्गोत्सवात तरूणाची हत्या

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २३ :
देशातील दुसऱ्या क्रमांकाचा दुर्गोत्सव साजरा होत असलेल्या यवतमाळ शहरात या उत्सवाच्या दुसऱ्याच दिवशी तरूणाच्या हत्येने खळबळ उडाली. जुन्या वादातून तरूणाच्या हत्येची ही घटना आज मंगळवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास स्थानिक जांब मार्गावर घडली.

गौरव विलास बावने (२७) रा. एसटी कॉलनी, जांबरोड, यवतमाळ असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी स्वप्नील दत्तात्रय सुलभेवार (३७) रा. मणीयार ले-आऊट, यवतमाळ या आरोपीस पोलिसांनी अटक केली.

या प्रकरणी विलास बावने रा. एसटी कॉलनी, जांबरोड, यवतमाळ यांनी अवधुतवाडी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनूसार, शहरातील जांब रोडवर बावने यांनी पान टपरी आहे. त्यांनी या टपरीच्या बाजूला अग्रवाल नामक व्यक्तीला दुसरी पान टपरी बनवून दिली होती. ती टपरी अग्रवाल याने स्वप्नील सुलभेवार याला चालवायला दिली होती. तीच टपरी स्वप्नील याने एका चहा टपरी वाल्याला भाड्याने दिली होती. त्याचे भाडे स्वप्नील घेत असल्याने गौरव आणि स्वप्नील यांच्यात वाद सुरू होता.

रविवारी रात्री आदीत्य चव्हाण हा पान टपरीच्या मागे सिगारेट पिण्यासाठी जात होता. यावेळी गौरव याने तू या ठिकाणी सिगारेट पीत जावू नको, असे बोलल्याने त्यांच्या थोडा वाद झाला होता. दरम्यान सोमवारी सकाळी ९ वाजताच्या सुमारास विलास बावने आणि त्यांचा मुलगा गौरव जांब मार्गावर उभे असताना त्यांनी आदित्यला गौरव आणि तू आपसात वाद करू नका असे सांगितले.

अश्यात स्वप्नील त्या ठिकाणी आला आणि बावने यांना शिवीगाळ करू लागला. तसेच गौरव याच्यावर चाकू हल्ला केला. दरम्यान विलास बावने यांनी धाव घेत गौरव याला रूग्णालयात दाखल केले.

डॉक्टरांनी तपासणीदरम्यान त्याला मृत घोषीत केले. या प्रकरणी अवधुतवाडी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी मारेकरी स्वप्नील सुलभेवार याच्याविरोधात विविध कलमान्वये गुन्हे नोंद केले. स्वप्नीलरने चाकूहल्ला केल्यानंतर गौरवनेही प्रत्युत्तरादाखल लोखंडी रॉडने स्वप्नीलवर वार केला. यात मारेकरी स्वप्नीलही जखमी झाला आहे.

खूनाच्या घटनेची माहिती मिळताच अवधुतवाडी ठाण्याचे निरीक्षक नरेश रणधीर यांच्यासह अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर काही तासातच मारेकरी स्वप्नील सुलभेवार याला अवधुतवाडी डिबी पथकाचे प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक श्रीकांत जिंदमवार यांच्यासह कर्मचाऱ्यांनी ताब्यात घेतले. पुढील तपास सुरू आहे.

# गोंदिया शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आग : रुग्ण आणि नातेवाईकांची पळापळ

■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. २३ :
गोंदियाः गोंदिया शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सकाळच्या सुमारास ओपीडी सुरू असताना शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची घटना मंगळवारी सकाळी ११:३० वाजताच्या सुमारास घडली.
आग लागल्याची माहिती कळताच उपचाराकरिता आलेल्या रुग्ण आणि रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या नातेवाईकाची पळापळ सुरु झाली. रुग्णालय परिसरातील प्रत्येक जण मिळेल त्या जागी पळण्याचा प्रयत्न करत असताना दिसून आले. दरम्यान एका रुग्णासोबत आलेल्या एकाने दिलेल्या माहितीनुसार मंगळवारी सकाळच्या सुमारास ओपीडी सुरू असताच जवळच शॉर्टसर्किट झाला. त्यामुळे काही वेळातच आग लागली आणि संपूर्ण परिसरात धुळीचे साम्राज्य निर्माण झाले होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नाही.

शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची माहिती होताच लोकांची धावपळ सुरू झाली. या आगीच्या घटनेमुळे शासकीय रुग्णालयातील सुरक्षेच्या प्रश्न पुन्हा येरणीवर आला आहे. दरम्यान संपूर्ण रुग्णांना रुग्णांच्या नातेवाईकांना रुग्णालयातून बाहेर काढण्यात आले. काही वेळासाठी संपूर्ण रुग्णालयात धूर झाला होता. मात्र वेळेवर अग्निशामक विभागातील कर्मचाऱ्यांनी शॉर्टसर्किट मुळे लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळविले.




## निसर्गाशी एकरूप झालेल्या वनस्पती शास्त्रज्ञ

**लोकमानस**

भौतिक सुखांच्या शोधात सातत्याने धडपड करणाऱ्या आपल्या याच चंगळवादी समाजात काही व्यक्ती या आपण या निसर्गाचा एक भाग आहोत म्हणूनच आपल्या गरजा या कमीत कमी आहेत आणि ऐहिक सुखांचा त्यामुळेच अट्टाहास कशाला? अशा वैचारिक वृत्तीने जगणारी आणि निसर्गाची लेकर म्हणून निसर्गाच्या सानिध्यात राहूनच जगणारी जी विचारवंत मंडळी आहेत.

अशापैकीच एक विचारवंत आणि ज्येष्ठ वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. हेमा साने यांचे नुकतेच पुण्यात निधन झाले. वनस्पती क्षेत्राच्या एनसायक्लोपिडिया अशी त्यांची ओळख होती. निसगार्शी एकरून होऊन राहण्याची जीवनशैली त्यांनी आयुष्यभर सांभाळली. मध्यवर्ती पुण्यात, बुधवार पेठेत राहूनही त्यांनी शेवटपर्यंत घरात विजेचे कनेक्शन घेतले नव्हते. विजेशिवायही आपण राहू शकतो, हे त्यांनी जगण्यातून लोकांना दाखवून दिले.



हेमा साने यांचा जन्म १३ मार्च १९४० रोजी झाला. त्यांनी वनस्पतीशास्त्र विषयात एम. एस्सी. पी.एचडी. संपादन केली. भारतीयविद्या शास्त्रातल्या एम.ए., एम. फिल. पर्यंत शिक्षण घेतले. पुण्यातील आबासाहेब गरवारे महाविद्यालयात साने या वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्रमुख म्हणून सेवानिवृत्त झाल्या होत्या.

सेवानिवृत्ती नंतर त्यांनी केवळ समाजातील गरजवंतांचा विचार करूनच निवृत्तीवेतन देखील नाकारले. पुण्यातील जोगेश्वरी मंदिरासमोरील शीतलादेवी पार भागातील जुनाट आणि पडक्या वाड्यात त्या रहात होत्या. वाड्यात माझ्याबरोबर चार मांजरे, एक मुंगुस, एका घुबडासह काही पक्षी राहतात आणि हेच माझं कुटुंब आहे, असं त्या सांगत.

त्यांच्या घरात विजेचा दिवा, दूरचित्रवाणी संच, रेफ्रिजिरेटर, वॉटर हीटर, मायक्रोवेव्ह, मिक्सर यांसारखी आधुनिक उपकरणे नव्हती. केवळ जगण्यासाठी लागणारी मोजकीच भांडीकुंडी, काही खायचे जिन्नस आणि अवती भवती त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांचा आणि शोध निबंधांचा पसारा हेच हेमा आजींचे जगणे होते. अगदी शेवटच्या श्वासापर्यंत त्या स्वतची सर्व काम स्वताच करायच्या हे विशेष.

नोकरीतील शेवटची दहा वर्षे त्यांनी लुना हे वाहन वापरली, तोपर्यंत आणि त्यानंतर त्या नोकरीव्यतिरिक्त इतरत्र पायीच जात. वाड्यातील विहिरीतील पाण्याचाच त्या वापर करत होत्या. त्यांनी दूरध्वनी वापरला नाही. दिवसा सूर्यप्रकाशात आणि रात्री कंदिलाच्या प्रकाशात त्यांनी वनस्पतिशास्त्र आणि पर्यावरण या विषयांवरच नव्हे, तर इतिहास, प्राच्यविद्या अशा विषयांवर मिळून तीसहून अधिक पुस्तके लिहिली. अलीकडील काही वर्षे त्या सौर ऊर्जेवर चालणारा दिवा वापरत होत्या.

हेमा साने यांनी आपले हिरवे मित्र, पुणे परिसरातील दुर्मीळ वृक्ष (सहलेखिका - डॉ. विनया घाटे), बुद्ध परंपरा आणि बोधिवृक्ष, वा. द. वर्तक यांनी संपादित केलेल्या 'शंभरेक संशोधन प्रबंधां'तील काही प्रबंध, सम्राट अशोकावरील 'देवानंपिय पियदसी राजो अशोक' हे पुस्तक लिहिली.

कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी बायोलॉजी (सहलेखिका - वीणा अरबाट), इंडस्ट्रीयल बॉटनी (सहलेखिका - डॉ. सविता रहांगदळे) प्लांट, या विषयांच्या पुस्तकांचे लेखन केले. पर्यावरण , निसर्ग संवर्धन क्षेत्रातील विविध नामवंत संस्थांकडून त्यांना पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते.

वनस्पती शास्त्राच्या अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी पीएचडीसाठी मार्गदर्शन केले.निसर्गाच्या सानिध्यात एकरूप होऊन केवळ समाजाच्या भल्यासाठी ऐहिक सुखांचा त्याग करणाऱ्या हेमा साने आजी सारख्या विचारवंत या खरोखरच आपल्या चंगळवादी वृत्तीने पछाडलेल्या आणि केवळ मी माझा अशा संकुचित वृत्तीने जगणाऱ्या लोकांसाठी एक मोठा आदर्शाच आहेत हे नक्की.

■ ■ ■

## उपमुख्यमंत्री शिंदेसह सरनाईक आज धाराशिवमध्ये

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :
मराठवाड्यात मुसळधार पावसामुळे पूरग्रस्त भागात जनजीवन विस्कळीत झाले आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि परिवहन मंत्री तसेच धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक बुधवारी थेट धाराशिव जिल्ह्याचा दौरा करणार आहेत.

दोघेही पूरग्रस्त भागाची सखोल पाहणी करून नागरिकांना सुरक्षिततेसाठी आवश्यक ती सूचना देतील आणि जिल्हा प्रशासनाला परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी मार्गदर्शन करतील. याच दरम्यान, शिवसेनेच्या वतीने १२,५०० कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे.

यात अन्नधान्य, पाणी आणि इतर मूलभूत गरजा यांचा समावेश असेल, जे थेट प्रभावित कुटुंबांपर्यंत पोहोचवले जातील. या दौऱ्याद्वारे स्पष्ट होते की, सरकार आणि पक्ष कार्यकर्ते जनतेच्या संकटात त्वरित मदत पोहोचवण्यास कटिबद्ध आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री प्रताप सरनाईक बुधवारी धाराशिव जिल्ह्यात पूरग्रस्त भागाची पाहणी करणार आहेत; शिवसेनेच्या वतीने १२,५०० कुटुंबांना जीवनावश्यक वस्तू वाटप केल्या जातील आणि प्रशासनाने त्वरित मदत कार्यवाही सुरू ठेवावी असे निर्देश देण्यात आले आहेत.

# फरार व्यक्तीचा कॉलेज परिसरात वावर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील एका प्राध्यापक महिलेचा मानसिक छळ केल्या प्रकरणातील आरोपी व भंतेचे स्वीय सहायक रवी मेंढे सध्या पोलिसांच्या लेखी फरार आहेत. मात्र, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या छायाचित्रांमधून हे मेंढे हे अजूनही डॉ. आंबेडकर कॉलेजच्या परिसरात मुक्तपणे वावरत आहेत.

या प्रकरणात पीडित प्राध्यापिकेने दिलेल्या तक्रारीनंतर नागपूर पोलिसांनी रवी मेंढेविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर पोलिसांनी त्यांना फरार घोषित केले. मात्र, अलीकडेच सोशल मीडियावर प्रसारित छायाचित्रांमध्ये ते कॉलेजच्या आवारात उपस्थित असल्याचे दिसून आले.

रवी मेंढेंवर लैंगिक छळाचे गंभीर आरोप असूनही, ते अद्यापही कोणत्याही अडथळ्याशिवाय महाविद्यालय परिसरात फिरत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये यामुळे भीतीचं वातावरण निर्माण झाले असून, प्रा. मेंढेंना तात्काळ अटक करून निलंबित करावे, अशी मागणी जोर धरत आहे.

महाविद्यालय प्रशासनाने या प्रकरणावर मौन बाळगले असले तरी विद्यार्थी संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी आवाज उठवण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, नागपूर पोलिसांनी छायाचित्रांची पडताळणी सुरू केली असून लवकरच कायदेशीर कारवाई करू, असं आश्वासन दिले आहे.

पीडित प्राध्यापिकेने दिलेल्या तक्रारीनुसार, रवी मेंढेने वारंवार धमकी देणे, अपमानास्पद वर्तन करणे आणि मानसिक त्रास देण्याचे प्रकार केले होते. पोलिसांनी रवी मेंढेच्या शोधासाठी विशेष पथक तयार केले असून त्याचे संभाव्य ठिकाणी शोध घेण्यात येत आहे.

## जयपूर लेगमध्ये विझंगचा वेग वाढवण्याचे यू मुम्बाचे उद्दिष्ट



यू मुंबा हा रॉनी स्क्रूवालाच्या युनिलाझर व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या मालकीचा एक आघाडीचा क्रीडा व्यवसाय गट आहे. यू मुम्बाने पीकेएलच्या १२ व्या आवृत्तीत विझँग लेगमध्ये टॉप-३ मध्ये स्थान मिळवून कमांडिंग केले. यात जोरदार विजय आणि टर्नअराउंडचा समावेश होता. कर्णधार सुनील कुमारने शिस्तबद्ध बचावफळीचे नेतृत्व केले, तर रेडर अजित चौहान, अनिल जस्ता आणि अमीरमोहम्मद जफरदानेश यांनी संयम आणि रणनीतीने गुण वाढवले. आता, जयपूर लेग जवळ येत असताना, ही वरची गती टिकवून ठेवण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

युवा आणि अनुभवाच्या मिश्रणावर बांधलेल्या, यू मुम्बाच्या बचावात्मक युनिटचे नेतृत्व सर्वकालीन पीकेएलचा सर्वात यशस्वी कर्णधार सुनील कुमार करत होता आणि एनवायपी रिटेन्शन लोकेश आणि प्रमुख दुखापती बदली खेळाडू विजय कुमार यांनी केले होते.

त्यांनी नियमितपणे वेळेवर सुपर टॅकल आणि ऑलआउट्ससह गती बदलली, विरोधी लय बिघडवली आणि जबरदस्त बचावात्मक रचना राखली.

अजित चौहानने बेंगळुरू बुल्सविरुद्ध सुपर १० मध्ये कामगिरी केली, तसेच उल्लेखनीय ६-पॉइंट सुपर रेड मिळवला, एक स्फोटक प्रयत्न जो 'रेकॉर्ड ब्रेकर' परदीप नरवालशी तुलना करतो. सुनील कुमारच्या क्लच टॅकल आणि बेंगळुरूविरुद्धच्या रिंकूच्या हाय फाइव्हमुळे पीकेएलच्या सर्वात जिद्दी बॅकलाइनपैकी एक म्हणून यू मुम्बाचे स्थान आणखी मजबूत झाले आणि जयपूरकडे जाणाऱ्या कारवांसोबत लीगच्या टॉप थ्रीमध्ये त्यांची भर पडली.

■ ■ ■

: माझं मत :

### जीएसटी फेररचनेनंतर भारतातील परदेशी गुंतवणूक वाढेल का?

**प्रशांत कपाडिया, शेअर मार्केट अभ्यासक**
अलीकडेच केंद्र सरकारने जीएसटी मध्ये कपात करून आता जीएसटी ची पुनर्रचना केली आहे. ५ आणि १२ टक्के अशा नवीन कर प्रणालीमुळे नक्कीच परदेशी गुंतवणूक वाढण्यास मदत होणार आहे. कारण यापूर्वी जेंव्हा १२ आणि २८ टक्के इतकी भरमसाठ जीएसटी रचना होती ती परदेशी गुंतवणूकदारांना न परवडणारी होती. त्यामुळेच नवीन चारचाकी वाहन असतील, मोबाईल, लॅपटॉप आणि तत्सम इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे भारतात नव्याने लाँच होत नव्हते कारण परदेशी गुंतवणूकदार यासाठी उत्सुक नव्हते मात्र आता हि गुंतवणूक आणि पर्यायाने परदेशी पैसा भारतात येऊ शकेल.

**विद्या जैस्वाल, व्यावसायिक**
हो. जीएसटी मध्ये आता मोठ्या प्रमाणात बदल केले असल्यामुळे आता परदेशी व्यावसायिकांना त्यांच्या उत्पादनामधील गुंतवणुकीवर कमी जीएसटी कर भरावा लागणार असल्यामुळे आता परदेशी कंपन्यांची भारतातील गुंतवणूक निश्चित वाढणार आहे. शिवाय परदेशी कंपन्यांच्या भारतातील गुंतवणुकीमुळे आता आपल्या इथे रोजगाराची संधी वाढण्यास मदतच होईल. ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# न्या. हक यांनी जाहीर माफी मागावी


**मुस्लीम नेते आग्रही**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
निवृत्त न्यायमूर्ती झेड. ए. हक यांनी वक्फ सुधारणा प्रस्तावांच्या समर्थन केल्याने आणि वक्फ बोर्डावर गैरमुस्लीम व्यक्ती नियुक्ती करण्यात गैर काय, अशी भूमिका जाहीरपणे मांडल्याने मुस्लीम समाजात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. विदर्भ मुस्लिम इंटेलेक्चुअल फोरमने न्या. हक यांच्याकडून सार्वजनिक माफीची मागणी केली आहे.

त्यांची वक्तव्ये केवळ अनावश्यकच नव्हती, तर ज्यांनी त्यांना सन्मानाने आमंत्रित केले त्या समाजाच्या प्रतिष्ठेविरुद्ध होती. जर त्यांनी माफी मागण्यास नकार दिला, तर भविष्यात कोणत्याही समाजसंस्थेने त्यांना कोणत्याही कार्यक्रमासाठी आमंत्रित करू नये, समाजातील काही नागरिकांनी म्हटले आहे.

हिस्ट्री ऑफ वक्फ इन इंडिया या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी विदर्भ मुस्लिम बौद्धिक मंचाने त्यांना आमंत्रित केले होते. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश स्पष्ट होता, लेखक सय्यद उबेदुर रहमान यांचा गौरव करणे, त्यांच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक करणे आणि वक्फ सुधारणा विधेयकांच्या विरोधात समाजात जनजागृती आणि एकजूट घडवून आणणे.

न्यायमूर्ती हक यांना हर आमंत्रण खूप आधीच दिले गेले, त्यामुळे त्यांना भाषणाची तयारी करण्यास पुरेसा वेळ होता. त्यामुळे त्यांचे भाषण तात्काळ प्रतिक्रिया मानता येणार नाही, तर ते पूर्वनियोजित आणि सजग विचारांवर आधारित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच त्यांनी उपस्थितांना विचारले, दिल से बोलूं या दिमाग से? यावरूनच त्यांच्या बोलण्यामागे निश्चित पूर्वतयारी होती, हे स्पष्ट होते. त्यानंतर त्यांचे संपूर्ण भाषण दुर्दैवाने अशा दिशेने गेले, जे केवळ निराशाजनकच नव्हते तर संपूर्ण मुस्लिम समाजाच्या भावना दुखावणारे होते.




आसिम नवेद, डॉ. मोहम्मद अवेस हसन आणि काही श्रोत्यांनी त्यांना सावध केले, त्यांचे मत दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला, तरीदेखील त्यांनी आपले वक्तव्य बदलले नाही. त्यामुळे हे केवळ चुकून बोलले असे म्हणता येणार नाही. ते मुद्दामून केलेले होते. अशा प्रकारच्या गैरजबाबदार भूमिकेमागे काही उद्दिष्ट नक्कीच असावे. कदाचित, त्यांनी स्वतःस सत्ताधाऱ्यांच्या जवळ नेण्यासाठी एखाद्या मोठ्या पदाची आकांक्षा धरली असावी.

अशा स्वयंघोषित बौद्धिकांनीच मुस्लिम समाज आज ज्या अडचणीत सापडला आहे, त्यात भर घातली आहे. उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती असूनही, त्यांनी सार्वजनिक व्यासपीठावर वक्फ धार्मिक नाही असे विधान केले.

यापुढे त्यांनी मुस्लिम समाजातील गरीब कुटुंबे, घटस्फोट आणि महिलांची आर्थिक स्थिती यावर एकांगी आणि नकारात्मक स्वरूपाचे सामान्यीकरण करत अत्यंत चुकीचे चित्र उभे केले. जर हे सर्व त्यांचे तथ्यान्वय असतील, तर त्यांनी त्याचे प्रामाणिक स्त्रोत सांगितले पाहिजेत. अन्यथा हे निष्काळजीपणाचे आणि समाजाच्या प्रतिष्ठेला धक्का देणारे वक्तव्य ठरते.

खरी बाब ही आहे की, न्यायमूर्ती झका-उल-हक हे जर मुस्लिम समाजाचे नसते, तर कदाचित त्यांना न्यायालयातील उच्च पदापर्यंत पोहोचता आले नसते. या समाजानेच त्यांच्यामागे उभे राहून त्यांना सन्मान मिळवून दिला. आता त्यांच्यावर संपूर्ण मुस्लिम समाजासमोर जबाबदारीने वागण्याचे कर्तव्य आहे, असे एका पोस्टमध्ये म्हटले आहे. या पोस्टला फोरमने उत्तर दिले आहे. कार्यक्रम बौद्धिक होता आणि त्यात वेगवेगळ्या विचाराची आदानप्रदान होत असते, असे फोरमने त्या पोस्टला दिले आहे.

महासागर
# नागपूर वृत्तसागर
■ बुधवार ■ दि. २४ सप्टेंबर २०२५ ■

## सोनसाखळी चोर पोलिसांच्या जाळ्यात

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :**
गुन्हे शाखेच्या सोनसाखळी चोरी विरोधी पथकाने सक्करदरा ठाण्यात नोंद सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावून आरोपीला अटक केली. चौकशीत त्याने साथीदारासोबत मिळून हा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीकडून सोनसाखळी चोरीचे आणखी दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिस त्याच्या साथीदाराचा शोध घेत आहेत. टिपू सुल्तान अश्फाक शेख (२४) रा. आदीवासी प्रकाशनगर, कळमना असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

फियार्दी भागवत पुंडलिक वघाळे (६९) रा. द्वारकानगर, नवीन सुभेदार लेआऊट शनिवारी सकाळी ७.१५ वाजताच्या सुमारास घरासमोरील जागेची साफसफाई करीत होते. या दरम्यान दुचाकीस्वार दोन आरोपी त्यांच्याजवळ येऊन थांबले. काही कळण्यापूर्वीच आरोपींनी त्यांच्या गळ्यातील दीड लाख रुपये किंमतीची १५ ग्रॅम वजनी सोन्याची चेन हिसकावली आणि पळून गेले. वघाळे यांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. सक्करदरा पोलिसांसह त्यांच्या तक्रारीवरून सक्करदरा पोलिसांनी अज्ञात आरोपींवर जबरी चोरीचा गुन्हा नोंदविला. या घटनेचा समांतर तपास गुन्हे शाखेचे सोनसाखळी चोरी विरोधी पथकही करीत होते. घटनास्थळाजवळील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता आरोपींच्या वाहनाचा नंबर मिळाला. या आधारावर पोलिस टिपू सुल्तानपर्यंत पोहोचले. ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने साथीदार स्वप्निल उर्फ काका मोटघरे (रा. ओमनगर, कळमना) याच्यासोबत मिळून गुन्हा केल्याची कबुली दिली.

# नागपूर विभागात नैसर्गिक आपत्तीचा तडाखा

### ८५०० पेक्षा जास्त घरांचे नुकसान, ६९ जणांचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २३ :**
यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे अनेक जण रस्त्यावर आले. नदी नाल्यांना आलेल्या पुराचे पाणी थेट त्यांच्या घरात घुसले. नागपूर विभागातील सहा जिल्ह्यात ८ हजार ३७४ घरांचे अंशता तर १३२ घरांचे पूर्णता नुकसान झाले. इतर नुकसानही मोठ्या प्रमाणात आहे.

आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांमध्ये यंदाचा पाऊस जनतेसाठी संकट घेऊन आला. अतिवृष्टी आणि नदी-नाल्यांना आलेल्या पुरामुळे शेकडो गावे जलमय झाली. आपत्तीमुळे नागरिकांचे मानसिक आणि आर्थिक दोन्ही नुकसान झाले आहे. घरांसह जनावरांचे गोठे, शेतीमाल आणि घरगुती वस्तू पुराच्या पाण्यात वाहून गेल्या.

नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या एकूण नुकसानीचे चित्र भयावह आहे. ६९ नागरिकांचा मृत्यू, तर ३२ जण जखमी झाल्याची नोंद प्रशासनाकडे आहे. एवढेच नाही तर शेतकऱ्यांसाठी आधारस्तंभ असणाऱ्या जनावरांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, १२७ जनावरे दगावली आहेत. याशिवाय ८७८ गोठ्यांचे नुकसान झाले आहे.

पंचनाम्याची प्रक्रिया सुरू असून मदतीसाठी अहवाल राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल, असे काटोलचे तहसीलदार राजू रणवीर यांनी सांगितले. शेतीवरही या आपत्तीचा मोठा परिणाम झाला आहे. अतिवृष्टीमुळे शेतीतील पिके पाण्याखाली गेली असून, ६९ हजार ६२७ शेतकरी बाधित झाल्याचे अहवालात नमूद आहे.

या शेतकऱ्यांना केवळ आर्थिक तोटा नाही, तर त्यांच्या संपूर्ण कुटुंबाच्या उपजीविकेवर संकट ओढवले आहे. विभागात ४३ हजारांपेक्षा अधिक तर नागपूर जिल्ह्यातील ६ हजार १२८ हेक्टरवरील पिकांचे मोठे नुकसान झाले. शासकीय निकषानुसार मदत दिली



# सार्वजनिक वाहनांमधील पॅनिक बटन बंद

### महिला आयोगाकडून परिवहन विभागाला अहवाल सादर करण्याचे आदेश

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २३ :**
महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटना लक्षात घेता, प्रवाशांची सुरक्षितता जपण्याच्या दृष्टिकोनातून रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने सर्व टॅक्सी, ऑटो, बस आणि सार्वजनिक वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांमध्ये पॅनिक बटन अनिवार्य केले होते. मात्र हे पॅनिक बटन काम करीत नसल्याच्या तक्रारी होत्या. त्याची दखल घेत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी परिवहन विभागाच्या अपर मुख्य सचिवांना पत्र लिहून दोन दिवसांत कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. निर्भया घटनेनंतर 1 ऑगस्ट 2022 पर्यंत पॅनिक बटन लावणे अनिवार्य केले होते.

आयोगाची अध्यक्ष म्हणून राज्यभर दौरे करीत असताना अनेकांच्या अनेक तक्रारी समोर येतात. महिला प्रवाशांची सुरक्षा लक्षात घेवून सर्व टॅक्सी, ऑटो, बस आणि सार्वजनिक वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांमध्ये पॅनिक बटन अनिवार्य केले. परंतु अनेक वाहनांमध्ये ते काम करीत नसल्याच्या, त्याचा संदेश नियंत्रण कक्षात जात नसल्याच्या तक्रारी समोर आल्या आहे. अनेक टॅक्सी वा कॅबमध्ये हे बटनच दिसून येत नाही. याची सखोल चौकशी करून दोन दिवसांत अहवाल सादर करावा असे निर्देश चाकणकर यांनी दिले आहे.

एखादा प्रवासी किंवा चालक धोक्यात असतो, तेव्हा तो पॅनिक बटण दाबतो. हे बटण सहसा लाल रंगाचे असते आणि ते वाहनात सहज दिसेल अशा ठिकाणी बसवलेले असते. ते वाहनाच्या जीपीएस ट्रॅकिंग सिस्टीमशी जोडलेले असते.



बटण दाबल्यावर आपत्कालीन नियंत्रण कक्षाला किंवा वाहतूक विभागाला आपोआप एक संदेश पाठवला जातो, त्यामध्ये वाहनाचे लोकेशन (स्थान) आणि इतर महत्त्वाची माहिती असते. आपत्कालीन नियंत्रण कक्ष किंवा संबंधित विभाग या माहितीची पडताळणी करतो. त्यांना संदेशाद्वारे कळते की वाहनामध्ये काहीतरी समस्या आहे. माहिती मिळाल्यानंतर, अधिकारी मदतीसाठी पाठवले जातात. ते वाहन थांबवून चौकशी करतात.

# टेललॅम्प नसलेल्या वाहनांवर कठोर कारवाई करा

### जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांचे निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २३ :**
दिवाळी व इतर सणासुदीच्या दिवसात ऊस कारखान्याचा हंगाम हा अनेक भागात सुरु होतो. विदर्भात सहकारी साखर कारखान्यांचे व्यापक जाळे जरी नसले तरी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनाच्या पाठीमागे टेललॅम्प अथवा रिफ्लेक्टर सुस्थितीत दृष्यस्वरुपात जोपर्यंत वाहनांवर राहत नाहीत तोपर्यंत अपघाताचा धोका हा कमी होत नाही. अशा बेफिकीर वाहनांमुळे यापुढे रस्ते अपघातात कोणी बळी पडू नये अथवा गंभीर जखमी होऊ नये याची दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी दिले. याचबरोबर जे वाहनचालक याबाबत हलगर्जीपणा करतील अशा वाहन चालकाविरुध्द व वाहनांविरुध्द कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.




उच्च न्यायालयामध्ये ऊसतोड कामगारांच्या समस्या व प्रभावी नियोजनाबाबत दाखल करण्यात आलेल्या याचिकेच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या छत्रपती सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ऊसतोड कामगारांच्या विविध समस्यांचे निराकरण हे ते ज्या ठिकाणी कामासाठी जातात त्या ठिकाणी होणे आवश्यक आहे. त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने व इतर सेवासुविधांबाबत ऊर्जा व कामगार, महिला व बालविकास, शालेय शिक्षण या विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांनी कोणतीही कसर ठेवू नये, असे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी स्पष्ट केले.

सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध योजनांचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक किन्नरांना व्हावा यासाठी संबंधित यंत्रणेने दक्ष होऊन काम केले पाहिजे. महसूल विभागांतर्गत असलेले विविध प्रमाणपत्र प्रत्येक किन्नरांना मिळाले पाहिजेत.

यादृष्टीने लवकरच जिल्हाधिकारी कार्यालय परिसर अथवा समाजिक न्याय भवन परिसरात विशेष शिबीर घेतले जाईल, असे जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी तृतीयपंथीयांच्या आढावा बैठकीत सांगितले. याचबरोबर जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची सभा जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

## भूमी अभिलेख विभागातर्फे ३० सप्टेंबर रोजी लोक अदालतीचे आयोजन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :**
महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रलंबित अपील व फेरफार प्रकरणे, पांदण रस्ते मोजणी व पट्टे वाटपाबाबत लोक अदालत आयोजित करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने नागपूर जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयामार्फत मंगळवार दि. 30 सप्टेंबर रोजी महसुली अपील प्रकरणासंबंधाने लोक अदालत जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख नागपूर यांचे कार्यालय, तळमजला, खनिकर्म भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, सिव्हील लाईन नागपूर येथे आयोजित केलेली आहे. या लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढण्याचे नियोजन केले आहे. तरी संबंधित सर्व नागरिकांनी या लोक अदालतीमध्ये सहभाग नोंदविण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख अभय जोशी यांनी केले आहे.

## ग्वालबंशीच्या साथीदारांवरही गुन्हा दाखल

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :**
आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखा (ईओडब्ल्यू)ने भूमाफिया दिलीप ग्वालबंशी याच्यासोबतच त्याच्या टोळीतील इतर लोकांवरही फास आवळण्यास सुरूवात केली आहे. ग्वालबंशी याच्याशी संगणमत करून नेताजी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी एका कुटुंबाचा भूखंड हडपला. एक एकर जमिनीच्या नावावर संपूर्ण ७.७२ एकर जमिनीवर लेआऊट टाकून १५९ जणांना प्लॉट विकले. या प्रकरणात आता पोलिसांनी नेताजी सोसायटीचे अध्यक्ष दीपक विठ्ठलप्रसाद दुबे रा. आवळे बाबू चौक आणि त्याची कथित पुतणी रश्मी अनुराग जोशीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. हे दोघेही ग्वालबंशीच्या भूमाफिया टोळीत सामील होते. ग्वालबंशीसोबतच दुबे यानेही नेताजी हाऊसिंग सोसायटीची स्थापना केली. एकच जमीन दोन्ही सोसायट्या लोकांना विकत होत्या.



## कळमेश्वर येथे आ.डॉ.आशिष देशमुख यांच्या हस्ते
# फुटसल ग्राउंडचा लोकार्पण सोहळा

■ **महासागर प्रतिनिधी**
**कळमेश्वर, दि. २३ :**
येथे सार्वजनीक बांधकाम अंतर्गत १९ सप्टेंबर रोजी नगरपरिषद शाळा क्रमांक ३ येथे ५८.३१लक्ष रुपयाचे किमतीच्या फुट्सल ग्राउंडचा लोकार्पण सोहळा आमदार डॉ.आशिषराव देशमुख यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी मोठया प्रमाणात नागरिक, युवक, विद्यार्थी उपस्थित होते. या ग्राउंडचा फायदा शहरातील नागरिकांना, विद्याथ्यार्ना, स्पर्धा परीक्षाची तयारी करणाऱ्याना या ग्राउंडची खूप मदत होणार आहे.

महत्वाचे म्हणजेच शहरामध्ये या प्रकारचे अत्याधुनिक सुविधा असलेले पहिलेच ग्राउंड ठरले आहे.



या प्रसंगी आ. डॉ.आशिष देशमुख यांनी शुभेच्छा देत या फुट्सल ग्राउंडचा फायदा शारीरिक आरोग्य, मानसिक आरोग्य आणि सामाजिक आरोग्य सुधारण्यासाठी जास्तीत जास्त संख्येनी घ्यावा असे संबोधन केले. आपण सावनेर कळमेश्वर विधानसभेला विकासाच्या दृष्टीने क्षेत्रात पुढे नेण्याचे प्रामाणिक प्रयत्न करू असे म्हटले. या प्रसंगी प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ.राजीव पोतदार, ग्रामीण जिल्हा भाजपा अध्यक्ष मनोहर कुंभारे, धनराज देवके, अजय खंडेलवाल, योगेंद्र खोब्रागडे, प्रमोद हत्ती, प्रतीक कोल्हे, मनीषा लंगडे, रुपाली चुनारकर, जयश्री पवार, अरुणा मंडलिक उपस्थित होते.

# वीज बिलांना सांगा 'गुडबाय'!

## 'सूर्यघर' योजनेतून विदर्भ बनतोय आत्मनिर्भर

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :**
विजेच्या वाढत्या दरांनी त्रस्त झालेल्या विदर्भातील नागरिकांसाठी 'पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज' योजना एक क्रांती ठरली आहे. ही योजना केवळ वीज बिलातून मुक्तता देत नाही, तर प्रत्येक घराला स्वतःच्या पायावर उभे राहण्याची आणि ऊर्जेच्या बाबतीत आत्मनिर्भर होण्याची संधी देत आहे. आतापर्यंत विदर्भातील १,१४,९७८ कुटुंबांनी या योजनेत सहभाग घेऊन त्यांच्या घराच्या छतावर सौर पॅनेल बसवले आहेत, ज्यामुळे तब्बल ४४२.७ मेगावॅटची वीज निर्मिती क्षमता निर्माण झाली आहे. ही आकडेवारी एक गोष्ट स्पष्ट करते, की विदर्भाने ऊर्जा क्रांतीचा स्वीकार केला आहे आणि तो वेगाने प्रगती करत आहे.

तुम्हाला कदाचित वाटेल की सौर पॅनेल बसवण्याचा खर्च मोठा आहे. पण केंद्र सरकारने दिलेल्या भरीव अनुदानामुळे हा खर्च खूप कमी झाला आहे. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी ३० हजार, दोन किलोवॅटसाठी ६० हजार आणि तीन किलोवॅटसाठी ७८ हजार रुपयांपर्यंतचे अनुदान थेट तुमच्या बँक खात्यात जमा होते. त्यामुळे, सुरुवातीचा खर्च सहज सोयीचा होतो. या योजनेचा उद्देश स्पष्ट आहेः प्रत्येक कुटुंबाला दरमहा ३०० युनिटपर्यंत वीज मोफत मिळावी.

विदर्भात या योजनेला मिळणारा प्रतिसाद पाहून उत्साह वाढतो. संपूर्ण महाराष्ट्रात आतापर्यंत या योजनेत सहभागी झालेल्या २,८९,१७२ ग्राहकांपैकी एकट्या विदर्भातील १,१४,९७८ ग्राहकांनी या योजनेचा स्वीकार केला आहे. यात नागपूर जिल्हा आघाडीवर असून, ४४,२६८ घरांवर सौर पॅनेल बसवण्यात आले आहेत. त्यापाठोपाठ अमरावती (१७,०६७), बुलढाणा (८,८४९), वर्धा (८,६२१), अकोला (८,३३९), चंद्रपूर (७,४३६), यवतमाळ (७,०१२), भंडारा (४,८४४), वाशिम (३,५८४), गोंदिया (३,४०४) आणि गडचिरोली (१,५५४) जिल्ह्यांनीही या योजनेला उत्तम प्रतिसाद दिला आहे.





# २८ सप्टेंबरला स्वतंत्र विदर्भ राज्यासाठी नागपूर कराराची होळी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :**
**विदर्भाला स्वतंत्र राज्य करण्याबाबत दोन मत प्रवाह दिसतात. एका गटाचा स्वतंत्र विदर्भाला विरोध असून दुसऱ्या गटाकडून स्वतंत्र विदर्भाची मागणी जोरात लावून धरत आंदोलनही केली जात आहे. दरम्यान विदर्भ राज्य आंदोलन समितीने २८ सप्टेंबर १९५३ रोजी झालेल्या नागपूर कराराची होळी येत्या २८ सप्टेंबरला करण्याची घोषणा करत स्वतंत्र विदर्भ राज्यासाठी आंदोलन कसे असणार? याबाबत स्पष्टता केली आहे.**




विदर्भ राज्य आंदोलन समिती नागपूर शहराची बैठक २२ सप्टेंबरला चिटणीसपुरा येथे झाली. त्यात सर्वांनुमते २८ सप्टेंबरला नागपूर कराराची होळी व्हेरायटी चौक येथे दुपारी १ वाजता करण्याचे ठरले. सोबत मिशन- २०२७ अंतर्गत स्वतंत्र विदर्भ राज्य मिळविण्याकरिता व शहरी लोकसहभाग वाढविण्याच्या हेतूने शहरातील १५२ वार्डात कार्यकारिणी गठीत करण्याचे ठरले. २८ सप्टेंबर १९५३ रोजी झालेल्या नागपूर करारातील ११ मुद्यांपैकी एकही कलमाची पूर्तता झाली नाही. उलट विदर्भाचा अनुशेष वाढत गेला. त्यामुळे येथील विकास खुंटला.

महाराष्ट्राकडे विदर्भाला देण्याकरिता होते, त्यावेळेस ते विदर्भाच्या वाटेला मिळाले नाही, पण आज वर्तमानात महाराष्ट्र सरकार पूर्णपणे दिवाळखोर झालेले आहे. त्यामुळे स्वतंत्र विदर्भ राज्याशिवाय पर्याय नसल्याचे बैठकीत स्पष्ट केले गेले. सोबत येत्या काळात स्वतंत्र विदर्भ राज्य न मिळाल्यास आंदोलन तिव्र करण्याचा इशाराही बैठकीत सरकारला दिला गेला. बैठकीत नरेश निमजे, मुकेश मासुरकर, राहूल बनसोड, डॉ. झेलम कटोच, गणेश शर्मा, वीणा भोयर आणि इतरही पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्रावर ९,०२७,००० कोटी रुपयांचा कर्जाचा डोंगर आहे. सरकारचे उत्पन्न ५,६०,९६३ कोटी रुपये आहे. वर्षाचा खर्च भागवायला ६,०६,८५५ कोटी रुपये लागतात. त्यात बजेटमधली तूट ४५,८९२ कोटी रुपये आहे, व घेतलेल्या कर्जापायी ५६,७२७ कोटी रुपये व्याज द्यावे लागते.

त्यामुळे महाराष्ट्र दिवाळखोरीच्या मार्गावर आहे. मग अशा परिस्थितीत महाराष्ट्रात राहून विदर्भाच्या जनतेचा विकास होणे अशक्य असल्याचा समितीचा दावा आहे.

स्वतंत्र विदर्भ राज्यात युवकांना भरभरून नोकऱ्या मिळेल. ११ जिल्ह्यांचे २० पेक्षा अधिक जिल्हे होतील. १२० तालुक्यांचे ३०० पेक्षा अधिक तालुके होणार, व त्याला लागणारी सरकारी यंत्रणा ही विदर्भातूनच भरल्या जाणार, म्हणजे विदर्भातील तरुणांना जवळजवळ ३ लाखाहून अधिक सरकारी नोकऱ्या मिळणार.

विदर्भात २६ पैकी २३ खनिज पदार्थ आहेत, परंतु, कोळसा व लाईमस्टोन सोडता कोणत्याच खनिजावर आधारित उद्योग आले नाहीत. मात्र राज्य वेगळे होताच इतर सर्व खनिज पदार्थांवर प्रकिया केल्यानंतर विदर्भात मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे निर्माण होणार व त्यातून ७ ते ८ लाख खाजगी नोकऱ्या तरुणांना उपलब्ध होणार असल्याचा समितीचा दावा आहे.

**नागपूर :** देशभरात नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला असून, ठिकठिकाणी सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळाच्यावतिने दुर्गा मातेच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. अनेक मंडळांनी नयनरम्य देखावे सादर केले असून, भाविकांची मोठी गर्दी उसळत आहे.

## विविध मागण्यासाठी गोंडवाना गणतंत्र पार्टीचे एक दिवसीय धरणे आंदोलन

# जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २३ :

दिनांक २३ सप्टेंबर २०२५ सकाळी ११ वाजता संविधान चौक, नागपूर येथे गोंडवाना गणतंत्र पार्टीचें प्रदेश अध्यक्ष हरीष उईके यांच्या नेतृत्वात एक दिवशीय धरणे आंदोलन करण्यात आले.तसेच जिल्हाधिकारी डॉ.विपिन इटनकर यांना खालील प्रकारच्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

प्रमुख मागण्या अनुसुचित जमातीचे आरक्षण बंजारा व धनगर समाजाला देण्यात येवू नये. आदिवासी तसेच डोंगराळ भागामध्ये पयार्यी शिक्षक रुजू होईपर्यंत या भागातून बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करु नये. आयुक्त कार्यालय नाशिक मार्फत टी.आर.टी.आय. च्या वतीने आदीवासी मुलांसाठी वर्धा परिक्षा संस्थेमार्फत ट्रेनिंग दिली जाते.



तेथील भोंगळ कारभार थांबविण्यात येवून गोंडवानातील राजचिन्ह सुरक्षित ठेवण्यात यावे. आदिवासी विकास योजने अंतर्गत चालणाऱ्या नामांकित शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांना कोणतेही निकष न लावता त्वरीत प्रवेश देण्यात यावा.

सुराबर्डी येथील आदिवासी संग्रहालयाचे भुमीपुजन करुन त्वरीत बांधकामास सुरुवात करावी. नोकरीतील आदिवासीचा अनुशेष भरण्यात यावा.

आदिवाती विभागामार्फत विद्यार्थ्यांकरीता राबविणारी डीबीटी योजना रद्द करण्यात याची वन व महसुल जमीनीवरील अतिक्रमित करांना कायम करुन जमिनी पट्टे वाटप करण्यात वावे. आदिवासींना धर्मकोड लागू करावा.

आदिवासींना वनवासी संबोधनाऱ्यावर ॲट्रासिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हे दाखल करावे. आदिवासी क्रांतीकारक यांची शालेय अभ्यासक्रमात नोंद घेण्यात यावी. आदिवासी समाजाचे क्रांतीकारक विर बाबुराव शेडमाके व बिरसा मुंडा यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा. आदिवासींच्या आरक्षनात न बसणाऱ्या इतर कोणत्याही जातीचा अनुसुचीत जमातीमध्ये समाविष्ट करण्यात येवु नये. आठव्या अनुसुचित गोंडी भाषेला समाविष्ट करण्यात यावे. भाषिक व क्षेत्रीय आधारावर गोंडवाना राज्याची निर्मिती करण्यात यावी.अश्या प्रकारच्या विविध मागण्यासाठी निवेदन देण्यात आले.

यावेळी गोंडवाना गणतंत्र पार्टीचें प्रदेश अध्यक्ष हरीष उईके,प्रदेश कार्याध्यक्ष राजेश इरपाते, प्रदेश महासचिव सुधाकर आत्राम,नागपूर जिल्हाध्यक्ष सुधाकर परतेकी सह पदाधिकारी आणि कार्यकर्ते सह आदी उपस्थीत होते.

## पंचमुखी हनुमान मंदिरात सुंदरकांडचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :

लाव्हा येथील पंचमुखी हनुमान मंदिर सेवा समिती ट्रस्ट तथा नवयुवक रामचरित सुंदरकांड मंडळ यांच्या तर्फे पंचमुखी हनुमान मंदिरात सुंदरकांडचे आयोजन शनिवार २१ सप्टेंबर रोजी पार पडले.

यावेळी राजमणी पांडेय यांनी सुंदरकांडाचे महत्त्व उलगडून सांगितले. त्यांनी म्हटले की, "सुंदरकांड हा श्रीहनुमंताच्या जीवनकार्याचा आरसा आहे. या पठणामुळे मनुष्य जीवनसागर पार करतो आणि त्याला कधीही अडचणींना सामोरे जावे लागत नाही. सुंदरकांड ऐकल्याने आध्यात्मिक तसेच भौतिक ज्ञान वाढते."

यानंतर मंडळाच्या कलाकारांनी "नमो नमो गणराज", "सियाराम सियाराम जय सियाराम", "राम आयेंगे आयेंगे", "तेरी मंद मंद मुस्कानिया पे बिहार राघवजी" अशा विविध भजनी तर्जवर सुंदरकांडाचे गायन केले. भाविक भक्तीमय वातावरणात तल्लीन झाले. पठणाच्या शेवटी महाआरती घेण्यात आली व प्रसादाचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाला राजेश जयस्वाल, श्यामकुमार जयस्वाल, गणपत रागीट, जयदेव शरण, तारकेश्वर सिंग, सुनील पांडेय, विरेंद्र मिश्रा, अविनाश तिवारी, योगेंद्र यादव आदी पदाधिकारी तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुंदरकांड मंडळाचे कलाकार रतेन्दर शर्मा, चंद्रशेखर ढाखरिया, मोहन पाठक, बिरबल शर्मा, बलराम चौधरी, सुनील तिवारी, लोकपाल चापले, रामनाथ रॉय, सुरेश सिरस्वार, प्रमोद तिवारी आदींनी सुंदरकांडाचे गायन केले.

## डॉ.आंबेडकर नगरातील कुत्र्यांचा बंदोबस्त करा

# राकाँपाचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :

येथील डॉ. आंबेडकर नगरातील सुभेदार रामजी चौक परिसरात पाळीव कुत्र्यांनी हैदोस घातल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. रस्त्यावरून जाणाऱ्या टू-व्हीलर वाहनधारकांवर झडप घालून कुत्रे चावा घेत असून, विशेषतः लहान मुले आणि वृद्धांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. त्यामुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या गंभीर समस्येवर तोडगा काढण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष संतोष नरवाडे यांच्या नेतृत्वात मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांना निवेदन दिले. शिष्टमंडळाने तातडीने कुत्र्यांच्या त्रासाचे निराकरण करण्यासाठी



निवेदन सादर केले.

यावेळी माजी सरपंच दत्ताजी वानखेडे, धम्मदीप बारसागडे, आशिष गौरखेडे, कमलेश विजयकर, सनी वाघमारे, प्रदीप नाईक, संजय बनसोड, साजन पाटील, संदीप बारसागडे, धीरज माहुलकर, अंकित खोब्रागडे,निलेश गायकवाड उपस्थित होते.

यावेळी आंबेडकर नगरातील सुभेदार रामजी चौकातील बुद्ध विहार परिसराची साफसफाई व सौंदर्यीकरण, तसेच गटारांच्या चेंबरची व पडलेल्या खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणीही करण्यात आली. मुख्याधिकारी ऋचा धाबर्डे यांनी लवकरच या समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले.

## द्रुगधामन्यात अभियंता दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :

विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा व कल्पकता वाढविण्यासाठी विज्ञानात नवनवीन सिद्धांतांचा शोध लावला जातो आणि त्यावर अभियंते मानवी जीवन सुलभ करणाऱ्या वास्तू व वस्तूंची निर्मिती करतात. लाकडी ओंडक्यांपासून सुरुवात करून आज मानवाने मंगळावर पाऊल ठेवले, हीच अभियांत्रिकी प्रगतीची गाथा आहे. असे प्रतिपादन डॉ. दिनेश भोंडे यांनी केले.

द्रुगधामना येथील साई ताज पॉलिटेक्निक मध्ये अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलसचिव अभियंता डॉ. दिनेश भोंडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे संचालक उदय टेकाडे, प्राचार्य कृष्णा विश्वकर्मा, डॉ. रश्मी माहुलीकर उपस्थित होते. प्रास्ताविक संचालक उदय टेकाडे यांनी केले.

## लीला पूनावाला फाउंडेशनच्या संस्थापकांची अपना घर येथे ८३ वी जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

इंटास फाउंडेशनच्या अपना घरने लीला पूनावाला फाउंडेशनच्या संस्थापक श्रीमती लीला पूनावाला यांची ८३ वी जयंती आनंदाने आणि करुणेने साजरी केली. हा कार्यक्रम कर्करोगाच्या रुग्णांना आणि त्यांच्या काळजीवाहकांना समर्पित होता, ज्यामध्ये भेटवस्तूंचे वितरण आणि आनंद आणि प्रोत्साहन पसरवण्यासाठी प्रेरक संवाद होता.

इंटास फाउंडेशनच्या समुपदेशक प्रविणा गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. स्नेहल कुबडे (प्रभारी - वर्धा आणि नागपूर, लीला पूनावाला फाउंडेशन), संजीवनी पवार (वरिष्ठ कार्यकारी), योगिता मानकर (समिती सदस्य) आणि स्मिता बधिए (समिती सदस्य)




यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

अंजुमन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या प्राध्यापकांमध्ये डॉ. राहिल खान, डॉ. के. एस. नसिरुद्दीन आणि बुशरा समीन (स्वयंसेवकांच्या प्रमुख) यांचा समावेश होता. या कार्यक्रमात उत्साह वाढवत, लीला पूनावाला फाउंडेशनच्या शिष्यवृत्तीधारक दहा लीला गर्ल्सनी स्वयंसेवा केली.

रुग्ण आणि काळजीवाहकांसाठी हा कार्यक्रम अत्यंत फायदेशीर ठरला. यामुळे भावनिक आधार मिळाला, ताण कमी झाला आणि सकारात्मकता आणि आशेचे वातावरण निर्माण झाले. भेटवस्तू वितरण आणि पाहुण्यांशी संवाद साधल्याने रुग्णांना काळजी आणि ओळखीची भावना मिळाली, तर काळजीवाहकांना कौतुकास्पद आणि प्रेरणा मिळाली.

कर्करोगाच्या रुग्णांसाठी मोफत निवास व्यवस्था, समुपदेशन समर्थन आणि नियमित उपक्रम प्रदान करणारे अपना घर चालवण्यासाठी इंटास फाउंडेशनच्या समर्पित प्रयत्नांचे खूप कौतुक झाले. आरोग्य जागरूकता सत्रे, पोषण समुपदेशन आणि भावनिक काळजी याद्वारे, इंटास फाउंडेशन रुग्णांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आराम, प्रतिष्ठा आणि आशा देत आहे.

## स्वच्छता ही सेवा अभियानाचा शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. २३ :

विश्वगुरु देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिवसापासून राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती पर्यंत सेवा पंधरवडा चे आयोजन महाराष्ट्र शासन कडून करण्यात आलेले आहे व तसेच भाजपा महाराष्ट्र प्रदेश यांच्या कडून सुध्दा पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या स्वच्छ भारत अभियानापासून प्रेरणा घेऊन हा उपक्रम सुरू करण्यात आला.

सेवा पंधरवडा अंतर्गत स्वच्छता ही सेवा अभियान - 2025 नगर परिषद सावनेर द्वारा व सावनेर शहरातील विविध सामाजिक संघटनेकडून, शाळा, कॉलेज, कडून सावनेर शहरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी स्वच्छता श्रमदान, प्लास्टिक संकलन, स्वच्छता शपथ, वृक्षारोपण, स्वच्छता जनजागृती पथनाट्य,अशे सर्व उपक्रम राबविण्यात आले व तसेच " स्वच्छता ही सेवा " या अभियानाचा शुभारंभ



सावनेर मतदारसंघाचे आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी माजी भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजीव पोतदार भाजप जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे, भाजप नेते रामराव मोवाडे, उपविभागीय अधिकारी, संपत खलाटे, तहसीलदार अक्षय पोयाम, मुख्याधिकारी आशीर्या जुही प्रामुख्याने उपस्थित होते व इतर सर्व विभागाचे कर्मचारी, भाजपा सावनेर मंडळ कार्यक्रमाचा यशस्वीतेसाठी अध्यक्ष,मंदार मंगळे, माजी नगरसेवक रवींद्र ठाकूर, भिमराव घुगल, कुलभूषन नवधिंगे, तुषार उमाठे, दिवाकर नारेकर, अरविंद ताजने, विलास ठाकरे, पियुष बुरडे तेजस्विनी लाड, रितेश सूर्यवंशी,सचिन ऊईके,विनोद बागडे,राजू भुजाडे, शालिक मोहतुरे,रतन खंगारे,नरेंद्र ठाकूर,, बापू सुरे,डॉ राहुल दाते,,पिंटू सातपुते, राधेश्याम उलमाले, मोहन कछवाह, प्रकाश दुबे, पिंकी लोखंडे,वैशाली कोहळे,अर्चना उपगडे,सर्व पक्षीय पदाधिकारी, सर्व शाळा कॉलेजचे प्राचार्य शिक्षकवृंद यांनी सहकार्य केले.

## नागपूरची जलतरणपटू दिव्या पिल्लईनी जिंकले एक सुवर्ण आणि दोन रौप्य पदके

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

नागपूरची प्रतिभावान समुद्र आणि पूल जलतरणपटू दिव्या पिल्लई हिने १३ आणि १४ सप्टेंबर २०२५ रोजी संभाजी नगर (औरंगाबाद) येथे झालेल्या २६ व्या राज्यस्तरीय मास्टर्स ॲक्वाटिक चॅम्पियनशिप २०२५ मध्ये तिच्या उत्कृष्ट ॲथलेटिक प्रतिभेचे प्रदर्शन करत एक सुवर्ण आणि दोन रौप्य पदके जिंकली.

या स्पर्धेत, दिव्याने ४०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये सुवर्णपदक, २०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये रौप्य पदक आणि १०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये रौप्य पदक जिंकून नागपूरला अभिमान वाटला. दिव्या पिल्लईला लहानपणापासूनच पोहण्यात रस आहे आणि वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्यूसीएल) मधून निवृत्त झाल्यानंतर तिने अलीकडेच व्यावसायिकरित्या हा खेळ स्वीकारला आहे. तिने आजपर्यंत अनेक कामगिरी केल्या आहेत



आणि पोहणे करिअर म्हणून पुढे नेऊ इच्छिणाऱ्या सर्वांसाठी ती प्रेरणा आहे. २०२४ मध्ये, दिव्याने नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत एक सुवर्ण आणि दोन रौप्य पदके जिंकली.

२०२३ मध्ये, तिने कोल्हापूर येथे झालेल्या स्पर्धांमध्ये तीन सुवर्ण आणि एक रौप्य पदक जिंकले आणि त्याच वर्षी, तिने इंदूर येथे झालेल्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत एक रौप्य आणि दोन कांस्य पदके जिंकली.

## २८ सप्टेंबर रोजी डिझाइन प्रदर्शन करिअर मार्गदर्शन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

तरुण पिढीसाठी सर्जनशील करिअर आता पूर्वीपेक्षा अधिक आशादायक आहेत. या दृष्टिकोनाला प्रोत्साहन देण्यासाठी, भंवर राठोड डिझाइन स्टुडिओ नागपुरात एक विशेष डिझाइन प्रदर्शन आयोजित करत आहे. हा कार्यक्रम २८ सप्टेंबर २०२५ रोजी इम्प्रेस मॉलमधील नक्षत्र बँक्वेट हॉलमध्ये होणार आहे. या प्रदर्शनात कला, नवोन्मेष आणि डिझाइन शिक्षणाचे छेदनबिंदू दाखवले जाईल, ज्यामुळे तरुणांना भविष्यातील करिअर संधींची झलक मिळेल.

या प्रदर्शनात इंटीरियर डिझाइन संकल्पना, उत्पादन प्रोटोटाइप, आर्किटेक्चरल मॉडेल्स आणि कला प्रतिष्ठापने यासारख्या कलाकृती प्रदर्शित केल्या जातील. त्याचे उद्दिष्ट केवळ सर्जनशीलता प्रदर्शित करणे नाही तर डिझाइनमध्ये करिअर कसे करता येईल हे देखील दाखवणे आहे. नागपूर सेंटरच्या संस्थापक आणि क्रिएटिव्ह डायरेक्टर रीना पांडे म्हणाल्या, "डिझाइन हे केवळ सौंदर्याबद्दल नाही; ते जीवन बदलण्याबद्दल आणि नवीन अनुभव निर्माण करण्याबद्दल आहे.

गेल्या १८ वर्षांत, भंवर राठोड डिझाइन स्टुडिओने हजारो विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे, ज्यामुळे त्यांना भारत आणि परदेशातील प्रतिष्ठित संस्थांमध्ये प्रवेश मिळू शकला आहे, जसे की NID, NIFT, CEPT, IIT आणि आंतरराष्ट्रीय डिझाइन विद्यापीठे. BRDS चे माजी विद्यार्थी आज फॅशन, इंटीरियर डिझाइन, आर्किटेक्चर, ॲनिमेशन, ललित कला आणि उत्पादन डिझाइन अशा विविध क्षेत्रात त्यांची प्रतिभा प्रदर्शित करत आहेत.

## शेतपिकाची नुकसान भरपाई देण्याचा वनविभागाला पडला विसर

* वनविभागाचे शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष
* सहाय्यक वनसंरक्षक काटोल तक्रारीची वाट बघतोय का?

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २३ :

काटोल तालुक्यातील वन्यजीव प्राण्यापासून शेकडो शेतकऱ्यांचे दरवर्षी पिकांचे नुकसान होत असतात त्यामुळे शेतकरी वन्यजीव प्राण्यापासून होणाऱ्या शेत पिकाचे नुकसान भरपाई म्हणून वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडे तक्रार करून आपली मागणी मांडतात परंतु असेच एक प्रकरण काटोल तालुक्यातील बोरखेडी रिठी शिवारातील शेतकरी प्रशांत पवार यांच्या शेतातील रब्बी हंगामातील तूर व चना पिकाचे नुकसान वन्यजीव प्राण्याने केले होते त्याची रीतसर तक्रार पवार यांनी कोंढाळी वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे कडे नऊ जानेवारी 2025 मध्ये केली होती.

त्यामुळे शेताची मोका चौकशी करण्यासाठी वनविभागाचे कर्मचारी सुद्धा आले होते नुकसानग्रस्त भागाचे फोटो तसेच इतर सर्व कागदपत्र त्यांनी कर्मचारी यांच्याकडे सुपूर्त केले होते कागदपत्राची पूर्तता केल्यानंतर पवार हे गेल्या अनेक महिन्यापासून नुकसान भरपाई ची वाट बघत राहिले आठ महिने उलटून



सुद्धा नुकसान भरपाई खात्यात जमा न झाल्यामुळे त्यांनी वनविभागाचे बोरखेडी रीठी येथील संबंधित कर्मचारी यांच्याकडे विचारणा केली असता सदर प्रकरण सहाय्यक वनसंरक्षक काटोल यांच्या डेक्स वर असल्याचे सांगण्यात आले तसेच पवार यांनी सहाय्यक वनसंरक्षक काटोल यांना मेलद्वारे नुकसान भरपाई देण्यात यावी असे विनंती पत्र पाठवले त्यावर कुठलेही उत्तर मिळाले नाही यावरून सहाय्यक वनसंरक्षक काटोल मेल तपासतात काय यावर शंका व्यक्त होत आहे अशा प्रकरणामुळे शेतकऱ्यांमध्ये वनविभागाच्या कार्यशैलीबद्दल संताप व्यक्त होत आहे. अशा भोंगळ शासकीय कारभाराला कंटाळून शेतकरी आत्महत्या नाही करणार तर अधिकाऱ्यांची आरती ओवाळणार काय असा संतप्त सवाल पवार यांनी प्रसंगी सरकारला केलेला आहे पवार हे वरिष्ठ पत्रकार म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे पत्रकारावर असा शासकीय अन्याय होत असेल तर सामान्य शेतकऱ्यांनी आपला आवाज कुणासमोर मांडावा असा प्रश्न सुद्धा त्यांनी केला. वनमंत्री तसेच वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करू असे सांगण्यात येत आहे.

## मौदा येथे कामगार संवाद मेळावा

■ महासागर प्रतिनिधी, कामठी, दि. २३ :

कामठी विधान सभा क्षेत्रातील मौदा येथे माजी जिल्हा परिषद सदस्य देवेंद गोडबोले यांच्या पुढाकाराने कामगार संवाद मेळावा पार पडला. महाराष्ट्र सरकारने खाजगी कंपन्या व आस्थापनांमध्ये कामगारांना १२ तास काम करण्यास भाग पाडणाऱ्या निर्णयाविरोधात या मेळाव्यात तीव्र आवाज उठविण्यात आला. या मेळाव्याला सुनील केदार माजी मंत्री, विद्यमान खासदार श्यामकुमार बर्वे, राजेंद्र मुळक, नितेश कराळे, अश्विन बैस अध्यक्ष माजी सदस्य योगेश देशमुख, राजेश ठवकर, ज्ञानेश्वर




वानखेडे, स्वप्नील श्रावणकर, किशोर सांडेल, शुभम तिघरे, विक्कि साठवणे, कार्यकर्ते उपस्थीत होते.

# पत्रकारांवर हल्ला करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी

## व्हॉइस ऑफ मीडिया संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. २३ :

नाशिक जिल्ह्यातील प्रसिद्ध ठिकाण असलेल्या त्र्यंबकेश्वर येथे इलेक्ट्रॉनिक मिडिया चा पत्रकार योगेश खरे, अभिजित सोनवने व किरण ताजने यांना गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे.

या हल्ल्यात पत्रकार गंभीर जखमी झाले असून सध्या त्र्यंबकेश्वरच्या शासकीय रुग्णालयात तर चिंताजनक प्रकृती असलेल्या ताजने वर नाशीक येथे अपोलो रुग्णालयात त्यांच्यावर



उपचार सुरू आहेत राज्यभरातून या घटनेचा व्हॉइस ऑफ मीडिया या संघटने कडून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला असून हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांना करण्यात आली आहे.

याच पार्श्वभूमीवर सावनेर व कळमेश्वर तालुक्यातील व्हाईस ऑफ मीडिया संघटनेच्या वतीने घटनेचा तिव्र निषेध व्यक्त करून संघटणेचे जिल्हाध्यक्ष दिलीप घोरमाडे यांच्या पुढाकारात रविवारी तारीख २१ रोजी सहाय्यक पोलीस अधीक्षक सागर खर्डे व सावनेरचे ठाणेदार उमेश पाटील यांची भेट घेऊन त्यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना मागणी निवेदन पाठविण्यात आले.

यावेळी तालुकाध्यक्ष सुधाकर बागडे, कळमेश्वर तालुकाध्यक्ष मंगेश गमे, राहुल सावजी, पुरुषोत्तम नागपुरकर सचिन लीडर,मनोहर घोळसे, वाहिद शेख,शांताराम ढोके, मंगेश उराडे,सतीश वानखेडे, गोपाल सोनवरसे सह मोठ्या संख्येने कळमेश्वर व सावनेर तालुक्यातील पत्रकार बांधव उपस्थित होते.

यावेळी दिलेल्या निवेदनामध्ये सदर प्रकरणातील सर्व हल्लेखोरांना अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी पत्रकारांच्या सुरक्षेसाठी शासनामार्फत विशेष उपाययोजना करण्यात यावी भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शासनाने ठोस व प्रभावी पावले उचलावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# उपजिल्हा रूग्णालय येथे स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानांतर्गत आरोग्य शिबीर



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २३ :

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग नागपूर यांच्या निर्देशानुसार देशाच्या आरोग्य दृष्टिकोनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी संपूर्ण देशभर महिलांच्या आरोग्य तपासणी, उपचार सेवा व पोषण यावर विशेष भर देण्यात आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबिराचे उद्घाटन सोहळा उपजिल्हा रुग्णालय, रामटेक येथे संपन्न झाला.

या शिबिरात आहार व पोषण, मासिक पाळीचे आरोग्य, एड्स व तपासणी यावर समुपदेशन करण्यात आले शिबिरात नेत्र रोग, दंत रोग, बाल रोग, स्त्री रोग व सिकलसेल याची सुद्धा तपासणी करण्यात आली. आरोग्य शिबिरात एकूण ४७४ रुग्णांनी आरोग्यसेवेचा लाभ घेतला. यामध्ये ३१७ महिला रुग्ण, १३८ पुरुष रुग्ण तसेच १९ गर्भवती महिलांचा समावेश होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय वाघमारे तर प्रमुख पाहुणे म्हणून शितलवाडी ग्रामपंचायातीच्या सरपंच डॉ. जयश्री मडावी, समाजसेविका ज्योतीताई कोल्लेपरा उपस्थिती होत्या. महिला व बाल आरोग्य तपासणी करिता स्त्री रोगतज्ज्ञ डॉ. पूनम कंगाली व डॉ. समीक्षा पोरेड्डीवार, बाल रोगतज्ज्ञ डॉ. विशाल कोडापे, भूलतज्ज्ञ डॉ. गणेश बावनथडे, डॉ. आदर्श गायकवाड, डॉ कृष्णा कुंदनवार, डॉ. रिया ठाकूर यांनी योगदान दिले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी अर्चना मडावी, कादंबिनी तिरपुडे, संध्या रेवतकर, आशिष सहारे, मंगला तवले, प्रमोदिनी अंबुलकर व उपजिल्हा रुग्णालयातील सर्व वैद्यकीय चमू व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन अपर्णा पिसे यांनी केले तर डॉ. प्रिया राऊत यांनी आभार मानले.

# स्वच्छता ही सेवा अंतर्गत आमला स्टेशनवर पुर्ननवीनीकरण उत्पादनांची विक्री



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

नागपूर विभाग, मध्य रेल्वे, 23 सप्टेंबर 2025 रोजी स्वच्छता ही सेवा 2025 अंतर्गत पुनर्नवीनीकरण उत्पादनांची विक्री या उपक्रमावर भर दिला. हा उपक्रम राबवला गेला.

आमला स्टेशनवर रेल्वे कर्मचारी आणि शाळेतील विद्यार्थ्यांनी वापरलेले किंवा न वापरलेले साहित्य उपयुक्त उत्पादनांमध्ये रूपांतर करून आपली अद्भुत सर्जनशीलता प्रदर्शित केली. या कार्यक्रमात सेंट्रल स्कूल, आमला, बच्छपन स्कूल, आमला आणि इंडियन पब्लिक स्कूल, आमला (इटावा) यांचे विद्यार्थी सहभागी झाले. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आणि रेल्वे अधिकाऱ्यांच्या सक्रिय सहकार्याने विद्यार्थ्यांनी विविध नवीन आणि सर्जनशील पुनर्नवीनीकरण वस्तू तयार केल्या. या वस्तू स्टेशनवर प्रदर्शनास ठेवण्यात आल्या आणि प्रवाशांना विकल्या गेल्या, ज्याला लोकांकडून उत्स्फूर्त प्रशंसा आणि प्रतिसाद मिळाला. मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. निर्मला गुप्ता यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. त्यांनी नव्याने तयार झालेल्या वस्तूंचा आढावा घेतला.

# स्वस्थ नारी, सशक्त परिवार आरोग्य शिबिराने आमला उपखंड रेल्वे रुग्णालयातील महिलांना केले सशक्त




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

नागपूर विभाग, मध्य रेल्वे, पधार हॉस्पिटल, बेतूल यांच्या सहकार्याने उपखंड रेल्वे रुग्णालय, आमला येथे स्वस्थ नारी, सशक्त परिवार उपक्रमाअंतर्गत बहु-विशेषज्ञ आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले. विनायक गर्ग, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, व डॉ. निर्मला गुप्ता, मुख्य वैद्यकीय अधीक्षक/नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. याचा उद्देश महिलांच्या आरोग्याचे संवर्धन, प्रतिबंधात्मक काळजी आणि संपूर्ण कुटुंबाच्या कल्याणाला प्रोत्साहन देणे हा होता.

या उपक्रमात पोषण, मातृत्व आरोग्य, मासिक पाळी स्वच्छता, जीवनशैली व्यवस्थापन, मानसिक स्वास्थ्य, तसेच कॅन्सर व प्रजनन आरोग्य समस्यांचे लवकर निदान यावर विशेष भर देण्यात आला. पुरुष व महिला दोघेही व्यापक वैद्यकीय तपासणीत सहभागी झाले, तर सल्ला सत्रांमध्ये स्वस्थ नारी, सशक्त परिवार हा संदेश दिला गेला.

वैद्यकीय टीममध्ये डॉ. निर्मला गुप्ता, डॉ. शुभांगी सखारे, डॉ. अवंती लाखोटे, डॉ. लवी, डॉ. पालोमा, डॉ. विशाखा व आमला व नागपूर येथील पॅरामेडिकल कर्मचारी सहभागी होते.

एकूण 152 सहभागी शिबिरात उपस्थित होते, ज्यात 32 जणांची कॅन्सरसाठी, 152 जणांची उच्च रक्तदाब व मधुमेहासाठी, व 112 जणांची रक्ताल्पता तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमाचे व्यापक कौतुक झाले, ज्यातून भारतीय रेल्वेच्या समावेशक व सहानुभूतिपूर्ण प्रशासनातील बांधिलकी व कर्मचारी व त्यांच्या कुटुंबांच्या आरोग्य व सशक्तिकरणाचे महत्त्व अधोरेखित झाले.

# रूपा देशमूख यांचा वाढदिवस वृद्धाश्रमामध्ये साजरा




■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. २३ :

जिवनात पैसा हा गौण व दुय्यम आहे. माणुसकी ही सर्वश्रेष्ठ आहे याची प्रचीती 'आईसाहेब' रूपाताई रणजीतबाबू देशमुख यांच्या वाढदिवसाप्रसंगी अनेकांनी अनुभवली निमित्त होते, आईसाहेब रूपाताई रणजीत देशमुख यांच्या वाढदिवसाचे त्यांनी नेहमी प्रमाणे वृद्धांच्या सहवासात वाढदिवस साजरा करण्याचा बेत आखला परंतू यावेळी सावनेर येथील स्वामी विवेकानंद वृद्धाश्रम येथे..!

मृदुभाषी व सतत हृदयातून मायेचा झरा वाहत असलेल्या 'आईसाहेब' रूपाताई देशमुख यांची मनापासून ईच्छा होती की, जे लोक दुःखी आहेत त्यांच्या सोबत मला सहभोजन घेऊन माझा वाढदिवस साजरा करायचा आहे, तिथे 'आईसाहेब' रूपाताई देशमुख यांनी त्यांच्याकडून जेवणाची व्यवस्था करण्यात आली. वृद्ध लोकांचा जेवणाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर त्यांच्या अडचणी व त्यांच्या मनातील वेदना ऐकुन घेतल्या त्यांना भेट म्हणून जीवनाश्यक वस्तूची किट देण्यात आली. 'आईसाहेब' रूपाताई देशमुख यांनी येथील वृद्ध बांधव आणि भगिनीं सोबत चर्चा केल्यामुळे तेथील वृद्धाच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण होउन त्यांचा आनंद द्विगुणित होऊन त्यांनी 'आईसाहेब' रूपाताईच्या बोलण्यातून आपलेपणाचा स्पर्श अनुभवला. जिवनभर कुटुंबासाठी कष्ट सोसून वृद्धकाळी त्यांचे जिवन वृद्धाश्रमात व्यतीत होताना पाहुन 'आईसाहेब' रूपाताईंचे मन गहिवरून आले परंतू त्याआधिच स्वतःला सावरत 'आईसाहेब' रूपाताईंनी त्यांच्या सोबत केक कापून व त्यांना आपल्या आनंदात सहभागी करीत आपला वाढदिवस साजरा केला. याप्रसंगी त्यांनी मुलांना चांगल्या शिक्षणासोबत चांगले संस्कार देणे आवश्यक असल्याचही सांगितले. या त्यांच्या मोलाच्या उपदेशामुळे अनेकांच्या डोळ्यापुढे 'आईसाहेब' रूपाताईंच्या संस्कारात वाढलेल्या आमदार आशिषबाबू देशमुख, डॉ. अमोलबाबू देशमुख व त्यांच्या नातवंडांची आदर्श छबी उभी राहीली. त्यावेळी डॉ. अमोलबाबू देशमुख, अरविंद बावनकर, आशाताई राऊत, अशोक निंबाळकर, किशोर यावलकर, ईत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# डब्ल्यूसीएलचा प्रमुख उपक्रम 'तेजस' सुरू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्यूसीएल)ने 'तेजस - उदयोन्मुख ज्युनियर्स इनटू एस्पायरिंग स्टार्स (तेजस)' नावाचा एक नाविन्यपूर्ण मानव संसाधन उपक्रम सुरू केला.हा महत्त्वाचा उपक्रम सुरू करणारी डब्ल्यूसीएल ही कोल इंडिया लिमिटेड (सीआयएल) ची पहिली उपकंपनी आहे.




'तेजस' च्या उद्घाटन डब्ल्यूसीएलचे अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक, जे.पी. द्विवेदी यांनी केले. या प्रसंगी संचालक (वित्त), बिक्रम घोष, संचालक तांत्रिक आनंद प्रसाद, संचालक (कार्मिक), डॉ. हेमंत शरद पांडे, मुख्य दक्षता अधिकारी,अजय मधुकर म्हेत्रे, सुकाणू समिती सदस्य, आशिष मूर्ती आणि एस.आर. गबाळे उपस्थित होते.

"तेजस" उपक्रमांतर्गत, डब्ल्यूसीएल च्या 657 जनरल-झेड अधिकाऱ्यांना भविष्यातील गरजांनुसार कोळसा क्षेत्राचे नेतृत्व करण्याची क्षमता वाढविण्यासाठी प्रशिक्षण दिले जाईल. हे प्रशिक्षण त्यांच्या डिजिटल-फर्स्ट विचारसरणी आणि सर्जनशील उर्जेला दिशा देईल. क्षमता बांधणी आणि प्रतिभा विकासावर विशेष लक्ष केंद्रित करून १२ दिवसांत १० बॅचमध्ये ८४ तास-ांचा हा सघन अभ्यासक्रम आयोजित केला जाणार आहे. "तेजस" हे त्याच्या संतुलित शैक्षणिक मॉडेलद्वारे वैशिष्ट्यीकृत आहे, ज्यामध्ये ७५% सत्रे डब्लू सी एल अधिकाऱ्यांनी आणि २५% सत्रे बाह्य तज्ञांनी आयोजित केली आहेत.त्यात कोळसा क्षेत्राच्या सर्व व्यावहारिक पैलूंचा समावेश आहे."तेजस" च्या केंद्रस्थानी डॉ.हेमंत शरद पांडे, संचालक (मानव संसाधन) यांचे दुरदर्शी नेतृत्व आहे. हा कार्यक्रम डब्लू सी एल च्या मानव संसाधन विकास विभागातर्फे महाव्यवस्थापक यू.सी.गुप्ता आणि त्यांच्या टीमच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला जात आहे.

# १०८३ वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर :** वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण १०८३ वाहन चालकांवर कारवाई करून ४,५५,५०० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ५ व एनडीपीएस अन्वये १ अशा ६ प्रकरणात ६ आरोपींवर कारवाई करून ११,६८० रुपयांचा माल जप्त केला. तसेच जुगार कायद्यान्वये ४ प्रकरणात ४ आरोपींवर कारवाई करून ५,७४० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली.

# डोंगरगढ नवरात्रोत्सवानिमित्त डोंगरगढ-रायपूर-डोंगरगढ पूजा विशेष मेमू ट्रेनचे संचालन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

डोंगरगढ नवरात्र मेळाव्यात प्रवाशांच्या सोयीसाठी डोंगरगढ - रायपूर - डोंगरगढ दरम्यान पूजा विशेष मेमू ट्रेन चालवली जात आहे. ट्रेन क्र. ०६८८८ (डोंगरगड-रायपूर) डोंगरगढ येथून पूजा स्पेशल मेमू ट्रेन ही ट्रेन ०२.१०.२०२५ पर्यंत दररोज २३:१० वाजता सुटेल. रायपूर येथे या ट्रेनची आगमन वेळ ०१:४० आहे. (पुढच्या दिवशी) त्याचप्रमाणे, ट्रेन क्रमांक ०६८८७ (रायपूर - डोंगरगड) पूजा स्पेशल मेमुट्रेन २९.०९.२०२५ पासून रायपूरहून ०३.१०.२०२५ पर्यंत दररोज दुपारी ०२:३० वाजता सुटेल. ही ट्रेन डोंगरगडला सायंकाळी ०५.१५ वाजता पोहोचेल. या मेमू स्पेशल ट्रेनचा थांबा जतकन्हार, मुसरा, बोरतलाव, राजनांदगाव, परमलकसा, मुढीपार, रसमडा, दुगग, त्रिलाई नगर, त्रिलाई पॉवर हाऊस, त्रिलाई, देवबालोदा चारोडा, कुम्हारी, सरोना, सरस्वती नगर ही सतरा नियुक्त स्थानके आहेत. ही मेमू स्पेशल गाडी एकूण ८ कोचसह धावेल. या मेमू स्पेशल ट्रेनचे सविस्तर वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

# वाडीत आदिशक्तीची प्रतिष्ठापना, चैतन्यमयी वातावरणात नवरात्रोत्सव सुरू

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :

नवरात्रोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. या मांगल्यपर्वाला चैतन्यमयी वातावरणात सोमवारी घटस्थापनेसह प्रारंभ झाला. परिसरातील विविध दुर्गा उत्सव मंडळांनी देखावे, बँड पथक, डिजे संगित, पारंपारिक ढोलताशांच्या निनादात आदिशक्तीची प्रतिष्ठापना केली.मंडळांकडून मंडप, प्रमुख रस्ते, चौव आणि मैदानांवर सजावट करण्यात आली आहे. बँड, डीजे संगीत, पारंपरिक भजन कीर्तन आणि ढोलताशांचा गजर यामुळ अवघे वाडी शहर भक्तीमय झाले आहे.



दत्तवाडी येथील गजानन सोसायटीच्या क्रीडा मैदानावर गुरुप्रसाद सार्वजनिक रास गरबा नवदुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने आकर्षक माँ दुर्गा प्रतिमेची स्थापना करण्यात आली. येथे नवरात्र उत्सवाला सुरुवात झाली असुन भव्य रास गरबाचे आयोजन केले आहे.

गुरुप्रसाद नगर सार्वजनिक दुर्गा देवी उत्सवाचे प्रमुख हर्षल काकडे यांनी सांगितले की, पावसामुळे रास-गरब्यात अडथळा येऊ नये म्हणून दुर्गा प्रतिमेच्या पंडालशेजारी खास वॉटरप्रूफ डोमची उभारणी केली आहे. शुक्रवार २६ सप्टेंबरपासुन दुपारी संगीतमय भागवत कथेचे आयोजन केले आहे.

या आयोजनासाठी प्रमुख हर्षल काकडे, सहप्रमुख संतोष केचे, समिती अध्यक्ष विजय मिश्रा, राजेश जयस्वाल, रुपेश झाडे,अखिल पोहनकर, निलेश सीरसवार, क्रांतीसिंग, मोहित कोठे, पिंटू पोहनकर, मानसिंग ठाकूर, अजित पॉल, अभिजित जोशी, गौरव कळसकर, संतोष गुप्ता, धर्मेश सिंग, अमोल सोनसरे, अजित पॉल, पंकज कौडण्य, लकी सिंग, हनी सिंग, रॉकी सिंग, अनमोल सिंग, अरुण बागडे, वर्मा, मुकुंद झाडे, परमिंदर सिंग, परमार, ज्योती भोरकर, निर्मला निघोट, पूर्वा काकडे, अजय मिश्रा, अमित चौधरी, शोभा सिंग, मंजू सिंग, अनिल काकडे,पुरुषोत्तम कोठे, तीनखडे, संतोष केसरवाणी,ताथोड, लोकपाल चापले, चंद्रशेखर निघोट,श्रीराम बाटवे, राजेंद्र तिवारी, चंदन सुतार , कल्पना सगदेव, पिंकी बैस,आदी कार्यकर्ते यशस्वीतेसाठी प्रयत्नरत आहे.

# राष्ट्रीय प्रबोधनकार अरुणभाऊ सहारे यांचा वाढदिवस संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. २३ :

येथील आकाशवाणी दूरदर्शन लोकसंगीत कलावंत अरुण सहारे यांचा वाढदिवस त्यांचे मित्र मंडळींनी मोठ्या उत्साहात साजरा केला. सामाजिक धार्मिक व कलेच्या क्षेत्रात त्यांनी आपले संपूर्ण जीवन समर्पित करून मान्यवर कांशीराम साहेबांच्या चळवळीत त्यांनी आपले जीवन झोकून दिले, असे उदगार अरुणभाऊ बाहने महासचिव अंधश्रद्धा निर्मूलन



समिती यांनी एका गौरव सभेत केले.

महाराष्ट्र संदेश न्यूज चॅनलचे संपादक. स्टार महाराष्ट्र न्यूज चॅनलच्या जिल्हा प्रतिनिधी युवराज मेश्राम म्हणाले की, अरुण सहारे यांनी आपल्या गायनाच्या माध्यमातून परिवर्तनाची ज्योत तेवत ठेवली.

याप्रसंगी भारतीय भागीदारी मिशनचे समन्वयक डॉ. विनोद रंगारी, रवी दलाल (साहित्यीक) सीएस ठवळे (जॉईंट डायरेक्टर सूचना प्रद्योगिक मंत्रालय) मा. गौतम जांभुळकर(विधानसभा अध्यक्ष बि आरएसपी) इंद्रकुमार तागडे दादाराव शिरसाट लक्ष्मण दादा गायकवाडराहुल वानखेडे, चंद्रशेखर उके, मुन्ना यादव, दीपक मेश्राम, फकिरचंद गोंडाने यांनी आपआपले विचार व्यक्त केले. राजेश श्रीखंडे यांच्या अध्यक्षतेखाली ही गौरव सभा संपन्न झाली. या शुभेच्छा ला उत्तर देतांनी अरुणभाऊ सहारे यांनी आपल्या संघषार्चा जीवनपट सांगितला ते पुढे म्हणाले, मान्यवर कांशीराम साहेबांनी सांगितलेल्या 108 महापुरुषांचा वैचारिक परिवर्तनाचा मार्ग बहुजन समाजाला सामाजिक व आर्थिक परिवर्तनाकडे त्यांच्या उन्नती व प्रगती कडे नेऊ शकतो. बहुजन साहित्य कला अकादमीच्या विदर्भ प्रदेश अध्यक्षपदी अरुण भाऊ सहारे यांची नियुक्ती झाल्याबद्दल सर्व उपस्थित तांनी त्यांचे स्वागत केले. ज्यांनी ज्यांनी फेसबुक व्हाट्सअप वरून व प्रत्यक्षरीत्या शुभेच्छा दिल्या त्यांचे मनःपूर्वक आभार अरुणभाऊ सहारे यांनी मानले. माला शेंडे, जया यादव, चंद्रकला बेलजी, कल्पना सहारे, आशा शेंडे. कल्पना मेश्राम, चित्र रेखा ऊके, सपना शेंडे, संध्या ऊके रजनी शेंडे आदी महिला मंडळ कार्यक्रमाला उपस्थित होते.

# अवैध डम्पिंग यार्डाकरिता ग्रामस्थांचे चक्का जाम



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २३ :

कामठी शहराजवळ कामठी आजनी रस्त्यावर कामठी नगर परिषदेने उभारलेल्या अवैध डम्पिंग यार्डाविरोधात ग्रामीण जनता दहा बारा वर्षापासुन लढा देत आहेत. आजनी, गादा, भोवरी, रामनगर आदी गावातील नागरिक या कारणाने त्रस्त झाले आहेत. स्थानीक आमदार, नगर परिषद, तहसिलदार, पोलीस स्टेशन विद्यमान पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या माध्यमातुन वरील विषय कलेक्टर पर्यंत पोहोचला परंतू तोडगा निघालेला नाही. या उलट नगर परिषदेचे कर्मचारी जास्त प्रमाणात रस्त्यावर कचरा टाकु लागले आहेत. मृत जनावरे तसेच घन कचऱ्यातुन येणाऱ्या दुर्गंधीमुळे ग्रामिणाचे जगणे कठीण झाले आहे. पंधरा दिवसांपुर्वी निवेदन देवुनही कारवाइ न झाल्याने आजनीतील युवक संतप्त झाले. काल संध्याकाळी ५वाजताच्या सुमारास त्यांनी रस्त्यावर उतरत चक्का जाम आंदोलन केले. यावेळी पोलीस अधिकाऱ्यांनी घटना स्थळी जावुन ग्रामस्थांना शांत करण्याचा प्रयत्न केला.आणि कायदेशीर मार्गाने आंदोलन करण्याचा सल्ला दिला. परंतु ग्रामस्थांनी दहा बारा वर्षांपासून कायदेशीर मार्गाने लढा दिला परंतू समस्या सुटत नसल्याचे दुखः व्यक्त केले. आणखी कीती दिवस लढायचे असा ज्वलंत सवाल त्यांनी मांडला. परीस्थिती गंभीर होत असल्याने आजनीचे पोलीस पाटील यांनी मध्यस्थी करून वातावरण शांत केले. मात्र ग्रामस्थांमध्ये असंतोष आहे. त्यामुळे संतप्त भावनांचा उद्रेक कधी होईल सांगता येत नाही .त्यामुळे नगरपरिषदेने डम्पिंग यार्डच्या प्रश्नावर तोडगा काढावा अशी मागणी जोर धरत आहे.

# डिगडोहमध्ये स्वच्छता अभियान संपन्न

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. २३ :

तालुक्यातील भाजप डिगडोह मंडळाच्या वतीने सेवा पंधरवाडा अभियानांतर्गत साईनगर डिगडोह प्रभाग ०४ येथे स्वच्छतेचा कार्यक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी स्वच्छता व निरोगी जीवन यांवर मंडळ अध्यक्ष महेश लोखंडे यांनी युवकांना मार्गदर्शन केले. परिसरातील कचरा व प्लास्टिक झाडुन स्वच्छता करण्यात आली. नागरिकांनी कचरा गाडीचा लाभ दैनंदिन कचरा टाकण्यासाठी घ्यावा, असे आवाहन सुरेश काळबांडे यांनी केले.

स्वच्छता अभियानात प्रामुख्याने महेश लोखंडे, सुरेश काळबांडे, विनोद ठाकरे, कैलास गिरी, चेतनलाल पांडे, राजेश बोरकर, संदीप साबळे, रोहित शिंगणे , शिवरकर, स्वप्नील चौधरी, हर्ष मेंढे, राजू कोल्हे, खोडे, नकुल पांचाळ दिपक सायखेडे, अमोल लसणापुरे व इतर नागरिक उपस्थित होते.

# लक्ष्मीबाई केळकर शासकीय औद्यो. संस्थेतर्फे स्वच्छता अभियान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

लक्ष्मीबाई केळकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागपूर मुलींची ,जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर उपवि. कार्यालय नागपूर ग्रामपंचायत विहीरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियान विहीरगाव या गावी राबविण्यात आले.

या स्वच्छता अभियानाच्या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी अतिरिक्त जिल्हाधिकारी मिहीर उपविभागीय अधिकारी , वंदना संगणपते, तहसीलदार डहाट उपकार्यकारी अधिकारी जि.प., जाधव, बोराडे, शिंगणे जिल जि. आरोग्य अधिकारी जयस्वाल सरपंच शिंदे ,सदस्य पदाधिकारी विहीर गावचे नागरिक व औ प्र. संस्थेच्या प्रशिक्षणाथीर्नी मोठ्या संख्येने स्वच्छता अभियानात सहभागी झाल्या. स्वच्छता अभियान राबवून गावातील प्रमुख रस्त्यांची शाळ ग्रामपंचायत, दवाखाना परिसराची स्वच्छता करण्यात आली. यामध्ये सर्व कर्मचारी अधिकारी प्रशिक्षणार्थी व गावातील नागरिक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. स्वच्छता अभियान स्वच्छता ही सेवा आहे व मुख्यमंत्री गाव समृद्ध योजना, सेवा पंधरवडा योजनांची माहिती दिली.

# लोकहितासाठी व पक्ष बळकटीसाठी काम करावे : माजी मंत्री राजेंद्र मुळक

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २३ :

दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी नागपूर जिल्हा ग्रामीण कॉंग्रेस कमिटी कार्यालय, गणेश पेठ, नागपूर येथे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी मंत्री तथा प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र मुळक, खासदार श्यामकुमार बर्वे व नागपूर जिल्हा निरीक्षक वीरेंद्र जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीत पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



"कॉंग्रेस पक्ष हा सदैव जनतेच्या न्यायासाठी, शेतकरी व शेतमजुरांच्या हक्कांसाठी, बेरोजगार तरुणांच्या रोजगाराच्या संधींसाठी आणि महिला व सामान्य जनतेच्या प्रगतीसाठी लढत आला आहे व पुढेही लढत राहणार आहे. सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने लोकहितासाठी व पक्ष बळकटीसाठी काम करावे." असे मत यावेळी माजी मंत्री राजेंद्र मुळक यांनी व्यक्त केले.

# खाजगी जमिनीच्या मूळ मालकांना स्लम टीडीआर प्रमाणपत्राचे वितरण

# राज्यात पहिल्या मनपाचा मान नागपूर महानगरपालिकेला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

नागपूर शहरात अनेक वर्षांपासून खाजगी जमिनींवर अतिक्रमणकरून झोपडपट्ट्या उभारल्या गेल्या आहेत. परिणामी मूळ जमीनमालकांना आपल्याहक्काच्या जमिनीवर बांधकाम करता येत नव्हते, तर अतिक्रमण धारकांकडे कोणतेही वैध कागदपत्रे नसल्याने त्यांनाही कोणताही स्थायी हक्क सिद्ध करता येत नव्हता. या द्विधा परिस्थितीला तोडगा म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनोखी योजना राबविली आहे. राज्याचे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राबविण्यात येत असलेल्या योजने अंतर्गत अतिक्रमण करणाऱ्यांना जागेवर नियमित करून घरपट्टे दिलेजाणार असून, मूळ जमीनमालकांना मोबदल्यात



ट्रान्सफरेबल डेव्हलपमेंट राईट्स प्रमाणपत्र दिले जात आहे. यासंदर्भात राज्याच्या महसूल विभागाच्या माध्यमातून आदेश निर्गमित करण्यात आले. त्यानुसार मंगळवारी ( ता. २३) मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते मौजा बाबुळखेडा येथील १९ प्लॉटधारकांना टीडीआर प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

मनपा मुख्यालयातील आयुक्त सभा कक्षात आयोजित छोटेखानी समारंभात मनपाचे उपायुक्त मिलिंद मेश्राम, नगररचनाकार ऋतुराज जाधव, सीडीएसएफ संस्थेच्या प्रमुख सौ. लीना बुधे उपस्थित होत्या. विशेष म्हणजे, खाजगी जमीन खरेदी करून अधिकृत प्लॉट धारकांना टीडीआर देणारी नागपूर महानगरपालिका हीराज्यातील पहिली महानगरपालिका ठरली आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितले की, ह्या योजनेमुळे मूळ जमीनमालकांना आता त्यांच्या जमिनीच्या बदल्यात योग्य मोबदला मिळेल.

मिळालेला टीडीआर ते विक्री करून त्याचे आर्थिक लाभ घेऊ शकतात.

मौजा बाबुळखेडा येथील ४३ भूखंड धारकांच्या जागेवर व इंद्रप्रस्थ सोसायटीच्या मालकीच्या ८ एकर क्षेत्रफळात वसलेले रामटेके नगर झोपडपट्टी आहे. त्यापैकी १९ भूखंडधारकांकडून व इंद्रप्रस्थ सोसायटी कडून टीडीआर अर्ज प्राप्त झाले. १९ भूखंड धारकांच्याप्लॉटच्या क्षेत्रफळानुसार व इंद्रप्रस्थ सोसायटीच्या जागेच्या क्षेत्रफळानुसार प्रत्येकी एक एफएसआय प्रमाणे टीडीआर देण्यात आलेला आहे.

हा निर्णय अमलात आल्यानंतर उर्वरित प्लॉट धारकांनाही अर्ज करण्याची संधी मिळणार आहे. टीडीआर प्राप्त करणाऱ्या नागरिकांनी सुद्धा मुख्यमंत्री आणि मनपाचे आभार व्यक्त केले आहे.

## झोपडपट्टी धारकांना दिलासा

फक्त जमीनमालकांच्याच नाही तर झोपडपट्टीत राहणाऱ्यांच्याही समस्या या योजनेमुळे सुटणार आहेत. उपायुक्त मिलिंद मेश्राम यांनी सांगितले की, नागपूर महानगरपालिकाद्वारा उक्त जागेवर बेघरांसाठीघरे/जनतेसाठी घरे असे आरक्षण टाकून टीडीआरच्या माध्यमातून जागा संपादित करून भूमी अभिलेख विभागात मनपाच्या नावाची नोंद करून घेवून उक्त जागेवर अतिक्रमण करणाऱ्यांना राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे भाडेपट्टे देण्यात येणार आहेत. त्यामुळे त्यांनाही कायदेशीर संरक्षण मिळेल.राज्यात या धोरणाअंतर्गत कारवाई करणारी नागपूर महानगरपालिका ही पहिली ठरली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लवकरच स्थायी भाडेपट्ट्याचे वाटप करण्यात येणार असून, खासगी जमीन टीडीआरच्या माध्यमातून संपादित करून उक्त ठिकाणातील झोपडपट्टी धारकांना स्थायी भाडेपट्टा देणे हे आदर्श ठरेल असे मत त्यांनी व्यक्त केले.

## कडेकोट पोलीस बंदोबस्तात साजरा होणार नवरात्रोत्सव

### शहरात २५०० पोलीस सज्ज

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

शहरात नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने ठिकठिकाणी घटस्थापना, दुर्गा मंडळांकडून देवीच्या मूर्तीची स्थापना आणि गरब्याची धूम असते. या भव्य उत्सवाच्या काळात शहरात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी शहर पोलिसांकडून अडीच हजारावर पोलिस आणि १३०० होमगार्ड तैनात करण्यात आलेले आहे.

शहरात दरवर्षीच नवरात्रोत्सव उत्साहात साजरा केल्या जातो. यंदा ७९९ दुर्गा मंडळे तर २५३ मंदिरात घटस्थापना करण्यात येणार आहे. याशिवाय जवळपास २०७ छोट्यामोठ्या रासगरबा आणि दांडियाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहेत. यावेळी सायंकाळी सात ते साडेदहा या दरम्यान गरबा आणि दांडियांला सात दिवस परवानगी देण्यात आलेली असून अष्टमी आणि नवमीला त्यात सूट देण्यात आलेली आहे. स्थानिक पोलिस ठाण्यांकडूनही गस्त वाढविण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. विशेष म्हणजे, यंदाही कोराडी, आग्याराम देवी, गीता मंदीर, भवानी माता मंदीर यासह इतर मोठ्या मंदिरांनाही सुरक्षा व्यवस्था पोलिसांकडून प्रदान करण्यात येईल.

दांडिया आणि रासगरबा यादरम्यान अनेक युवकांचे झुंड ठिकठिकाणी फिरताना दिसून येतात, त्यांच्याकडून मुलींची आणि महिलांची छेडखानी होताना दिसून येते. मात्र, यासाठी महिला पोलिसांचे विशेष पथकही तयार करण्यात आले असून ते शहरातील विविध ठिकाणी फिरून काही आढळून आल्यास कारवाई करतील

उत्सवात युवकांमध्ये नशा पसरविण्यासाठी अनेक तस्कर सक्रीय असतात. गरबा आणि दांडियाच्या गर्दीमध्ये तस्कर अधिकाअधिक सक्रीय होऊ नये यासाठी 'ऑपरेशन थंडर' अंतर्गत विविध पथकांकडून शोध मोहीम सुरू करण्यात आलेली आहे. सुरक्षा व्यवस्थाः नवरात्र उत्सवादरम्यान शहरात, विशेषतः गर्दीच्या ठिकाणी पोलिसांकडून चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात येणार आहे. उत्सवादरम्यान होणारी गर्दी नियंत्रित करण्यासाठी पोलीस आणि स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात आली आहे.ध्वनिप्रदूषण नियंत्रण अधिनियमाचे पालन करण्याचे आदेश देण्यात आले,तपासणी आणि नियोजन पोलीस अधिकारी शहरातील सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करत असून, सर्व संबंधित घटकांना योग्य सूचना देण्यात आल्या आहेत.

# वंदे मातरम उद्यानाचे काम त्वरित पूर्ण करा

## मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी केली पाहणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

नागपूर महानगरपालिकेतर्फे शौर्य पदक विजेत्या सैनिकांच्या स्मरणार्थ आणि सन्मानार्थ एम्प्रेस मिल परिसरात उभारण्यात येत असलेल्या वंदे मातरम उद्यानाचे काम लवकर पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सोमवारी (२२) पाहणी दरम्यान संबंधित अधिकाऱ्यांना दिले.



शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या एम्प्रेस मिल परिसरात एक लाख चौरस फूट जागेत हे वैशिष्ट्यपूर्ण उद्यान साकारले जाणार आहे. या वैशिष्ट्यपूर्ण उद्यानाच्या पाहणी दौऱ्यात आयुक्तांसोबत अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., माजी महापौर दयाशंकर तिवारी यांच्यासह उपायुक्त गणेश राठोड, कार्यकारी अभियंता कमलेश चव्हाण, कार्यकारी अभियंता गिरीश लिखार, राजेंद्र राठोड, प्रशांत सोनकुसळे, उद्यान संवर्धक अमोल चौरपागार, उपअभियंता संजय इंगळे, पुरूषोत्तम फाळके, बंजारी, कनिष्ठ अभियंता संजय पुरी, वस्तू शिल्पकार प्रियदर्शन नागपूरकर, स्वप्नील आष्टीकर, अविनाश शाहू, शिशिर त्रिपाठी आदी उपस्थित होते.

वंदे मातरम उद्यान युध्दात शहीद झालेले सैनिक, शौर्य पदक प्राप्त सैनिक, माजी सैनिक, युध्दात वीरगती प्राप्त करणा-या सैनिकांची विधवा आणि त्यांच्या आश्रीतांना समर्पित केले जाणार आहे. या उद्यानाच्या कामाच्या प्रगतीवर आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली. हे काम त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश देऊन यात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यावर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही यावेळी त्यांनी दिला. या उद्यानात नागरिकांना लाईट अँड साऊंड शो सुद्धा दाखविला जाणार आहे. यासाठी आवश्यक कामाची पूर्तता करण्यात यावी तसेच या परिसरात असलेल्या ऐतिहासिक एम्प्रेस मिलच्या चिमणीचे मजबुतीकरण करण्याचे तसेच प्रकाश व्यवस्था करण्याचे निर्देश आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांनी दिले.

उद्यानाचे काम प्रगतीपथावर असून परमवीर चक्र विजेत्यांचे म्युरल, लहान मुलांसाठी खेळणी, स्काय वॉक आणि पादचारी मार्ग तयार झाला आहे. उर्वरित काम करणे आवश्यक असून याला पूर्णत्व देणे गरजेचे आहे, असे माजी महापौर दयाशंकर तिवारी यांनी सुचविले व हे उद्यान त्वरित पूर्ण करण्याच्या संदर्भात आवश्यक सूचना दिल्या.

# पुलाखाली बिऱ्हाड मांडलेल्या स्थलांतरितांची स्थिती चिंताजनक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

लकडगंज झोन ८, प्रभाग क्रमांक २३, कळमना येथील पारडी पुलाखाली, महाकाळकर सभागृह समोर भोपळवरून स्थलांतरित झालेल्या परिवाराने आपले बस्तान मांडले आहे. या परिवारात दूधपित्या बाळापासून वृद्ध व्यक्तींपर्यंत महिला व पुरुष असे मिळून 30 ते 35 लोक राहतात. हे लोक तबला, खेळणी बनवून विकण्याचे काम करीत अत्यंत दरिद्रीत व हालाकीच्या परिस्थितीत गुजरान करीत आहेत.



पुलाखाली ओली जमीन असून, या कुटुंबीयांची राहण्याखाण्याची परिस्थिती अत्यंत अत्यल्प आहे. प्रशासनाकडून याकडे कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. या परिवाराची नोंद पोलिस प्रशासन, नागपूर महानगरपालिका (एन एम सी) किंवा स्थानिक जनसेवकांकडून घेतलेली नाही.स्थानिक नागरिकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशासनाला या विस्थापित कुटुंबाला त्वरित मदत करण्याचे आव्हान केले आहे. मनोज रक्षक, अजय दत्ता, समीर सोनेकर, आल्विन गायकवाड, खुशाल बाळबुधे, राजेश तेलरांधे, उमेश गिरडकर, प्रितीन रंगारी, वीरेंद्र बघेल यांनी प्रशासनाला यांची नोंद घेऊन योग्य ती मदत करण्याची मागणी केली आहे. या कुटुंबीयांच्या परिस्थितीबाबत कोणतीही गंभीर दखल न घेतल्यास भविष्यात कुठलाही अपघात किंवा गंभीर सामाजिक समस्या उद्भवू शकते. सामाजिक कार्यकर्ते प्रशासनाकडे या परिवारासाठी योग्य व सुरक्षित निवास व आधारभूत सुविधा देण्याची मागणी करत आहेत.

## टँकरच्या धडकेत मजुराचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

चालकाने निष्काळजीपणे टँकर मागे घेत एका मजुराला जबर धडक दिली. डोक्याला गंभीर मार लागल्याने मजुराचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. ही घटना गिट्टीखदान पोलिस ठाण्यांतर्गत वायुसेनानगर परिसरात घडली. देवनाथ समीर दास (२०) असे मृत मजुराचे नाव आहे.
देवनाथ हा मुळचा ओडीशा येथील रहिवासी होता. वायुसेनानगरात पीडीआयसीसी प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. येथे वेगवेगळ्या राज्यातून मजूर कामाकरिता आले आहेत. सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास देवनाथ कानाला हेडफोन लावून कोणाशीतरी बोलत परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ बसलेला होता. या दरम्यान टाकीत पाणी भरण्यासाठी आलेल्या टँकर क्र. एमएच-४०/एके-०२०५ चा चालक सत्यम कुमार (३०) याने वाहन मागे घेत देवनाथला जबर धडक दिली.

# श्री श्री फिल्म्स निर्मित मराठी चित्रपट

## रायबा इमानदारचा ग्रँड सक्सेस आनंद उत्सव संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

प्रेक्षकांच्या भरघोस प्रतिसादामुळे आणि सलग दुसऱ्या आठवड्यात देखील हाऊसफुल शो सुरू असल्याने रायबा इमानदार या चित्रपटाचा ग्रँड सक्सेस आनंद उत्सव आज नागपूरमध्ये जल्लोषात साजरा करण्यात आला.



या सोहळ्यात निर्माता लेखक सचिन घोडे यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. सामाजिक आशय मांडणारा आणि मनोरंजनासोबतच विचार करायला भाग पाडणारा हा सिनेमा बनवून नागपूरकरांचा अभिमान वाढवल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. दिग्दर्शक सईद अख्तर यांच्या दिग्दर्शनाचीही उपस्थित मान्यवरांनी प्रशंसा केली.

चित्रपटात संजय खापरे, ज्येष्ठ अभिनेते दीपक शिर्के, बाळू इंगळे यांसारख्या अनुभवी कलाकारांसोबत नागपूरची अभिनेत्री प्रणाली राऊत हिने प्रभावी अभिनय सादर करून आपली स्वतंत्र छाप सोडली आहे. विदर्भ आणि नागपूरमधील अनेक कलावंतांचा सहभाग या चित्रपटाला स्थानिक पातळीवर आणखी जवळचा ठरवतो. त्यामध्ये विनोद राऊत, विजय गुमगावकर, नरेश गडेकर, शिल्पा शाहीर, नितीन पात्रीकर, जितेंद्र शिंदे, विजया शिंदे, शोभना मोहरील, वर्षा देशमुख, सुवर्णा नलावडे, अनिल प्रजापती, निलेश देव, संजय राम तसेच स्वर्गीय श्याम मोहरील या कलाकारांचा उल्लेख विशेष करून करण्यात आला.

संगीताच्या दृष्टीनेही चित्रपटाला प्रचंड लोकप्रियता मिळत आहे. विशेषतः चहा पाण्याला पाहून बोलवा ना ही लावणी महाराष्ट्रभर गाजत आहे. या गाण्याचे गीतकार स्वतः सचिन घोडे असून, संगीतकार भूपेश सवाई यांनी अप्रतिम संगीत साकारले आहे. डीवोपी व एडिटर पवन पिपरोदे यांचे योगदान उल्लेखनीय ठरले आहे. तसेच सह-दिग्दर्शक आकाश दुधनकर, अभिषेक नायडू, राहुल कोलते, गीतकार केशव गजभिये, प्रोजेक्ट मॅनेजर प्रीती तागडे, कॉस्ट्यूम डिझायनर हर्षाली घोडे, तुषार देशमुख, आर्ट डायरेक्टर आदित्य मेक्रेतवार, मेकअप आर्टिस्ट नकुल श्रीवास, अनिल कळमकर, संगीता मॅडम, स्वर्गीय ऋचाली देशमुख यांचेही विशेष योगदान अधोरेखित करण्यात आले.

# वीजभार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजूरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

महावितरणच्या लघुदाब वर्गवारीतील सर्व औद्योगिक, व्यावसायिक, घरगुती व इतर ग्राहकांच्या 157 केडब्लूपर्यंत वीज भार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना महावितरणकडून स्वयंचलित पद्धतीने मंजुरी देण्यास प्रारंभ झाला आहे. महावितरणच्या संकेतस्थळावर ही स्वयंचलित प्रणाली कार्यान्वित झाली आहे. त्यामुळे पायाभूत यंत्रणा उभारण्याची गरज नाही अशा ठिकाणी ग्राहकांनी नियमानुसार शुल्काचा भरणा केल्यानंतर केवळ 24 ते 48 तासांमध्ये मागणीप्रमाणे वाढीव वीजभार स्वयंचलित पद्धतीने मंजूर व कार्यान्वित होणार आहे.

राज्याचे मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीजग्राहकांना इज ऑफ लिव्हिंग नुसार (राहणीमान सुलभता) सेवा देण्याची सूचना केली आहे. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी लघुदाब वर्गवारीतील सर्व ग्राहकांसाठी वीज भारात वाढ किंवा कमी करण्याची प्रक्रिया ऑनलाइनद्वारे स्वयंचलित करण्याचे निर्देश दिले. त्यासाठी ऑनलाइन प्रणाली विकसीत करण्यात आली आणि दि. 17 सप्टेंबर ते दि. 2 ऑक्टोबरच्या सेवा पवार्चे औचित्य साधून ही सुविधा सुरू करण्यात आली आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या जोडणीच्या वीजभारामध्ये करारापेक्षा आणखी वाढ करणे किंवा कमी करण्याची सोय महावितरणच्या संकेतस्थळावर किंवा मोबाइल ॲपवर ग्राहकांना स्वतःच्या लॉगीनद्वारे उपलब्ध आहे. मात्र मंजूरीची प्रक्रिया स्वयंचलित नसल्याने पुढील कार्यवाहीसाठी बराच वेळ लागत होता. आता 157 किलोवॅटपर्यंतच्या वीज भाराच्या वाढीसाठी स्वयंचलित मंजूरी देण्यात येणार आहे. वीज भार वाढीबाबत ऑनलाइन मागणी नोंदविल्यानंतर संबंधित ग्राहकांना स्वयंचलित पद्धतीने कोटेशन देण्यात येईल. तर कोटेशनचे शुल्क भरण्याची देखील ऑनलाइन सोय आहे.

लघुदाब वर्गवारीमध्ये शून्य ते 7.5 किलोवॅट, 7.5 ते 20 किलोवॅट आणि 20 ते 157 किलोवॅट असे वीजभाराचे तीन गट आहेत. या तिनही गटात वीज भार वाढीच्या मंजूरीसाठी स्वयंचलित प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. ग्राहकांना केवळ संकेतस्थळ किंवा मोबाईल ॲपद्वारे ऑनलाइन अर्ज करावा लागेल व नियमानुसार शुल्क भरावे लागेल. त्यापुढील सर्व प्रक्रिया महावितरणकडून स्वयंचलित पद्धतीने होणार आहे. त्याची माहिती संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांक किंवा ई-मेलद्वारे कळविण्यात येणार आहे.

वीजग्राहकांनी आवश्यक शुल्काचा भरणा केल्यानंतर नवीन मीटर बसविण्याची किंवा पायाभूत वीजयंत्रणा उभारण्याची गरज नसेल अशा नसेल, अशा वीजजोडणीचा वाढीव वीज भार स्वयंचलित प्रणालीने मंजूर होईल व केवळ 24 तासांत कार्यान्वित होईल. वाढीव वीजभाराच्या आवश्यकतेनुसार किंवा सिंगलऐवजी थ्री फेजची मागणी असल्यास नवीन मीटर लावण्यात येते. अशा ठिकाणी नवीन वीज मीटर लावण्याचा आदेश स्वयंचलितपणे संबंधित एजन्सीला देण्यात येईल. त्यामुळे नवीन वीजमीटरची आवश्यकता असलेल्या ठिकाणी देखील साधारणतः 48 तासांमध्ये वीज भार वाढीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

# चित्रकारांसाठी भव्य 'रंग दे नागपूर' स्पर्धा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

नागपूर महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मनपाच्या वतीने 'रंग दे नागपूर' या भित्तीचित्र रेखाटन स्पर्धेचे आयोजन येत्या ११ व १२ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. चार संकल्पनेवर आधारित असणाऱ्या या स्पर्धेसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, २ ऑक्टोबर पर्यंत ही नोंदणी करता येणार आहे. शहर सौंदर्यीकरणासाठी कलावंतानी उत्स्फूर्तपणे मोठ्या संख्येत स्पर्धेत सहभागी घ्यावा असे आवाहन मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी केले आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात व अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या देखरेखीत 'रंग दे नागपूर' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, या माध्यमातून मनपाच्या ७५ वर्षांच्या गौरवशाली इतिहासाचे आणि भविष्याचे दर्शन घडविणे हा उद्देश आहे. विद्यार्थी आणि व्यावसायिक अशा दोन गटात ही स्पर्धा आयोजित केली जात आहे. यात विद्यार्थी गटामध्ये बीएफए, एम एफ ए. एटीडी, गीडी फाईन आर्ट विद्यार्थी यांचा समावेश असू शकतो, तर व्यावसायिक गटात हौशी चित्रकार आणि फाईन आर्टचे पदवीधर यांचा समावेश असू शकतो, प्रत्येक गटात ५ सदस्य असणार आहेत. रंग दे नागपूर स्पर्धेसाठी 'नागपूर ॲट ७५': अनेक दशकांतील वाढीचा आणि परिवर्तनाचा प्रवास, 'स्वच्छ, हरित आणि स्मार्ट नागपूर': स्वच्छता, हिरवळ आणि स्मार्ट सिटी विकास, नागपूरची संस्कृती, इतिहास आणि वारसा आणि 'नागपूर- द टायगर कॅपिटल ऑफ इंडिया' या चार संकल्पना निश्चित करण्यात आल्या .

## महासागर प्रभाग वार्ता

# इंदिरा नगरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयासमोर पाणी साचल्याने घाणीचे साम्राज्य

प्रमोद जांभूळकर,
नागपूर दि.२२

प्रभाग १ जरीपटका अंतर्गत येणाऱ्या इंदिरा नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाच्या प्रवेशद्वारासमोर साचलेल्या पाण्यामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून, दुर्गंधीमुळे स्थानिक नागरिक आणि वाचनालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले



आहे. पाण्यातून शेवाळ निर्माण झाल्याने अनेक विद्यार्थी घसरून पडत असून, त्यांचे पुस्तके व लॅपटॉप खराब होण्याच्या घटना घडत आहेत.या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते मंगेश नागदेवे यांनी सांगितले की घाणीमुळे परिसरात रोगराई पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. आम्ही यासंबंधी मंगळवारी झोनचे सहायक आयुक्त यांना निवेदन सादर केले. मात्र, अद्याप कुठलीही कारवाई झालेली नाही.या समस्येविरोधात निखिलेश मेश्राम, भगवान लांजेवार, रोशन गजभिये, पौर्णिमा नागदेवे, दर्शना गजभिये, अर्चना लांजेवार, संदीप रामटेके, नितेश शुक्ला, भारत गोस्वामी, नितेश करोडे, मंगला बागडे, लोकेश नागदिवे यांनी तातडीने उपाययोजनांची मागणी केली आहे.स्थानिक प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन त्वरीत कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे.

# अतिवृष्टीमुळे रस्ते खराब, संसर्गजन्य रोग पसरण्याची भीती

प्रदीप पौनिकर, नागपूर दि. २३

प्रभाग क्र-५ जामदार वाडी या परिसरात अतिवृष्टीमुळे अनेक रस्ते खराब झाले आहेत. यामुळे संसर्गजन्य रोग पसरण्याची भीतीही निर्माण झाली आहे.रस्त्यांवर पाणी साचल्याने नागरिकांना येण्या-जाण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या आहेत.सतरंजीपुरा झोन चे स्वास्थ अधिकारी यांना अनेकदा निवेदने देऊनही प्रशासन दुर्लक्ष करीत आहे.
परिसरातील नागरिक रस्त्यापासून



त्रस्त झाले आहे.घराच्या आजूबाजूला पाणी साठून डासाचे प्रमाण वाढले आहे.साचलेल्या पाण्यामुळे विशेषत: लहान मुले, गरोदर स्त्रिया आणि वृद्ध व्यक्तींमध्ये रोगाचा धोका अधिक झाला आहे आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष दिले नाही तर आम आदमी पक्षाचा वतीने आणि स्थानिक नागरिकांचा वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा आम आदमी पक्षाचा वतीने देण्यात आला.
यावेळी प्रदिप पौनिकर, किशन निमजे, विजय नंदनवार, हेमराज कुंभारे, अनिल संभे, नानक धनवानी,आरती दलाल, संदीप साखरे, केतन ठाकूर, दिपक कोदरलीकर, सुनिल गजभिये, दिलीप रामटेककर, हरी निखारे, मनोज फटींग, क्षितिज वंजारी, निलकंड टाकलीकर, हरिहर पराते,कृष्णा पाठराबे, प्रिती पौनिकर,स्वाती तारवानी, अंशु बिरेवार, संजू पटले, राजकुमार किटाळीकर, जयघोष कोटांगले, गोविंदा केळवदकर,अनिल चांदेकर, अरुण गुणारकर,बाबुराव निमजे व आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# शाळेजवळील दुर्गंधीमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात



प्रमोद जांभूळकर,
नागपूर दिनांक २३

प्रभाग क्र. ९ अंतर्गत गड्डीगोदाम ते खलासी लाईन मार्गावर सेंट जॉन सी.बी.एस.ई. शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ मोठ्या प्रमाणात कचऱ्याचा साठा झालेला असून त्यामुळे परिसरात गंभीर दुर्गंधी पसरली आहे. या मार्गावर दररोज हजारो विद्यार्थी ये-जा करतात. परिणामी, विद्यार्थ्यांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, या भागात नियमित साफसफाई होत नसल्यामुळे डास, माशांचा प्रचंड त्रास होत आहे. विविध आजार पसरण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. श्वास घेणेही कठीण झाले असून, ही परिस्थिती पाहता प्रशासनाचे दुर्लक्ष स्पष्ट दिसून येत आहे.
हरीश सहारे, प्रशांत साखरे, केशव लव्हात्रे, पवन सहारे, मुकेश जांभुळकर, प्रकाश कोटांगळे, राजेश वालदे आदी स्थानिक नागरिकांनी या गंभीर समस्येकडे महापालिकेचे लक्ष वेधले असून, त्वरित स्वच्छता मोहीम राबवून कचरा हटवण्याची आणि नियमित साफसफाई सुनिश्चित करण्याची मागणी केली आहे.